

# श्रीपाद सबनीस

करंट इव्हेंट्सच्या ‘डीएनए’चा वास्तववादी लेखाजोखा

# ॲनालिटिका

# ॲनालिटिका

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर **खर्च** करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला **पुस्तके मिळणे बंद** होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

करंट इव्हेंट्सच्या ‘डीएनए’चा वास्तववादी लेखाजोखा

# अॅनालिटिका

श्रीपाद सबनीस

ई साहित्य प्रतिष्ठान

# ॲनालिटिका

लेखक : श्रीपाद सबनीस

ई-५०१, सुबल रेसिडेन्सी, श्रीकृष्ण कॉलनी, देवकर पाणंद,

कोल्हापूर. (महाराष्ट्र)

Email : s4shripad@gmail.com

Mobile : 99605 42605

ब्लॉग : shreepadsabnis.blogspot.in

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशन ई साहित्य प्रतिष्ठान :

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : १६ मे २०१८

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

शुभेच्छासंदेश

दैनिकभास्कर

प्रिय, श्रीपाद सबनीश जी

आपका पत्र प्राप्त हुआ। यह जानकर प्रसन्नता हुई कि आप एक ईबुक का प्रकाशन कर रहे हैं। इसमें चुनिंदा आर्टिकल देश की राजनीतिक , सामाजिक और आर्थिक स्थिति को वर्णित करने वाले होंगे।

ई-बुक के प्रकाशन पर आपको बहुत-बहुत शुभकामनाएं।

धन्यवाद,
सुधीर अग्रवाल

# मनातले दोन शब्द

सर्वसामान्यांचं जगणं म्हणजे अखेरच्या श्वासापर्यंतचा अविश्रांत संघर्ष!!



अनंत अभावांचे पावलोपावली खळगे आणि नानातऱ्हेच्या समस्यांच्या काट्याकुट्यांतून त्यांची जगरहाटी पुढं सरकत असते. हे खळगे बुजवत, काट्यांचा फुफाटा बाजूला सारत पुढं जायचं म्हणजे अव्दितीय संघर्षच!! हा संघर्ष अनुभवत असतानाच चिकित्सकपणे त्याचं मूळ शोधणं ओघानं आलंच. कवीश्रेष्ठ सुरेश भटांनी म्हटलं आहे,

एक साधा प्रश्न माझा, लाख त्याची उत्तरे,

हे खरे की, ते खरे की, ते खरे की, ते खरे!!

असंख्य प्रश्नांच्या मुळाशी जात त्यावरील उत्तरे शोधणं हे नकळत क्रियमान झालं आणि वृत्तीही तशीच बनली. हाच एक आवडीचा विषय आणि ध्यास झाला. जणू हा एक कवडसा; पुढे पत्रकारितेच्या माध्यमातून स्वत:चं क्षेत्र

विस्तारत राहिला. समरसता आणि न्याय विकासासाठी सकारात्मकतेची पेरणी करणाऱ्यांच्या वाट्याला जसा प्रशंसेचा हार माझ्या लेखणीने दिला, तसाच कधी झारीतले शुक्राचार्य, दांभिकता, अन्याय-अत्याचार आणि दुष्प्रवृत्तीवर प्रहार देखील केला. या वैचारिक दिंडीत अनेक समविचारी मित्र, मार्गदर्शक भेटले; त्यामुळे पत्रकारितेच्या क्षेत्रातील वारकरी होण्याचा आत्मिक आनंद मला घेता आला.

सन १९८८. मराठवाड्यातील अग्रेसर दैनिक अशी ओळख असलेल्या 'अजिंठा'चा तालुका वार्ताहर या नात्याने बातमीदारीची सुरू केलेली मुशाफिरी देशोन्नती (अकोला), केसरी (सोलापूर) मध्ये काही काळ रमली. मात्र १९८९ ने या बातमीदारीला एका टर्निंग पॉइंटवर आणून उभं केलं. गोदातीर समाचार (नांदेड), मराठवाडा (लातूर) मधून संपादकीय विभागातील निरनिराळ्या डेस्कवरील वावर वाढला. इथल्या अनुभवाने माझ्या करियरची खऱ्या अर्थाने पायाभरणी केली. त्यानंतर तरूण भारत (सोलापूर), देवगिरी तरूण भारत (औरंगाबाद) मध्ये संपादकीय डेस्कच्या कामातील समरसता अनुभवली, आणि पुढे लोकपत्र (नांदेड), जळगाव टाइम्स (जळगाव), कृषीवल (अलिबाग), मराठवाडा (औरंगाबाद), देशदूत (नाशिक, जळगाव), पुढारी (कोल्हापुर, पुणे), लोकमत (पुणे, मुंबई) असा प्रवास करीत माझ्या पत्रकारितेची पालखी दिव्य मराठीच्या निमित्ताने औरंगाबादेत पोहोचली. सातत्याने सामाजिक, राजकीय, आर्थिक विषयांची हाताळणी करणारी माझी लेखणी व्यवस्थेतील चुकांवर केवळ प्रहार करून थांबली नाही; तर त्या टाळण्यासाठी, दुरूस्त करण्यासाठी काय करता येईल याचेही दिशादर्शन करीत असते हेच तिचं ठसठसीत उठून दिसणारं वेगळेपण. अर्थातच माझ्या बातमीदारीत

आणि स्तंभलेखनात कायम सामान्य माणूस केंद्रस्थानी राहिला, किंबहुना तसा प्रयत्न सातत्याने केला. संपादकीय स्तंभातील निवडक लेखांनी पुस्तकाचे रूपडे आता धारण केले आहे, ते माझ्या लेखनशैलीवर निखळ, निस्सीम प्रेम करणाऱ्या वाचकांची प्रेरणा आणि हितचिंतकांच्या आग्रहामुळे !!

या लेखांवर आपल्या प्रतिक्रिया जाणून घ्यायला, वाचकांच्या मनातले दोन शब्द ऐकायला मनापासून आवडेल.

श्रीपाद सबनीस
ई-५०१, सुबल रेसिडेन्सी, श्रीकृष्ण कॉलनी, देवकर पाणंद,
कोल्हापूर. (महाराष्ट्र)
Email : s4shripad@gmail.com
Mobile : 99605 42605
ब्लॉग : shreepadsabnis.blogspot.in

अर्पण पत्रिका

माझ्या लेखन कौशल्यावर निखळ प्रेम

करणाऱ्या तमाम वाचक मित्रांना समर्पित...

श्रीपाद सबनीस

आभार…

मनातलं सगळं स्तंभलेखनात उतरवण्यापासून त्यास पुस्तकाचं रूप येईपर्यंतच्या प्रत्येक टप्प्यावर अनेक जाणत्या सुहृद मित्रांनी, सहकाऱ्यांनी, व्यासंगी वाचकांनी मनापासून खूप-खूप मदत केली. अनेक अभ्यासकांनी, मित्रांनी दिलेल्या प्रेरणेमुळे ‘दिव्य मराठी’तील माझ्या स्तंभ लेखनाला पुस्तकाचं साजरं रूप मिळालं आहे. यापुढील वाटचालीत देखील आपणा सर्वांचे मैत्र कायम राहो!!

# अनुक्रम...


का, मिळत नाही हमी भाव?

‘आयटी’तील नोकऱ्यांवर गंडांतर

लष्करातही सुधारणावाद

अन्न हेच पूर्णब्रम्ह

सुकमाचा धडा

गोळेगाव पॅटर्न : वॉटर बजेट

दिल रूहानी!

दहशतखोरांचा वर्चस्ववाद

बियाण्यांचा बादशहा

खूनी गेम्सचा फास

बढतीचा वांदा

शर्यतीच्या गाड्याला वेसण

खेळखंडोबा

‘रेरा’ पॅनलची मध्यस्थी

पक्षीय हुकूमशाहीचे सावट

रोबो : यंत्र नव्हे नागरिक

राजमुकुटातील काटे

राजनैतिक विजय

अभिजात मराठी

‘असोशी’ आणि ‘नकुशी’

‘सीएं’वर नियंत्रण का हवे?

पाऊसमानाचा पॅटर्न

विषारी वायूचा विळखा

महासत्तेच्या पाऊलखुणा

मुले का हिंसक होतात?

ड्रॅगनची दादागिरी

म्हणे, प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र!

सुजलाम् महाराष्ट्र!

हवामानाचा धसका, शेतकऱ्यांची तारांबळ

प्रस्तावना

# सजग आणि चतुरस्त्र!

‘करंट अपडेट’ हे कोणत्याही युगात महत्वाचे असतात. अगदी दुसऱ्या सेकंदाला जरी माहिती, घटना तंत्रज्ञानामुळे आपल्या पर्यंत येत असली तरी त्या माहितीला ज्या स्वरुपात आपल्यापर्यंत जे कोणी पाठवत असतात ते किती सखोल आणि तात्काळ त्याचा अभ्यास, संशोधन करून आपल्यापर्यंत ते पोहोचवतात याचे नेहमीच सर्वांना कौतुक असते आणि आश्चर्य वाटत असते. माध्यम जगतात असा अतिजलदपणा आणि भान सगळयांकडून अपेक्षित असले तरी मात्र ते सगळयांकडे असतेच असे नाही. श्रीपाद सबनीस यांच्याकडे हे गुण असल्यानेच ते सातत्याने शेकडो विषयावर तात्काळ लिहू शकले आणि वाचकांची ज्ञानतृष्णा शमवू शकले हे या संग्रहाच्या निमित्ताने आवर्जून सांगितले पाहिजे. मुद्रित माध्यमात अनेक प्रकारचे लेखक, माहिती संकलक असतात, काहीजण माहितीचा खजिना बाळगून असतात पण हा खजिना वाचकांच्या पुढे रिता करण्याची हातोटी फार मोजक्याच लोकांकडे असते या निवडक लेख संग्रहाचे लेखक त्यापैकी आहेत. गेल्या ३० वर्षापासून मुद्रित माध्यमात काम करण्याच्या अनुभवामुळे कोणत्याच विषयाचे वावडे न ठेवता प्रत्येक विषयावर त्यांनी मनोभावे लिहिले आहे. यातून त्यांच्या लेखणीची सजगता, चतुरस्त्रता आणि आटोपशीरपणा दिसून येतो. कोणत्याही वृत्तपत्रात बातम्या व्यतिरिक्त काही स्फुटे, सदरे असावी लागतात. बातम्यांमध्ये जी माहिती येत नाही ती अशा स्फुट लेखनामार्फत वाचकांना दिली जाते. अशा लेखनास ठराविक जागा दिली जाते आणि ती न कंटाळता संपादकीय विभागास भरून काढावी लागते.

स्थानिक, प्रादेशिक, राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय घटना, मुद्दे, वाद, निवेदने अशा विषयावर स्फुट किंवा सदरातून लिहावे लागते. 'करंट अफेअर्स' हा तसा नेहमीच सामान्य ज्ञानाच्या अंगाने जाणारा विषय मानला जातो आणि त्याचा वाचक वर्ग मोठा आहे हे लक्षात ठेवूनच काही वृत्तपत्रांनी करंट अपडेटची सदरे वेगवेगळया रुपात ठेवलेली असतात. त्यात दर महिन्याला प्रकाशित होणारी पुस्तके, चित्रपट, देश विदेशातील महत्वाच्या संस्थामधील बदल, भारतीय वंशाच्या व्यक्तीच्या झालेल्या नेमणुक, त्यांचे कौतुक, मान्यवर पुरस्कारार्थी, 'एनजीओ'चे काम, वादग्रस्त खटले, प्रांता-प्रांतातील भांडणे, काही धोरणात्मक निर्णय, एखाद्या गावाची यशोगाथा अशा कितीतरी विषयाची ओळख, त्याच्या चहूबाजूंनी स्फूटलेखनात येते. काहीवेळा संपादकिय टिपणीसुद्धा या विषयामध्ये येवू शकते. सबनीस यांनी अशी टिपणी केली आहे. 'करंट अपडेट' हे नुसते माहितीवजा असून उपयोगाचे नाही त्यात, त्या-त्या वृत्तपत्राच्या धोरणानुसार टिपणी असावी लागते. कारण हे स्फुटलेखन संपादकिय विभागाचे म्हणूनच वाचक ओळखत असतात. याचा दुसरा अर्थ संपादकिय किंवा अग्रलेख लिहिणाऱ्या संपादकांचा आणि अशा स्फूट लेखकांचा समन्वय असणे गरजेचे असतेच तो या संग्रहातील सर्व विषयामध्ये दिसून येतो.

श्रीपाद सबनीस यांनी रेरा पॅनेल, पक्षीय हुकूमशाहीचे सावट, हसन रुहानी, सीडमॅन बद्रिनारायण बारवाले, सुजलाम् महाराष्ट्र, बैलगाडा शर्यती, गोळेगाव पॅटर्न, पुतीन यांची राजवट, इसीस, सुनिल केंद्रेकर यांची बदली, जलक्रांती, सहकारी बँका, सुरक्षा परिषद आणि न्या. दलवीर भंडारी, सौदी युवराज मोहम्मद बिन सलमान, कृत्रिम बुद्धिमत्ता, ब्लू व्हेल, मुले हिंसक का होतात?, ड्रॅगनची दादागिरी, म्हणे प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अशा अनेक महत्वाच्या

विषयावर जे दैनिकात लिहिले, त्यांच्या ब्लॉगमध्ये लिहिले ते सारे लेखन त्यांनी या ई-संग्रहात समाविष्ट केलेय. विषय अनेक असतात, वेगवेगळया स्वरुपात त्याची माहितीसुद्धा पोहोचत असते अशा वेळी वाचकांना नेमके काय द्यायचे आणि त्याची जिज्ञासा शमवायची याचा निर्णय सदरकर्त्यास घ्यावा लागतो, इथे सबनीस यांनी तो अचूकपणे घेतल्याने त्यांचे विविधांगी लेखन अचूक आणि नेमके झालेय, माहितीचा फाफटपसारा त्यांनी टाळला आहे. भाषासुद्धा त्यांनी ओघवती आणि सोपी ठेवलीय. काही मराठी शब्द त्यांनी जाणीवपूर्वक निवडलेत ते चांगलेच वाटतात. त्यांची लेखणी अनेकदा स्पष्टपणे टीका करते. विशेषतः राज्य शासनाच्या शाळा बंद करण्याच्या निर्णयावर प्रारंभीच भूमिका घेतात ती अशी " डिजिटल शाळा, ई-लर्निंगसंदर्भात लोकसहभागावर भर देणाऱ्या राज्य सरकारला खऱ्या अर्थाने 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र' घडवायचा का? असेल तर ५००२ शाळा बंद (स्थलांतर) करण्याच्या निर्णय प्रक्रियेत लोकसहभाग का घ्यावासा वाटला नाही? हा कळीचा मुद्दा आहे. २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांची आवश्यकता तपासण्याचे; तसेच राज्यात १ ते १० आणि ११ ते २० पटसंख्या असलेल्या सर्व शाळांची संख्या आणि सर्व मुलांच्या अध्यापनाचा दर्जा, गुणवत्तेची स्थिती फारशी समाधानकारक नसल्याचे २०१५ च्या वित्तीय श्वेतपत्रिकेत नमूद केले आहे. परंतु शाळांच्या दर्जाविषयी कोणतेही विधान त्यात नाही. म्हणूनच राज्यभरातील पायाभूत चाचण्यांची सरासरी समाजासमोर मांडावी, मगच सरकारने गुणवत्तेची विधाने करावीत. " हेच लेखक डोनाल्ड ट्रम्प यांच्या व्हिसा धोरणावर भारतीय दृष्टिकोन सांगताना म्हणतात, 'अमेरिकेतील ग्राहकांना सेवा देण्यासाठी भारतातून तंत्रज्ञ पाठवण्याऐवजी स्थानिक पदवीधरांची भरती करणे, मनुष्यबळाची गरज

कमी करण्यासाठी कामाचे यांत्रिकीकरण करणे, पारंपरिक सेवा देण्याऐवजी क्लाउड कॉम्प्युटिंग तसेच आर्टिफिशियल इंटेलिजन्स सारख्या सेवा पुरवणे, ज्याप्रमाणे इन्फ़ोसिसने नोआ कन्सिल्टग आणि कॅलिडस् टेक्नॉलॉजीज् या कंपन्या विकत घेतल्या तसे अन्य अमेरिकी कंपन्या विकत घेणे अशा काही पर्यायांसाठी भारतीय कंपन्यांनी तयारी केली आहे. अमेरिकेतील स्थलांतरीत भारतीयांच्या नोकऱ्यांवरील गंडांतराची ही नांदी म्हटली तर वावगे ठरू नये. ' ही दोन उद्धरणे यासाठी कि करंट अफेअर्स उलगडून सांगताना श्रीपाद सबनीस संपादकीय भूमिकेतून टिप्पणीसुद्धा करतात आणि सूचनासुद्धा !

वृत्तपत्रीय लेखनास कालमर्यादा असतात हे खरे पण 'करंट अफेअर्स' हा विषय स्पर्धा परिक्षांमध्ये महत्वाचा असतो, त्या अनुषंगाने श्रीपाद सबनीस यांच्यासारख्या चतुरस्त्र पत्रकाराला या विषयांची आणि आपल्या वाचकांची नाडी सापडलीय असे म्हणता येईल. त्यांचे आणखी एका कारणासाठी अभिनंदन केले पाहिजे, ते म्हणजे मुद्रित माध्यम समूहात काम करूनसुद्धा त्यांनी आपला निवडक लेख संग्रह 'ई-बुक' च्या स्वरुपात काढलाय. आपल्या व्यवसायाला शोभेल आणि कालसुसंगत ठरेल असेच 'ई-बुक'चे माध्यम त्यांनी निवडलेय. श्रीपाद सबनीस यांच्याकडून उत्तरोत्तर अधिक चांगले लेखन घडो अशी शुभेच्छा !

निशिकांत भालेराव,

माजी संपादक, ज्येष्ठ लेखक

# का, मिळत नाही हमी भाव?

> गेल्या ३० वर्षात शेतीचा पोत आणि लागवडीची पीके कमालीची बदलली. शेतकऱ्यांसाठी वर्षभर बेगमी ठरणारी अनेक पीके कालबाह्य झालीत. राज्यात ऊस वगळता अन्य पिकांची उत्पादकता कमी झाल्यामुळे शेतीचा उत्पादन खर्च वाढत असला तरी पुरेसा हमी भाव मिळत नाही.

महागाईच्या वणव्यात होरपळ सुरू असतानाच एकिकडे व्यापाऱ्यांनी कांद्याचा भाव पाडून उत्पादकांना भिकेला लावले तर दुसऱ्या बाजूला जीवनावश्यक धान्य, वस्तूंचे दर दुपटीने वाढवून ग्राहकांची लुबाडणूक सुरू केली. तूर, मूग, कापूस, ज्वारी तसेच अन्य धान्यासाठी खरेदीचा हमी भाव जाहीर करणाऱ्या सरकारने शेतमाल खरेदी केंद्रे तातडीने सुरू केली नसल्याचा नेमका फायदा उठवत व्यापाऱ्यांनी हमी भावापेक्षा कमी दराने शेतमाल खरेदी करून लाखो रूपयांना शेतकऱ्यांना लुबाडले. याच अन्नदात्याची, मजूर आणि मध्यमवर्गियांची नोटाबंदीच्या रूपाने सुरू झालेल्या अर्थक्रांतीमुळे पुन्हा आर्थिक कोंडी होत आहे. एरव्ही उत्पादन खर्चापेक्षाही शेतमालाचा हमी भाव कमी ठेवणाऱ्या केंद्रिय कृषी मूल्य आयोगाने चालू वर्षी चांगला हमी भाव देणारा अहवाल केंद्रीय मंत्रिमंडळाकडे पाठवला. हा अहवाल मंजूर झाला तर कदाचित शेतकऱ्यांच्या मूळ समस्यांचे उत्तर मिळू शकेल. उल्लेखनिय म्हणजे गतवर्षीच्या तुलनेत हमी भावात २० ते ५२ टक्के इतकी वाढीची शिफारस करण्यात आली. समजा, या शिफारसींची अंमलबजावणी झाली तरी

शेतकऱ्यांचे दारिद्र्य दूर होईल का? हा मूळ प्रश्न शिल्लक राहतोच. एक मात्र खरे की; भात, ज्वारी, बाजरी सारख्या पिकांच्या लागवडीपासून परावृत्त झालेले शेतकरी पुन्हा त्याकडे वळू लागतील अशी आशा बाळगायला हरकत नसावी. या किंबहुना तत्सम पिकांचा पेरा कमी झाल्यामुळे आपोआपच हमी भाव गडगडला, याचा परिणाम चारा निर्मितीवर झाला. पुरेशा चाऱ्याअभावी गुरे मृत्युमुखी पडू लागली. तात्पर्य असे की, कृषी मालास उत्पादन खर्चापेक्षा कमी भाव मिळाल्याने काय स्थिती निर्माण होऊ शकते याचे हे एक बोलके उदाहरण ठरावे.

गेल्या काही वर्षापासून नगदी पीक म्हणून पांढरे सोने अर्थातच कापसाला शेतकऱ्यांनी प्राधान्य दिले. मात्र जोरदार झालेला परतीचा पाऊस, माव्या पाठोपाठ आलेल्या तुडतुड्याने कापसावर अवकळा आली. कापसाची खरेदी शासनाने जाहीर केलेल्या हमी भावात केली जात असली तरी कापूस ओला असल्याचे कारण सांगून व्यापारी शेतकऱ्यांना वेठीस धरत आहेत; तर दुसऱ्या बाजूला नोटबंदीचा वापर देखील व्यापारी खुबीने आपल्याच हितासाठी करून घेत आहेत. एकंदरीत शेतकऱ्यांची लूट थांबवण्याकडे बाजार समिती किंवा प्रशासकाचे लक्ष नसल्यामुळे शेतकऱ्यांना कोणी वाली नाही, असेच दिसू लागले आहे. एकूणच या पार्श्वभूमीवर शेतमालाची खरेदी हमी भावानेच झाली पाहिजे, शेतकऱ्यांना हमी भाव न देणाऱ्यांवर फ़ौजदारी कारवाई करण्याचा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांना द्यावा लागला असावा. केंद्रिय अर्थमंत्री अरूण जेटली यांनी देखील ई-मार्केटचा पुरस्कार केला; असे असले तरी प्रत्यक्षात शेतकऱ्याचे मूळ प्रश्न काही सुटत नाहीत. त्याचे प्रमुख कारण म्हणजे ५५ टक्के लोक शेतीवर अवलंबून असले तरी राज्याच्या सकल उत्पन्नात शेतीचा वाटा ११ टक्के आहे. शेतीमधील उत्पादकता वाढवण्याबरोबरच त्यातील गुंतवणूक देखील वाढायला हवी. दिवसेंदिवस दरडोई शेतीचे क्षेत्र कमी होत असून मजुरांच्या कमतरतेमुळे यांत्रिकीकरण करावे लागणार

आहे. म्हणूनच समूह अर्थातच गट शेतीचा विचार प्राधान्याने करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. स्वामीनाथन् आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी केल्याने शेतकऱ्यांचे सगळे प्रश्न चुटकीसरशी सुटतील असे सांगितले जाते, प्रत्यक्षात ते शक्य आहे का? यावर एकदा शांतपणे विचार का करू नये? एकतर जागतिकीकरण आणि उदारीकरणाच्या चरकात सापडलेला शेतकरी आजही भरडून निघतोय्. १९९२ साली गॅट करारावर शिक्कामोर्तब केल्यानंतर शेतमालाच्या किंमतींना फटका बसला ही वस्तुस्थिती आहे. दुसरा महत्वाचा भाग म्हणजे राज्यात ऊस वगळता अन्य पिकांची उत्पादकता कमी आहे आणि हीच आमच्या शेतकऱ्यांची दुखरी जखम आहे. त्यावर नेमका उपाय केला की, आज भेडसावणाऱ्या समस्यांची तीव्रता निश्चितच कमी होऊ शकेल. मुळात सरकार कोणत्याही पक्षाचे किंवा कोणाच्याही नेतृत्वाखालचे असले तरी प्रत्येक राज्यासाठी स्वतंत्र किमान आधारभूत किंमत (हमी भाव) लागू होत नाही, हे वास्तव कोणीही नाकारू शकत नाही. मात्र शेतकऱ्यांना स्वामिनाथन् आयोगाच्या शिफारसींच्या भ्रमात गुंडाळले जाते आणि इथेच त्याची फसगत होते परिणामी तो आत्मक्लेष, आत्महत्येच्या विचारात गुरफटतो. यावर उपाय एकच, तो म्हणजे राजकीय स्वार्थाने रुजवलेला भ्रमाचा भोपळा स्वत:हून शेतकऱ्यांनीच फ़ोडला पाहिजे.

# ‘आयटी’तील नोकऱ्यांवर गंडांतर

डोनाल्ड ट्रम्प यांनी एच-१ बी व्हिसावर निर्बंध घालण्याची भूमिका घेतल्यामुळे अमेरिकेतील ‘आयटी’ क्षेत्रात कार्यरत असलेल्या भारतीयांच्या नोकऱ्यांवर गंडांतर आले आहे. किमान २० टक्के नोकरकपातीची शक्यता वर्तवली जात आहे.

अमेरिकेला महान आणि अधिक वैभवशाली देश बनवण्याचा मनोनिर्धार करीत राष्ट्राध्यक्षपदाचे नवनिर्वाचित उमेदवार डोनाल्ड ट्रम्प यांनी परदेशी नागरिकांचे स्थलांतर रोखण्यावर तसेच व्यापारी आणि आर्थिक निर्बंधावर भर देण्याचा पवित्रा जाहीर केला. अर्थातच ट्रम्प यांची भूमिका राजकीय हेतूने प्रेरित असली तरीही त्यामुळे जगभरातील विशेषत: आयटी, वाहन, पोलाद उद्योगाशी संबंधित घटकांमध्ये साहजिकच खळबळ उडाली. त्यांचा रोख चीनवर असला तरी त्याचा परिणाम भारतावर होऊ जात आहे. तूर्तास ट्रम्प यांची ही भूमिका प्रत्यक्षात अंमलात येणे कठीण आहे, असे म्हटले जात असले तरी अमेरिकेत रुजलेल्या भारतीय ‘आयटी’ उद्योगाने तशी शक्यता गृहीत धरून सुधारणावादी मार्ग अंगिकारला आहे. खरोखरीच एच-१ बी व्हिसा आणि आऊटसोर्सिंगवर निर्बंध लादले तर भारतातील ‘आयटी’ उद्योगाला तसेच विदेशी गंगाजळीला जबर फटका बसणार हे निश्चित. देशभरातून दरवर्षी सुमारे ६८ हजार तरूणांना विशेष मनुष्यबळाच्या अंतर्गत अमेरिकेत एच-१बी व्हिसा मिळतो. एकट्या औरंगाबादमधले सुमारे ३०० तरूण सध्या तिथे आयटी क्षेत्रात कार्यरत आहेत. मुंबई-पुण्यातून साधारणपणे दरवर्षी ३ हजार तरूण जात असतात.

कौशल्यप्राप्त आणि कार्यक्षमतेत सरस असलेल्यांना कामावर घेण्याशिवाय अमेरिकेकडे पर्याय नसला तरी अमेरिकेतील स्थलांतरीत भारतीय सध्या काळजीत आहेत; कारण किमान २० टक्के भारतीयांना ट्रम्पच्या भूमिकेचा फटका बसू शकतो. ट्रम्प यांचा इशारा राजकीय मानला तरी त्यामागची पार्श्वभूमी इथे विचारात घेतली पाहिजे. उदाहरणच घ्यायचे तर डिस्ने वर्ल्ड आणि काही कंपन्यांत एच-१बी व्हिसा असलेल्यांनी नोकऱ्या पटकावल्या त्यामुळे स्थानिकांची हकालपट्टी झाली. याप्रकरणी दोन आयटी कर्मचाऱ्यांनी खटला भरला. डिस्ने वर्ल्डने २५० स्थानिक कर्मचाऱ्यांच्या हाती नारळ दिला होता हे उल्लेखनिय ठरावे. लिओ पेरेरो आणि डेना मूर या कंपन्यांनीही असाच कित्ता गिरवला, याशिवाय एचसीएल इन्कॉर्पोरेशन आणि कॉग्निझंट टेक्नॉलॉजिज् या कंपन्यांविरोधातही दावे दाखल झाले आहेत. एकंदरीत स्थलांतरीत नोकरदारांनी स्थानिकांची रोजीरोटी हिरावून घेतली, त्यामुळे निर्माण झालेल्या असंतोषाला वाट मोकळी करून देणे गरजेचे होते, ते ट्रम्प यांनी केले.

भारतीय आयटी कंपन्यांचा अमेरिकेतील एकूण उद्योग सुमारे १५० अब्ज डॉलर्सचा आहे. टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस, विप्रो, इन्फ़ोसिस यांसारख्या कंपन्यांनी भारतातून २००५-२०१४ याकाळात सुमारे ८६ हजार तंत्रज्ञ अमेरिकेत पाठवले. कारण अमेरिकन कर्मचारी महिनाभरात १६० तास काम करतो, त्यासाठी किमान ४ हजार डॉलर्स मोबदला द्यावा लागतो तर भारतीय किंवा अन्य विदेशी कर्मचारी २०० तासांपेक्षा अधिक काम ३३०० डॉलर्समध्ये करतो. विशेषत: या कंपन्यांच्या नफ्याचा मोठा वाटा तेथूनच येतो. भारतीय आयटी क्षेत्र हे अमेरिकेवर अवलंबून आहे. २०१४-१५ मध्ये या क्षेत्रात जी निर्यात झाली त्यातून ८२ अब्ज डॉलर्स भारताने कमावले त्यापैकी सर्वात मोठा वाटा अमेरिकेकडून मिळाला होता. अमेरिकेने एच-१बी व्हिसाची फी २ हजार डॉलर्सवरून ४ हजार डॉलर्सवर नेली त्यामुळे भारतीय आयटी उद्योगाला ४०० दशलक्ष डॉलर्सचा फटका बसला हे इथे

उल्लेखनिय ठरावे. व्हिसापेक्षाही स्थलांतरावरील निर्बंध अधिक गंभीर परिणाम घडवतात. विदेशातील भारतीयांकडून येणारा पैसा हा उत्पन्नाचा स्त्रोत असतो; २०१२ साली अनिवासी भारतीयांनी ७०. ३९ अब्ज डॉलर्स पाठवले होते. एकूण जीडीपीमध्ये हे प्रमाण ४% भरते. त्यातील ११ अब्ज डॉलर्स हे अमेरिकेतील भारतीयांकडून आले होते. २०१६ मध्ये भारताच्या विदेशी गंगाजळीत ५% घट होईल, ती ६५. ५ अब्ज डॉलर्सवर येईल असे जागतिक बँकेच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे; हा धोक्याचा इशाराच म्हणावा लागेल.

भारताचा जगभरातील दुसऱ्या क्रमांकाचा व्यापारी भागीदार अमेरिकाच असून सध्याचा व्यापार दोघांनाही ५०० अब्ज डॉलर्सवर घेऊन जायचा आहे. त्यासाठी माहिती-तंत्रज्ञान, विज्ञान-तंत्रज्ञान, संरक्षण आणि व्हिसा यासंदर्भातील धोरणे अधिक महत्वपूर्ण ठरतात. एच-१बी व्हिसावर नियंत्रण आले तर भारतीय कंपन्यांना कार्यप्रणाली बदलावी लागेल म्हणूनच नवी रणनिती आखली जात आहे. त्याचाच भाग म्हणून अमेरिकेतील ग्राहकांना सेवा देण्यासाठी भारतातून तंत्रज्ञ पाठवण्याऐवजी स्थानिक पदवीधरांची भरती करणे, मनुष्यबळाची गरज कमी करण्यासाठी कामाचे यांत्रिकीकरण करणे, पारंपरिक सेवा देण्याऐवजी क्लाउड कॉम्प्युटिंग तसेच आर्टिफिशियल इंटेलिजन्स सारख्या सेवा पुरवणे, ज्याप्रमाणे इन्फ़ोसिसने नोआ कन्सिल्टग आणि कॅलिडस् टेक्नॉलॉजीज् या कंपन्या विकत घेतल्या तसे अन्य अमेरिकी कंपन्या विकत घेणे अशा काही पर्यायांसाठी भारतीय कंपन्यांनी तयारी केली आहे. अमेरिकेतील स्थलांतरीत भारतीयांच्या नोकऱ्यांवरील गंडांतराची ही नांदी म्हटली तर वावगे ठरू नये.

# लष्करातही सुधारणावाद

> लष्कर आणि एकूणच संरक्षण क्षेत्राच्या आधुनिकीकरणासाठी खर्च करायचा असेल तर आर्थिक सुधारणा अमलात आणण्याशिवाय केंद्र सरकारकडे पर्याय नाही, हे निश्चित. 'चीफ आॅफ डिफेन्स स्टाफ' या पदाची निर्मिती हे त्याचेच एक पाऊल ठरावे.

उत्तराखंडमधील डेहराडूनमध्ये अलीकडेच कमांडर दर्जाच्या अधिकाऱ्यांचे संयुक्त संमेलन पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षणमंत्री मनोहर पर्रीकर यांच्यासह तिन्ही सेनादल प्रमुखांच्या उपस्थितीत पार पडले. या संमेलनात भूदल, नाैदल आणि हवाई दल या तिन्ही सेनादलांसाठी एकच लष्करप्रमुख नियुक्त करण्याच्या दृष्टीने बरीच खलबते झाली. त्यासाठी 'चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ' असे नवे पद निर्माण केले जात आहे. अर्थातच तिन्ही सेनादलांमधील प्रशिक्षण, समन्वय तसेच नियोजनाच्या दृष्टिकोनातून ते अधिक उपयुक्त ठरू शकेल. बहुधा वर्षअखेरपर्यंत या पदाला मंजुरी देण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारने हालचाली सुरू केल्या आहेत. सध्या भूदलातील मनुष्यबळ १२ लाख ५० हजार, नाैदलात ५० ते ६० हजार आणि हवाई दलात १ लाख इतके आहे. त्यामुळे साहजिकच तिन्ही सेनादलांचे प्रमुखपद भूदल प्रमुखांकडे जाऊ शकते. हवाई आणि नाैदल प्रमुखांना असे वाटणे हेदेखील स्वाभाविकच ठरते. एक मात्र खरे की, 'चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ'मुळे तिन्ही सेनादलांसाठी एकत्रित विचार करून धोरण

आखले आणि राबवले जाऊ शकते. इतकेच नव्हे तर भविष्यात देशासमोर कोणता धोका आहे, यावर विचार करून तिन्ही दले एकत्र लढली तर त्याचा देशालाच फायदा होऊ शकतो; याशिवाय व्यवस्थापन, दुरुस्ती, वाहतूक अशा स्वरूपाचे खर्च आणखी कमी होतील हे खरेच. भारतीय लष्कराचे बजेट साधारणपणे साडेतीन लाख कोटी रुपयांचे असूनदेखील नवीन विकास प्रकल्प राबवण्यासाठी किंवा आधुनिकीकरणासाठी पुरेसा निधी शिल्लक राहत नाही. त्याचे मुख्य कारण म्हणजे या बजेटमधील मोठी रक्कम आस्थापनेवर खर्च होते त्यापाठोपाठ दारूगोळा आणि काही नवी उत्पादने खरेदी करण्यासाठी कामी येते. एकंदरीत काय तर लष्कर आणि एकूणच संरक्षण क्षेत्राच्या आधुनिकीकरणासाठी खर्च करायचा असेल तर आर्थिक सुधारणा अमलात आणण्याशिवाय केंद्र सरकारकडे पर्याय नाही, हे निश्चित. ‘चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ’ या पदाची निर्मिती हे त्याचेच एक पाऊल ठरावे. केंद्र सरकार आणि सेनादलातील हा दुवा ठरावा; जेणेकरून आपल्यावर अन्याय होत नसल्याची खात्री पटावी. विशेषत: हे पद जर रोटेशन पद्धतीने सेवाज्येष्ठता तथा निर्णय आणि कार्यक्षमता यांचा सारासार विचार करून तिन्ही दलांकडे सोपवले गेले तर कुणावर अन्याय होणार नाही. महत्त्वाचे म्हणजे या पदावरील व्यक्तीचे सेनादलाशी कुठलेही वैयक्तिक संबंध प्रस्थापित होणार नाहीत, यासाठी काळजी घेतली जावी. कदाचित हा धोका ओळखूनच पं. नेहरू आणि कृष्ण मेनन यांनी जनरल करिअप्पा यांच्या निवृत्तीनंतर ‘कमांडर इन चीफ’ हे पद रद्द केलं. तेव्हा लष्करी निर्णय प्रक्रिया तिन्ही दलांत विभागताना सरसेनापतींना विश्वासात घेतले गेले नव्हते, हे इथे उल्लेखनीय ठरावे.

मात्र एकीकडे तिन्ही सेनादलांमध्ये समन्वय वाढवण्याचा प्रयत्न या सुधारणावादाच्या निमित्ताने होत असला तरी लष्कर आणि निमलष्कर यांच्यातील दरी मिटवण्याचीदेखील अपरिहार्यता वाढत चालली आहे. कैक वर्षांपासून

निमलष्करी जवानांच्या मनात ठसठसणारी खदखद सोशल मीडियाच्या माध्यमातून बाहेर येत आहे. ती खदखद चिरडून टाकण्यापेक्षाही त्या समस्यांचे अस्तित्व मान्य करून सोडवण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे ठरते. कारण समस्येचे अस्तित्वच नाकारणे हा काही ती समस्या सोडवण्याचा मार्ग ठरू शकत नाही. मुळात जवानांच्या संख्येचा विचार केला तरी आपले निमलष्करी दल जगात पाचव्या क्रमांकाचे असून १० लाखांपेक्षाही अधिक जवान आहेत. म्हणूनच निमलष्करी दलाचा आकार महाप्रचंड असल्यामुळे लष्कराप्रमाणेच त्यांच्याविषयीदेखील विचार होणे गरजेचे ठरते. लष्करी जवान सीमेवर लढतात म्हणून त्यांना जी शस्त्रास्त्रे, रसद, मदत, सुविधा मिळते तशी निमलष्करी जवानांना मिळत नाही. उलट देशांतर्गत उपद्रवी शक्तींचा बीमोड करणे त्यापेक्षा कठीण होऊन बसले आहे, नक्षलवादविरोधी तसेच अन्य मोहिमांतून ते दिसून आले. म्हणूनच ही दरी मिटवण्याची गरज आहे. काँग्रेसच्या कार्यकाळापेक्षाही सोशल मीडियाची साधने भाजपच्या शासनकाळात अधिक सशक्त झालीत. त्याच्या उपयुक्ततेचा मोदी अनेकदा चतुराईने वापरदेखील करीत असतात. मात्र ही माध्यमे दुधारी अस्त्रासारखी काम करू शकतात हे निमलष्करी दलातील जवानांनी दाखवून दिले. सीमेवरील शत्रूपेक्षाही देशांतर्गत उपद्रवींशी लढणे अधिक जिकिरीचे असताना कुठलीही सक्षम साधने आणि मदतीशिवाय निमलष्करी जवान परिस्थितीवर मात करीत असतात ही बाब सहजी दुर्लक्ष करण्यासारखी निश्चितच नाही. म्हणूनच निमलष्करी दलाच्या अपेक्षा, भावना चिरडून टाकण्यापेक्षा त्यांना लष्कराच्या मुख्य प्रवाहाशी जोडणे अधिक संयुक्तिक का ठरू नये? नवी व्यवस्था अमलात आणताना भाजपशासित केंद्र सरकारने यावर गांभीर्याने विचार का करू नये?

# अन्न हेच पूर्णब्रम्ह!

> अन्नधान्याची नासाडी रोखण्यासाठीच तर आपल्या संस्कृतीने त्यास पूर्णब्रम्ह या अर्थाने संबोधित केले. मात्र त्याकडे कानाडोळा केला जातो म्हणूनच आजही सुमारे २० कोटी लोक भुकेल्यापोटी राहतात, हे निश्चितच भूषणावह नव्हे. त्यासाठीच तर अन्नाची नासाडी ही राष्ट्रीय हानी ठरवणे गरजेचे आहे.

भारतीय संस्कृतीने अन्न हे पूर्णब्रम्ह मानले. मात्र दैनंदिन जीवनात आपण अन्नाला खऱ्या अर्थाने पूर्णब्रम्ह मानतो का? जागतिक क्रमवारीनुसार भुकेल्या देशांच्या यादीत भारत ६७ वा तर अन्न वाया घालवणाऱ्यांमध्ये सातव्या क्रमांकाचा देश ठरला आहे. आणि हे वास्तव नक्कीच सर्वांना सुन्न करणारे आहे. भारतासारख्या देशाचा विचार करता अन्नाची होत असलेली नासाडी हा मानवाधिकाराच्या दृष्टीनेदेखील गंभीर प्रश्न ठरतो. मुळात अन्न वाया घालवण्याने किंवा त्याची नासाडी केल्यामुळे अनेक नैसर्गिक स्त्रोतांचीदेखील नासाडी होते, याकडे कुणी लक्ष देत नाही. अन्नधान्याच्या उत्पादनासाठी वीज, पाणी, खते, कीटकनाशके, इंधन, मनुष्यबळ अशा कित्येक गोष्टींचा वापर केला जातो, त्यामुळे अप्रत्यक्षपणे त्याचीही नासाडी आपणच करतो की नाही? फेकून दिलेल्या अन्नातून ३. ३ अब्ज टन ग्रीन हाऊस गॅसची निर्मिती होते. शिजवलेले तांदूळ अर्थात ज्याला आपण भात म्हणतो त्यामुळे तर पर्यावरणाचे सर्वाधिक नुकसान होते. अन्नाची नासाडी रोखणे सहजी शक्य नसेलही, मात्र नियंत्रणात आणणे तितकेसे कठीण नाही, हे तितकेच खरे. 'फूड अँड

ॲग्रिकल्चर ऑर्गनायझेशन'ची आकडेवारी पाहता जगभरात १. ३ अब्ज टन अन्न वाया जाते. याचा अर्थ असा की, जागतिक अन्नधान्य उत्पादनाच्या एक तृतीयांश अन्न फेकून दिले जाते.

'सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन'च्या अहवालात लग्न, समारंभात अन्न मोठ्या प्रमाणावर वाया जात असल्याचे म्हटले आहे. तथापि, अन्नधान्याच्या उत्पादनात सातत्याने होत असलेली घट आणि वाढती दरवाढ लक्षात घेता ही नासाडी थांबवण्यासाठी अन्न आणि नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण विभागाने घेतलेला पुढाकार, केंद्र सरकार उभी करीत असलेली राष्ट्रीय चळवळ याशिवाय उल्लेखनीय म्हणजे शालेय अभ्यासक्रमात होत असलेला समावेश या बाबी दिलासादायक म्हणाव्यात. मात्र यापलीकडे जात न्यूयाॅर्कमधील भारतीय वंशाच्या अनुज झुनझुनवाला, मार्गरिट टंग आणि जेसाॅन चेन या संशोधकांनी अन्नाची नासाडी रोखण्यास आणि भुकेल्यांना अन्न मिळवून देण्यात मदत करणारे ॲप विकसित केले आहे. दरवर्षी १६५ अब्जांची होणारी अन्नाची नासाडी रोखण्यात हे ॲप मदत करेल, असा विश्वास अमेरिकेच्या नैसर्गिक साधन संरक्षण परिषदेने व्यक्त केला. मात्र प्रत्येकानेच कुटुंब पातळीवर काही वेगळे प्रयत्न केले तर निश्चितच अन्न सत्कारणी लागेल, हे नि:संशय. अन्नधान्याच्या बाबतीत भारत स्वयंपूर्ण असला तरी उत्पादित मालाची नासाडी परवडणारी नाही. भाज्या, फळांच्या उत्पादनात भारत दुसऱ्या क्रमांकावर आहे. मात्र शीतगृहे, वातानुकूलित वाहन सुविधा अशा पायाभूत बाबींचा अभाव त्यांच्या नासाडीला कारणीभूत ठरतो. 'इमर्सन क्लायमेट टेक्नॉलॉजीज इंडिया'च्या अहवालानुसार दरवर्षी भारतात

४४ हजार कोटी रुपयांच्या अन्नधान्याची नासाडी होते. त्यात साधारणपणे १३ हजार ३०० कोटींच्या फळे, भाज्यांचा समावेश असतो. महाराष्ट्राचा विचार करता कांदा, टोमॅटो, फळे, भाज्यांचे विशेषत: मेथी, कोथिंबीर, चुका, पालक यांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन होते. मात्र त्यासाठी उपयुक्त, पुरेशी साठवण व्यवस्था आणि क्षमता नसल्यामुळे मिळेल त्या दरात शेतीमाल विकण्याची किंवा तो फेकून देण्याची वेळ येते.

कोकणातील आंबा, काजू, जांभूळ, रातांबे यावरील प्रक्रिया उद्योगांमुळे उत्पादकांची अर्थव्यवस्था सुधारण्यास मदत झाली आहे. मराठवाडा, खान्देश, विशेषत: प. विदर्भात असे प्रयोग करण्यास भरपूर वाव आहे, हे लक्षात घेऊन सरकारनेदेखील पुढील पावले टाकायला हवीत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात'मधून अन्न वाया जात असल्याबद्दल काळजी व्यक्त केली. त्यापाठोपाठ साऱ्या देशावर ती बिंबवण्याचा प्रयत्न केंद्र सरकारने सुरू केला. त्याचाच एक भाग म्हणून हॉटेल आणि रेस्टॉरंटमधील अन्नाची नासाडी रोखण्याचे प्रयत्न होत आहेत. जागतिकीकरणानंतर गेल्या २२ वर्षांत भारताने विविध क्षेत्रांत प्रगती करीत विकासोन्मुख देश म्हणून ठसा उमटवला. मात्र सर्वसाधारण उत्पन्न असलेल्या व्यक्तीला आजच्या महागाईच्या परिस्थितीत अगदीच सामान्यपणे जगणेदेखील कठीण होऊन बसले आहे. कदाचित या बाबीची पुरेशी जाणीव झाल्यामुळेच केंद्र सरकारने अन्न सुरक्षा योजना प्रत्यक्ष कार्यवाहीत आणली, ज्याचा लाभ सुमारे ६७ टक्के लोकांना होऊ शकेल. अन्नधान्याची नासाडी रोखण्यासाठीच तर आपल्या संस्कृतीने त्यास पूर्णब्रम्ह या अर्थाने संबोधित केले. मात्र त्याकडे कानाडोळा केला जातो म्हणूनच आजही सुमारे २० कोटी लोक भुकेल्यापोटी राहतात, हे निश्चितच भूषणावह नव्हे. त्यासाठीच तर अन्नाची नासाडी ही राष्ट्रीय हानी ठरवणे गरजेचे आहे.

# सुकमाचा धडा.. .

> सामाजिक आणि आर्थिक विषमतेतून फ़ोफावलेल्या नक्षलवादाचा बीमोड करायचा असेल तर विकास व सुरक्षा यांचीच कास धरावी लागेल. आंध्र प्रदेश सरकारने ते सिद्ध करून दाखवले असले तरी अन्य राज्ये तो कित्ता का गिरवत नाहीत? समांतर पद्धतीने विकास प्रक्रिया उभी करणे हे सरकारचेच काम आहे ही बाब नाकारता येत नाही. देशातील राज्यकर्त्यांच्या दुर्लक्षाचे परिणाम जवानांना भोगावे लागतात हेच सुकमातील हिंसाचाराने पुन्हा एकदा दाखवून दिले आहे.

साधारणपणे महिनाभरात सुकमामध्ये ३६, कोत्ताचेरूमध्ये १२, भेज्जीमध्ये १२ जवान शहीद झाले. स्वयंचलित बंदुका, अत्याधुनिक आयुधांसह लढणारे नक्षलवादी आणि मोक्याच्या क्षणी हतबल होणारे सुरक्षा जवान हे चित्र सुकमामध्ये पुन्हा एकदा पाहायला मिळाले. खरे तर ही बाब केंद्र किंवा राज्य सरकारसाठी निश्चितच भूषणावह नाही. ग्रीन हंट मोहीम सुरू करताना केंद्र तसेच राज्याची युनिफाइड कमांड अर्थातच संयुक्त नियंत्रण व्यवस्था स्थापण्याचे आणि त्या माध्यमातून नक्षलवादविरोधी कारवाई करण्याचे ठरवण्यात आले. मात्र गेल्या १० वर्षांत ही बाब कागदावरून हलली नाही. इतकेच नव्हे तर मॅक म्हणजेच मल्टी एजन्सी सेंटर सुरू करण्याचेही ठरवले, मात्र १० वर्षात हे केंद्रदेखील अस्तित्वात आले नाही. इथे लक्षात घेण्यासारखी बाब म्हणजे चिदंबरम केंद्रीय गृहमंत्री असताना सुरक्षा दलाची सर्व

यंत्रणा सतर्क असायची, मात्र राजनाथसिंह यांनी आतापर्यंत केवळ चार वेळा मोहिमेचा आढावा घेतला आहे. एक मात्र खरे की, गेल्या दोन वर्षांत नक्षलवाद्यांचा हिंसाचार कमी झाला म्हणून गृहमंत्रालय निवांत राहिले. मात्र या काळात नक्षलवाद्यांनी आपल्या प्रभाव क्षेत्राचा विस्तार केला, इतकेच नव्हे तर मणिपूरमधील युनायटेड लिबरेशन फ्रंट या संघटनेशी करारदेखील केला. या बाबीची गुप्तचर यंत्रणांना कल्पनादेखील नसेल? हिंसाचार कमी झाला याचा अर्थ नक्षलवादाचा बीमोड झाला असे नव्हे. कारण महिनाभरापूर्वीच सुकमामध्ये १२ जवान शहीद झाल्यानंतर नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात पुन्हा २४ जवान शहीद झाले आहेत. मुळात सुरक्षाविषयक तज्ज्ञांनी जी कार्यपद्धती निश्चित केली ती निर्दोष असली तरी तिचे पालन व्यवस्थित होत नाही, असेच सातत्याने होत असलेल्या हल्ल्यांतून दिसून येते. या बाबीचा जाब सुरक्षा दलाच्या सर्वोच्च प्रमुखाला विचारला गेला पाहिजे. केंद्रीय राखीव पोलिस दलाचे अधिकारी असोत की गृहखात्यातील अधिकारी, हे आतापर्यंतच्या नक्षलवादी हल्ल्यांतून काही धडा घेत असल्याचे दिसून येत नाही.

मध्य भारतात साधारणपणे ४० वर्षांपासून नक्षलवादी कारवाया सुरू आहेत. त्यावर नियंत्रण आणण्याची ग्वाही देणारे राज्यकर्ते नेहमीच सपशेल अपयशी ठरत आले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दीड वर्षापूर्वी बस्तरमध्ये कैक हजार कोटींच्या विकासकामांची घोषणा केली, मात्र एकही काम अद्याप सुरू झाले नाही. महत्त्वाचे म्हणजे दंडकारण्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या भागात पायाभूत सुविधांचे जाळे उभारण्याचा प्रयत्न होत नाही हे खेदजनक ठरावे. नव्या संकल्पना आणून, नव्या घोषणा करून केंद्र सरकारने जनतेला भुरळ पाडली खरी, मात्र नक्षलवादासह अन्य जिव्हाळ्याच्या प्रश्नांना थेट भिडण्याची इच्छाशक्ती हे राज्यकर्ते का दाखवत नाहीत? आदिवासी, गरिबांना मुख्य प्रवाहात आणण्याच्या

गावगप्पा करणे सोपे असले तरी प्रत्यक्षात तसे करून दाखवणे तितकेसे सोपे नाही. मुळात आदिवासी, गरिबांच्या समस्यांशी त्यांना भिडावे लागेल, त्यासाठी ते वेळ देऊ शकतील? यासाठी विकास आणि सुरक्षा हाच दोन कलमी कार्यक्रम उपयुक्त ठरणार असून तो प्राधान्याने राबवावा लागेल; अन्यथा शहीद जवानांच्या पार्थिवावर पुष्पचक्र वाहण्यासाठी हे सरकार उरले, असा समज जनसामान्यांत पसरायला वेळ लागणार नाही. सामाजिक आणि आर्थिक विषमतेतून फ़ोफावलेल्या नक्षलवादाचा बीमोड करायचा असेल तर विकास व सुरक्षा यांचीच कास धरावी लागेल. आंध्र प्रदेश सरकारने ते सिद्ध करून दाखवले असले तरी अन्य राज्ये तो कित्ता का गिरवत नाहीत? आम्ही सरकारशी युद्ध पुकारले आहे, असे थेट आव्हान नक्षलवादी देत असतात. त्याच्या प्रत्युत्तरादाखल युद्धाचीच भाषा योग्य ठरते, हे खरे असले तरी त्यास समकक्ष किंबहुना समांतर पद्धतीने विकास प्रक्रिया उभी करणे हे सरकारचेच काम आहे ही बाब नाकारता येत नाही. नेमका याच बाबीचा विसर यंत्रणेला पडतो आहे, असेच दिसून येते. याशिवाय केंद्र आणि राज्यामध्ये सत्तेत असलेल्या भाजप सरकारांनीदेखील नक्षलवादाच्या समस्येला प्राधान्य दिले असेही दिसत नाही. म्हणूनच नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात जवानांचा हकनाक बळी जात आहे. ग्रीन हंटला खरी गती मिळाली ती विविध सुरक्षा दलाच्या प्रमुखांना जाब विचारण्याच्या कार्यपद्धतीमुळेच. मात्र या मोहिमेला खीळ बसली असून तिचा आढावादेखील घेतला जात नाही ही वस्तुस्थिती आहे. देशातील राज्यकर्त्यांच्या दुर्लक्षाचे परिणाम जवानांना भोगावे लागतात हेच सुकमातील हिंसाचाराने पुन्हा एकदा दाखवून दिले आहे.

# गोळेगाव पॅटर्न : वॉटर बजेट!

> दोन वर्षापूर्वी भांडेगावमध्ये संपूर्ण गावाचे वॉटर बजेट करण्यात आले. त्यानंतर आता तिथल्या शेती अर्थव्यवस्थेत सकारात्मक बदल होऊन समृध्दी नांदत असल्याचे निदर्शनास येत आहे. गोळेगावातील वैयक्तिक वॉटर बजेटचा पॅटर्न हा त्यापुढचा महत्वाचा टप्पा ठरावा.

यंदा चांगला पाऊस पडणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. तो खरा ठरला तर महाराष्ट्रात दुष्काळसदृश स्थिती निर्माण होणार नाही. मात्र दुष्काळमुक्तीसाठी खरी गरज आहे ती उपलब्ध पाण्याचे कुटुंबनिहाय व्यवस्थापन करण्याची, पीक पद्धत बदलण्याची; तसेच राज्यातील धरणांमध्ये साठणाऱ्या पाण्याच्या नियोजनबद्ध वाटपाची. राज्यात पुरेसा पाऊस क्वचितच पडतो, त्यामुळे पूर्णत: निसर्गाच्या भरवशावर विकास साधता येत नाही. पिण्यासाठी, शेतीसाठी आणि उद्योगासाठी पुरेसे पाणी उपलब्ध होऊ शकले नाही तर विकासाची गती आपसूकच मंदावते. म्हणूनच पावसाच्या प्रत्येक थेंबाची योग्य साठवणूक करणे आवश्यक ठरते. प्रगत देशांमध्ये पाण्याचे नियोजन हे आठ महिन्यांपुरते नव्हे, तर १८ महिन्यांसाठी केले जाते.

पावसाची हमी देत येत नाही त्यामुळेच पाणी व्यवस्थापन, साठवणुकीची तरतूद करणे, उपलब्ध पाणी योग्य पद्धतीने वापरणे आणि यासाठी दूरगामी नियोजन करणे या बाबी अतिशय महत्त्वाच्या ठरतात. या दृष्टिकोनातून दुष्काळमुक्तीसाठी गोळेगाव (ता. खुलताबाद, जि. औरंगाबाद) येथे ज्या पद्धतीने

'वॉटर बजेट'वर काम सुरू आहे, त्याचा आदर्श राज्यातील अन्य गावांनी घ्यायला हरकत नसावी. मुळात सर्वसाधारणपणे शेतकऱ्याकडून उपलब्ध पाण्याचे योग्य व्यवस्थापन सहसा होत नाही. परंतु इथे पावसाचे किती पाणी उपलब्ध होते आणि प्रत्येकाला किती पाणी लागते? लिटरभर पाण्याची आणि शेतात पडणाऱ्या पावसाच्या पाण्याची किंमत किती? याचा आधार घेत लिटरनिहाय पाण्याचा ताळेबंद आखण्यात आला आहे. खुल्या बाजारात आपण साधारणपणे २० रुपये लिटर दराने बाटलीबंद पिण्याचे पाणी विकत घेतो. मात्र पावसाच्या माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या कोट्यवधी लिटर पाण्याचा ना कधी हिशेब करतो ना त्याचा ताळेबंद मांडतो. म्हणूनच पाण्याचे सूक्ष्म नियोजन करण्याच्या हेतूने 'वॉटर बजेट'ची संकल्पना प्रत्येक कुटुंबात रुजवणे अपरिहार्य ठरते. गोळेगावात होत असलेला वैयक्तिक 'वॉटर बजेट'चा प्रयोग इतरांसाठी निश्चितच प्रेरक ठरावा. दोन वर्षापूर्वी भांडेगावमध्ये संपूर्ण गावाचे वॉटर बजेट करण्यात आले. त्यानंतर आता तिथल्या शेती अर्थव्यवस्थेत सकारात्मक बदल होऊन समृध्दी नांदत असल्याचे निदर्शनास येत आहे. गोळेगावातील वैयक्तिक वॉटर बजेटचा पॅटर्न हा त्यापुढचा महत्वाचा टप्पा ठरावा.

राज्यांतील धरणांमध्ये साठणारे पाणी योग्य प्रमाणात वापरले गेले पाहिजे, ही जलसंपदा विभागाची भूमिका रास्त आहेच. याशिवाय पाण्याची किंमत स्थानिक स्वराज्य संस्थांना कळली पाहिजे हा मुद्दादेखील संयुक्तिकच असला तरी कडक नियम आणि तितक्याच कठोरपणे परिणामकारक अंमलबजावणीची गरज आहे. पाण्याचा फेरवापर करायचा असतो, त्यासाठी यंत्रणा उभी करावी लागते हे आपल्याकडील स्थानिक स्वराज्य संस्थांना माहिती नाही अशातला भाग नाही. एकदा वापरलेले पाणी नदीनाल्यात न सोडता त्यावर प्रक्रिया करणे उपयुक्त ठरू शकते. राज्यातील २८ हजार ग्रामपंचायती, ३५० पंचायत समित्या, ३३ जिल्हा

परिषदा, २२५ नगर पंचायती आणि २६ महापालिकांवर पाणीपुरवठ्याची जबाबदारी आहे. या स्थानिक स्वराज्य संस्थांना पिण्यासाठी लागणारे पाणी मिळवण्यासाठी पाटबंधारे खात्याकडे मागणी करावी लागते. इथे उल्लेखनीय बाब म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थांनी पाण्याच्या आरक्षणाची मागणी केल्यानंतर १५ दिवसांत ५० टक्के अग्रिम पाणीपट्टी भरण्याची सक्ती करण्याचे जलसंपदा खात्याने ठरवले आहे. राज्यातील पाणी वापरावर अंकुश ठेवण्याचा सरकारी इरादा यातून स्पष्ट होतो. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आर्थिक स्थितीची पुरेशी जाणीव नगरविकास खात्याला असली तरी जलसंपदा खात्याच्या धोरणामुळे संबंधित गावांमध्ये, शहरांत कृत्रिम पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. जलसंपदा विभाग हाच नियम शेती आणि उद्योगांसाठी लावणार का? नसेल तर नजीकच्या भविष्यात पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर होऊ शकतो. महाराष्ट्राने दोन वर्षांपूर्वी सोसलेला दुष्काळ लक्षात घेता जलनियोजन, व्यवस्थापनाच्या अनुषंगाने दीर्घकालीन धोरण अमलात आणण्याची गरज आहे. सध्या जलयुक्त शिवारचे काम ज्या पद्धतीने सुरू आहे, ते पाहता पुरेशा क्षमतेने पावसाच्या पाण्याचे व्यवस्थापन होऊ शकेल का, याबाबत साशंकता व्यक्त केली जात आहे. धरणे, बंधारे, शेततळी यामध्ये साठवलेल्या पाण्यापैकी साधारणपणे ४० टक्के पाण्याचे बाष्पीभवन होते हे विचारात घेता राज्यभर जलवाहिन्यांचे जाळे उभारले जावे. नव्याने कालवे काढण्यापेक्षाही जलवाहिनीचा पर्याय आज महाग वाटत असला तरी भविष्याच्या दृष्टिने फायद्याचा ठरणारा आहे. मात्र याकडे राज्य सरकार फारसे लक्ष देत नाही. एकूणच या साऱ्या पार्श्वभूमीवर गोळेगावात राबवला जात असलेला ‘वैयक्तिक वॉटर बजेट’ चा पॅटर्न प्रेरक आणि अनुकरणीय ठरावा; कारण पावसाचे शुभवर्तमान कानी पडत असले तरी चांगल्या पावसाच्या पाण्याचे व्यवस्थापन त्यापेक्षाही अधिक महत्त्वाचे ठरते.

# दिल रुहानी!

> आता हसन रुहानी यांच्याकडून अपेक्षा वाढल्या आहेत. एकीकडे सुधारणावाद्यांचा दबाव, तर दुसऱ्या बाजूला अयातुल्ला खोमेनींसारख्या अमर्याद अधिकार असणाऱ्या सर्वोच्च नेत्याकडून होणारा विरोध, त्यांचा नकाराधिकार अशा आव्हानात्मक परिस्थितीतून रुहानी यांना रचनात्मक विकासाचा सोपान साधायचा आहे.

इराणसारख्या कर्मठ देशात उदारमतवादी नेत्यांना तारेवरची कसरत करावी लागणे साहजिकच. एकीकडे धर्मांध शक्तींशी सामना करायचा आणि त्याच वेळी अमेरिकेसह अन्य लोकशाहीवादी देशांना खुश ठेवायचे हे तितकेसे सोपे नाही. हसन रुहानी कितीही पुरोगामी असले तरी इराणचे मूलभूत धोरण त्यांना ताबडतोब बदलता येत नाही. कधी दोन पावले मागे, तर कधी एक पाऊल पुढे, अशी भूमिका त्यांना घ्यावी लागेल. कारण ज्या देशातील समाज धार्मिक पगड्याखाली असतो त्या देशातील राज्यकर्ते एकाएकी भूमिका बदलवू शकत नाहीत. इतकेच नव्हे तर ज्या देशात पूर्णपणे लोकशाही नसते तिथे लोकशाहीवाद्यांना जपून मार्ग काढावा लागतो. लोकशाहीची मुळे रुजवण्यासाठी प्रसंगी धार्मिक नेत्यांशी जुळवून घ्यावे लागते. अन्य लोकशाहीवादी देशांत स्त्री-पुरुष समानता गृहीत धरता येते तशी इराणमध्ये शक्य नाही. मात्र त्यासाठी प्रयत्न जरूर करता येतील.

कोणतेही सरकार कितीही पुरोगामी आणि व्यवहारवादी असले तरी सनातन्यांची मर्जी सांभाळल्याशिवाय प्रगती साधता येत नाही हे हसन रुहानी यांच्या पहिल्या कारकीर्दीत पाहायला मिळाले. तरीही इराणींनी रुहानींनाच पुन्हा

पसंती दिली. २. ३ कोटी मते मिळवत त्यांनी १. ५ कोटी मतांवर प्रतिस्पर्धी इब्राहिम रईसी यांना रोखले. इराणचे १२ वे राष्ट्राध्यक्ष म्हणून हसन रुहानी पदग्रहण करतील. जगात अन्यत्र प्रतिगामी, कट्टरवादी गटांकडे देशाची धुरा सोपवली जात असताना फ्रान्स, उत्तर कोरियापाठोपाठ इराण हा तिसरा देश ठरला, जिथे वेगळे काही घडते आहे. राज्यकर्ता पुरोगामी असल्याने शासकीय व्यवस्था उत्तम चालतेच असे नाही, तसेच त्याची इच्छाशक्ती असली तरी काही उपयोग होत नाही या सार्वत्रिक अनुभवास अर्थातच हसन रुहानीदेखील अपवाद ठरले नाहीत.

१९७९ च्या 'इस्लामी क्रांती'नंतर आर्थिक निर्बंधाची झळ सोसलेल्या रुहानींनी इराणला जागतिकीकरणाशी जोडण्याचा प्रयत्न केला. ओबामांच्या कारकीर्दीत अमेरिकेशी अर्थपूर्ण संवादाच्या पातळीवर पोहोचलेल्या रुहानींनी २०१४ मध्ये व्हिएन्नात सहा बड्या देशांकडून अणुकरारास मान्यता मिळवली. 'इराणच्या अस्मितेसाठी जग खाक झाले तरी बेहत्तर' म्हणणाऱ्यांच्या तुलनेत रुहानी इथेच निराळे ठरले आणि अंशत: का होईना आर्थिक निर्बंध उठले. २०१५ नंतर इराणमधील बेरोजगारीचा दर १२ टक्क्यांपर्यंत खाली आला. अर्थव्यवस्थेची घसरणही थांबली, उलट ६. ६ टक्के इतकी वाढ झाली. नेमका हा बदल तरुणाईला भावला. कारण अणुकरार किंवा अन्य मुद्द्यांपेक्षा आमच्या वैयक्तिक आयुष्यात किती बदल होतो हेच आमच्यासाठी अधिक महत्त्वाचे आहे अशी प्रतिक्रिया तरुण मतदारांनी व्यक्त केली. त्याचा मोठा परिणाम या निवडणूक निकालात पाहायला मिळाला.

अणुकराराशिवाय मानवाधिकार, राजकीय अधिकार, अर्थव्यवस्था या प्रमुख मुद्द्यांसोबतच माध्यम आणि विचारांच्या स्वातंत्र्याचे गारूड मतदारांवर दिसून आले. खरे तर रुहानी यांच्यासाठी ही निवडणूक सहजसोपी नव्हतीच.

इब्राहिम रईसीसारखा कट्टरवादी नेता आणि अयातुल्ला खोमेनी यांचा त्यास असलेला पाठिंबा पाहता सुधारणावाद मोडून पडणार की काय, अशी स्थिती निर्माण झाली. मात्र साऱ्या आव्हानांवर हसन रुहानींनी मात केली. जगभरातील अन्य देशांसाठीदेखील त्यांची निवड महत्त्वाची ठरते. कारण खनिजतेलाचा पुरवठा, त्याचे दर नियंत्रण याशिवाय इराक, सिरियामध्ये शांतता, स्थैर्य प्रस्थापित होण्यासाठी इराणची भूमिका निर्णायक असेल. पश्चिम आशियाई देशांत इराणचा प्रभाव वाढत असल्यामुळे एकूणच जगभरातील देशांचे लक्ष इराणमधील निवडणूक निकालांकडेच होते. या साऱ्या पार्श्वभूमीवर आता हसन रुहानी यांच्याकडून अपेक्षा वाढल्या आहेत. एकीकडे सुधारणावाद्यांचा दबाव, तर दुसऱ्या बाजूला अयातुल्ला खोमेनींसारख्या अमर्याद अधिकार असणाऱ्या सर्वोच्च नेत्याकडून होणारा विरोध, त्यांचा नकाराधिकार अशा आव्हानात्मक परिस्थितीतून रुहानी यांना रचनात्मक विकासाचा सोपान साधायचा आहे.

मुळातच धर्मसत्ता आणि तिच्याशी असणारे लागेबांधे मिळून जी व्यवस्था तयार होते ती सुधारणावाद्यांसमोर पेच निर्माण करते हा सार्वत्रिक अनुभव आहे. इराणसारख्या मूलत: कर्मठ देशात ‘पुरोगामी’ या शब्दाला बऱ्याच काही मर्यादा आहेत. हसन रुहानी हे धर्मगुरू आहेत. पाश्चात्त्य विद्यापीठात त्यांचे शिक्षण झालेले असले तरी धार्मिक नेत्यांशी मतभेद झाल्यामुळे ते बाहेर पडले. रुहानींचा हा भूतकाळ विसरून कसे चालेल? तथापि, आंतरराष्ट्रीय पातळीवर इराणची प्रतिष्ठा जपत, हितसंबंध वाढवण्यासाठी हसन रुहानी यांना राजनैतिक कौशल्य पणाला लावावे लागणार हे निश्चित!

# दहशतखोरांचा वर्चस्ववाद

> ब्रिटनमध्ये दहशतवादी हल्ल्यांची सुरुवात १९७४ मध्ये आयरिश रिपब्लिकन आर्मीने आयर्लंडला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी केली. ही संघटना ४० वर्षांनंतरही सक्रिय आहे. ब्रिटनचे पोलिस, स्कॉटलंड यार्ड तसेच अन्य सुरक्षा यंत्रणा या जगातील सर्वोत्तम यंत्रणांपैकी एक मानल्या जातात तरीही दहशतवादाचा मुकाबला करण्यात या यंत्रणा अपयशी ठरत असल्याचे संकेत मँचेस्टर आणि लंडनमधील हल्ल्यातून मिळतात.

अवघ्या १५ दिवसांतच ब्रिटन दुसऱ्यांदा दहशतवादी हल्ल्याने हादरला. मँचेस्टरमध्ये अमेरिकी पॉप गायिका एरियाना ग्रँड हिचा कार्यक्रम सुरू असताना आत्मघाती हल्ल्यात २२ जणांचा बळी गेला. त्यापाठोपाठ आता बर्मिंगहॅम येथे भारत-पाकिस्तानदरम्यान क्रिकेट सामना सुरू होत असतानाच शनिवारी रात्री लंडनमध्ये तीन वेगवेगळ्या ठिकाणी दहशतवादी हल्ले झाले. मँचेस्टरमधल्या आत्मघाती हल्ल्याची जबाबदारी इसिसने स्वीकारली. ब्रिटनचाच रहिवासी असलेल्या सलमान अबेदी याने हे कारस्थान घडवल्याचे निष्पन्नही झाले. शनिवारी लंडन ब्रिजवर कारने लोकांना चिरडून टाकण्यासोबतच दहशतवाद्यांनी चाकूहल्ले केले. यामध्ये ७ ठार, ३० जण जखमी झाले. दहशत माजवणाऱ्या या घटनेतील तिन्ही संशयितांना मात्र पोलिसांनी यमसदनी धाडले असले तरी या घटनेचे पडसाद भारत-पाकिस्तान सामन्यावरही उमटले. ब्रिटनच्या पंतप्रधान थेरेसा मे यांनी या घटना दहशतवादाचाच प्रकार असल्याचे स्पष्ट करीत कट्टरतावाद आणि दहशतवादाला रोखण्याच्या गरजेवर भर दिला. अमेरिकेचे

राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीदेखील या घटनेचा निषेध नोंदवत आपण ब्रिटनसोबतच असल्याची ग्वाही दिली. उल्लेखनीय म्हणजे येत्या ८ जून रोजी ब्रिटनमध्ये निवडणुका होत आहेत. त्या पार्श्वभूमीवर हे हल्ले झाले असल्याचे मानले जात असून लंडनमध्ये २००५ साली झालेल्या हल्ल्याच्या आठवणी या घटनेने ताज्या केल्या. ब्रिटनमध्ये दहशतवादी हल्ल्यांची सुरुवात १९७४ मध्ये आयरिश रिपब्लिकन आर्मीने आयर्लंडला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी केली. ही संघटना ४० वर्षांनंतरही सक्रिय आहे. ब्रिटनचे पोलिस, स्का ॅटलंड यार्ड तसेच अन्य सुरक्षा यंत्रणा या जगातील सर्वोत्तम यंत्रणांपैकी एक मानल्या जातात तरीही दहशतवादाचा मुकाबला करण्यात या यंत्रणा अपयशी ठरत असल्याचे संकेत मँचेस्टर आणि लंडनमधील हल्ल्यातून मिळतात.

गेल्या २० वर्षांपासून दहशतवादाची पाळेमुळे खणून काढण्याच्या आणाभाका जगभरातील नेते वारंवार घेत असताना 'वर्ल्ड ट्रेड सेंटर'वरील हल्ल्यापूर्वीच दहशतवाद जगभर आपल्या खाणाखुणा उमटवत होता. मात्र अल कायदाने केलेल्या या हल्ल्यानंतर सारे जग हादरले. आयात होणारा दहशतवाद जगभर विस्तारत असताना त्याची पाळेमुळे स्थानिक पातळीवरदेखील रुजत होती हे अनेक दहशतवादी घटनांतील स्थानिकांच्या सहभागातून उघड झाले आहे. स्थानिक नागरिकांमध्ये दहशतवादी विचारांची मुळे खोलवर रुजल्याचे किंवा ती तशी रुजवण्याचे प्रयत्न होत असल्याचे सकृतदर्शनी लक्षात येत नसले तरी केवळ सुरक्षा व्यवस्था अत्यंत चोख ठेवल्याने दहशतवादाला आळा बसेल या भ्रमात जगभरातील नेत्यांनी राहू नये असाच संदेश या दोन घटनांनी दिला आहे. अशा परिस्थितीत दहशतवादाला तोंड द्यायचे असेल तर दीर्घकालीन मार्ग हाताळावे लागतील. त्याशिवाय जगभरातील नेत्यांमध्ये सुसंवाद वाढणेदेखील तितकेच गरजेचे आहे. कारण साधारणपणे गेल्या १५ वर्षांत दहशतवादाचे स्वरूप तसेच दहशतवादी संघटनांच्या कार्यपद्धतीत आमूलाग्र बदल झाला. याशिवाय दहशतवादी संघटनांमध्येदेखील वर्चस्ववादाची खुमखुमी वाढीस लागली आहे.


म्हणूनच आयरिश रिपब्लिकन आर्मी, इसिस आणि अल कायदा यांच्यातील वर्चस्ववादातून हा हल्ला झाला असावा, असे म्हणण्यास पुरेसा वाव आहे. इसिस आणि अल कायदामध्ये एकीकडे अंतर्गत वर्चस्ववाद सुरू आहे, त्याच वेळी अल कायदाचे अस्तित्व इसिसने जवळपास संपुष्टात आणले. सिरियात उदयास आलेल्या इसिसने पाकिस्तानपर्यंत नेटवर्क बळकट केले. त्यात जागतिकीकरण तसेच माहिती क्षेत्रातील क्रांतीने अधिक भर घातली. दहशतवादाने प्रेरित झालेल्या मंडळींना अल्पावधीत एकत्र आणणे आता संपर्क माध्यमांनी शक्य केले.

दहशतवाद म्हणजे धार्मिक युद्ध ही संकल्पनादेखील बदलत्या प्रवाहात मागे पडली. निरनिराळ्या प्रकारचे हिशेब चुकते करण्यासाठी दहशतवादी संघटनांचा वापर करून घेतला जात आहे. ब्रिटनमधल्या दोन्ही दहशतवादी घटनांनी जगाला पुन्हा भीतीच्या छायेत ढकलले असले तरी दीर्घकालीन उपाययोजनांवर काम करण्यासोबत संवादातून परस्परांवरील विश्वास वृद्धिंगत करणे, विकासाची फळे सामान्यांपर्यंत पोहोचवणे, देशांतर्गत समन्वय-सुसंवाद वाढवणेदेखील तितकेच गरजेचे ठरते. दहशतवाद हा मानवतेचा शत्रू आहे, ती जागतिक समस्या असल्याचे जगभरचे नेते तोंड भरून सांगतात; मात्र दहशतवाद्यांना मिळणारा निधी, शस्त्रे आणि संपर्क साधनांची रसद जागतिक समुदायाकडून का तोडली जात नाही? दहशतवादाची नेमकी व्याख्या काय? जे देश दहशतवादाला खतपाणी घालतात त्याविषयीचा ठराव ४० वर्षांपासून संयुक्त राष्ट्र संघात पडून आहे. जागतिक व्यासपीठावर नेते केवळ तोंडाची वाफ दवडतात, मात्र निर्णय काहीच होत नाही. या विसंगतीवर अद्याप उत्तर शोधले गेले नाही, त्यामुळेच दहशतवाद्यांमध्ये वर्चस्ववादाची खुमखुमी बळावली आहे.

# बियाण्यांचा बादशहा!

> खरे तर, मराठवाडा अस्मानी आणि सुलतानी उपेक्षेचा धनी ठरलेला प्रांत, मात्र इथल्या तरुणाईत जगाला थक्क करणारी, काहींना हेवा, तर काहींना अभिमान वाटावा, प्रेरक ठरावी अशी विलक्षण जिद्द आणि चिकाटी आहे, ती डाॅ. बद्रीनारायण बारवाले यांच्या कर्तृत्वातूनही झळकते.

१९६० चे दशक.. कम्युनिकेशनच्या दृष्टीने अत्यंत संथ गतीचा काळ म्हणता येईल. याच काळात जगाची पावले हरितक्रांतीच्या वाटेवर पडत होती. त्या वेळी जगभरातील कृषीविषयक संशोधनाची माहिती मिळवणे म्हणजे एक अवघड प्रवास असायचा. मात्र जिद्द, कष्टाळू वृत्ती आणि दूरदृष्टी असली की, एखादी व्यक्ती कसे साम्राज्य उभे करू शकते, त्याचीच मूर्तिमंत साक्ष म्हणजे डॉ. बद्रीनारायण बारवाले होत. त्या काळी शेतीमालास फारसा भाव मिळत नसे. त्यामुळे बाजारात बियाणे म्हणून विकण्याचा विचार त्यांनी प्रारंभी केला आणि हीच बाब पुढे जालन्यातील हायब्रीड बियाणे उद्योगाची मुहूर्तमेढ ठरली. अमेरिकी संशोधक, केंद्रीय कृषी मंत्रालयापासून ते संबंधित सरकारी खात्यातील अधिकारी, शेती संशोधन संस्थांशी संबंध प्रस्थापित करत १९६२ ते ७७ या काळात हायब्रीड बियाणे उद्योगाला डॉ. बारवाले यांनी भारतासह जगभर मान्यता मिळवून दिली. त्यांचा हा प्रवास निश्चितच खडतर होता, मात्र त्यामुळे मराठवाड्यातील उद्योजकतेला वेगळा आयाम मिळाला.



विद्यार्थिदशेतच हैदराबाद मुक्तिसंग्रामात स्वत:ला झोकून देणाऱ्या डॉ. बारवाले यांनी शेतकऱ्यांच्या अभ्युदयासाठी १९६४ मध्ये जालन्यात 'महाराष्ट्र हायब्रीड सीड्स कंपनी' स्थापन केली. वर्षभरातच ३५० एकर जागेवर बियाणे उत्पादनासह प्रकल्प उभारला, त्यापाठोपाठ संशोधन, विकास केंद्रही सुरू केले. ६० च्या दशकात पुसा सवनी भेंडीचे हायब्रीड बियाणे बनवल्यानंतर 'मॉन्सेंटो'चे लक्ष वेधले गेले आणि १९९८ मध्ये सहकार्याचा हात पुढे केला. आज हा समूह कृषी क्षेत्रातील २०० पेक्षाही अधिक बियाणे विकसित करतो. २७ उत्पादन केंद्रे, ८ प्रक्रिया प्रकल्प, १ लाखाहून अधिक शेतकऱ्यांचा प्रत्यक्ष सहभाग, देशभरात ५ हजारांहून अधिक विक्री दालने, ९००० टन साठवणूक क्षमता तसेच हजाराहून अधिक कर्मचारी वर्ग अशा या 'महिको' समूहाची उलाढाल २००० कोटींच्या घरात पोहोचली आहे. खरे तर मराठवाडा अस्मानी आणि सुलतानी उपेक्षेचा धनी ठरलेला प्रांत, मात्र इथल्या तरुणाईत जगाला थक्क करणारी, काहींना हेवा, तर काहींना अभिमान वाटावा, प्रेरक ठरावी अशी विलक्षण जिद्द आणि चिकाटी आहे, ती डॉ. बारवाले यांच्या कर्तृत्वातूनही झळकते. मुळात निसर्गावर अवलंबून असलेल्या आणि अनिश्चित अशा कृषी क्षेत्राशी निगडित बियाणे उद्योगाला अत्याधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणे अत्यावश्यक असल्याची जाणीव डॉ. बारवाले यांना झाली आणि त्यांना साथ देण्यासाठी डॉ. उषा बारवाले यांनी जालना ते अमेरिका असा कृषी क्षेत्रातील तंत्रज्ञान विकासाचा प्रवास सुरू केला. 'महिको'ने ७० च्या दशकात हायब्रीड संशोधनाने क्रांती केली, परंतु डॉ. उषा

बारवाले यांनी काळाची पावले ओळखून त्यास 'बीटी'ची जोड दिली. सन २००० च्या सुरुवातीच्या दशकात 'महिको'ने बीटी तंत्रज्ञानावर आधारित बियाणे विकसित केले. सूक्ष्म जैवतंत्रज्ञानाची पार्श्वभूमी असलेल्या डॉ. उषा बारवाले यांनी महिकोत सशक्त बियाण्यांपासून होणारे उत्पादन दीर्घ काळ टिकणारे आणि अधिक मात्रेत असेल, असे हायब्रीड तंत्रज्ञान विकसित केले. तंत्रज्ञानावर आधारित भारतातील पहिले बीज दोन वर्षांच्या परिश्रमानंतर 'बीटी' नावाने रुजले; क्रांतिकारक ठरले आणि 'महिको'ला अव्वल तीन कंपन्यांच्या पंक्तीत स्थान मिळाले. आता कोणत्याही वातावरणात बियाण्यांचे अस्तित्व टिकवून ठेवणे, उत्पादनक्षमता वाढवणे यासाठी त्या प्रयत्नशील आहेत. वडिलांचा बियाणे उत्पादन व्यवसायाचा निकोप वटवृक्ष करण्यासाठी आवश्यक तंत्रज्ञानाची कास धरून सुरू असलेला त्यांचा प्रवास आपल्या कृषी क्षेत्रास फायदेशीर ठरणार हे निश्चित. तथापि, भारतासारख्या प्रचंड लोकसंख्येच्या देशाला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण करण्यासोबतच ग्रामीण अर्थव्यवस्थेची घडी बसवण्यात तसेच रोटरी, स्वयंसेवी संस्थांद्वारे सामाजिक आणि 'जेईएस'द्वारे शैक्षणिक तर गणपती नेत्रालयाच्या माध्यमातून आरोग्य क्षेत्रात मोलाचे योगदान देणारे डॉ. बद्रीनारायण बारवाले या द्रष्ट्या उद्योजकास मॅक्सेल फाउंडेशनने जीवनगौरव पुरस्काराने, तर १९९८ मध्ये जागतिक स्तरावर प्रतिष्ठेच्या 'वर्ल्ड फूड प्राइज'ने त्यांना गौरवले. २००१ मध्ये पद्मभूषण पुरस्काराने, २००२ मध्ये तामिळनाडू कृषी विद्यापीठाने, तर २०१० मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने डी. लिट. देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला. बियाण्यांचा बादशहा अशी ओळख निर्माण करणारे डॉ. बद्रीनारायण बारवाले यांच्या निधनाने निर्माण झालेली उणीव कायम भासत राहील.

# खूनी गेम्सचा फास.. .

> रशियात दहशत माजवलेला ‘ब्ल्यू व्हेल चॅलेंज’ चोरपावलांनी भारतात आला. या खुनी खेळाने (सुसाइड गेम) इथे बस्तान ठोकले ते कुणाला कळायच्या आतच अंधेरीतील १४ वर्षांच्या मनप्रीत सिंगच्या आत्महत्येची बातमी थडकली अन् सगळयांचेच डोळे उघडले.

जगभरातील बहुतेक देशांत या ना त्या कारणाने आत्महत्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असताना सोशल मीडियावरील लाइव्ह व्हिडिओच्या माध्यमातून आत्महत्या करण्याचेही फॅड अवतीभोवती पोहोचले आहे. ‘नेटफ्लिक्स’च्या आत्महत्येवर आधारित मालिकेवरून अलीकडेच मोठा गहजब माजला. त्यानंतर ती बंद करण्यात आली, तोच हल्लीच्या अॅप्स आणि नेटकऱ्यांच्या जमान्यात आणखी एका ‘सुसाइड गेम’ची त्यात भर पडली. मन्मथ म्हैसकरची आत्महत्या सर्वांनाच चटका लावून गेली. त्यातच मनप्रीतच्या मृत्यूची बातमी अचानक येऊन थडकली. खरे तर पारंपरिक खेळांना नाकारून व्हिडिओ किंवा मोबाइल गेम्समध्ये आनंद शोधण्याचा उपद्व्याप जीवघेणा ठरत असून रशिया, ब्रिटन, अमेरिकेच्या पाठोपाठ भारतातही किशोरवयीन मुलांच्या आत्महत्या वाढत आहेत.

विरंगुळा म्हणून अधूनमधून खेळले जाणारे हे गेम्स आता मुलांच्या जिवाशी खेळत आहेत. या पार्श्वभूमीवर सर्वच संबंधितांनी अंतर्मुख होऊन सारासार विचार केला पाहिजे. अलीकडच्या काळात पॉकेमॉन जगभर गाजला, मात्र कित्येक खेळगडी अपघातात जायबंदी झाले तेव्हा आभासी जगात भरधाव वेगाने ओढत नेणाऱ्या या खेळातला धोका कळला. त्यापाठोपाठ रशियात दहशत माजवलेला ‘ब्ल्यू व्हेल चॅलेंज’ चोरपावलांनी भारतात आला. या खुनी खेळाने इथे बस्तान

ठोकले ते कुणाला कळायच्या आतच अंधेरीतील १४ वर्षांच्या मनप्रीत सिंगच्या आत्महत्येची बातमी थडकली अन् सगळयांचे डोळे उघडले. या खुनी खेळाने एकट्या रशियात १२-१६ वयोगटातील १३० मुलांचा, तर ब्रिटनमध्ये युलिया आणि वेरोनिका या विद्यार्थिनींचा बळी घेतला. अमेरिका, पाकिस्तानसह १९ देशांत या 'सुसाइड गेम'ने उच्छाद मांडला, त्यात एकंदर २०० मुले बळी पडली. मनप्रीतच्या आत्महत्येप्रकणी पोलिस उपायुक्त नवीनचंद्र रेड्डी तपास करत आहेत, त्यातून काही बाबी स्पष्ट होतील; मात्र सुखवस्तू कौटुंबिक पार्श्वभूमी असलेली मुले सारासार विचार करण्याचे का टाळतात? मुलांचे भावविश्व समजून घेण्यात पालक कमी पडत आहेत का? या मुद्द्यावर समस्त पालकांनी गांभीर्याने अंतर्मुख व्हायला हवे आणि अशा स्वरूपाच्या घटना टाळायच्या असतील तर पाल्याची केवळ 'फिजिकल ऑटोप्सी'च नव्हे, तर 'सायकॉलॉजिकल ऑटोप्सी'देखील करायला हवी, असे वाटते. अलीकडेच दररोज १२ तास कॉम्प्युटर गेम खेळणारा किशोरवयीन मुलगा दिल्लीतील रुग्णालयात दाखल झाला. कारण काय, तर या खेळाच्या नादात त्याची सारासार विचार करण्याची शक्तीच खुंटली; झोप, कुटुंबियांशी संवाद जणू बंदच झाले. आता त्याच्यावर उपचार सुरू आहेत. अशा नादावलेल्या मुलांना वेळीच सावरले नाही तर घरोघरी खुनी खेळाचे डाव रंगतील हे सांगायला का हवे?

'ब्ल्यू व्हेल चॅलेंज'चे वैशिष्ट्य म्हणजे यात खेळाडूस दररोज १ अशी ५० दिवस निरनिराळी कामे सांगितली जातात, ती पूर्ण केल्याचा पुरावाही द्यावा लागतो. अन्यथा धमकीचे मेसेज येतात म्हणे! दुर्दैवाची बाब अशी की, विशेषत: फेसबुक, इन्स्टाग्राम युजर्सला लक्ष्य बनवले जाते. हा खेळ एकदा डाऊनलोड केला की, तो 'डिलिट' किंवा 'अनइन्स्टॉल' करता येत नाही; युजर्सची पर्सनल माहिती हॅक केली जाते. या 'ब्ल्यू व्हेल'शिवाय कायली लिप चॅलेंज, डक्ट टेप चॅलेंज, चोकिंग गेम, सिनेमन चॅलेंज, कार सर्फिंग असे काही ऑनलाइन गेम्स आहेत ज्यास जगभरातील १०-१८ वर्षे वयोगटातील मुले आहारी जात आहेत. यामध्ये

पालकांशी बोलू नका, अशी अट घातली जाते. त्यामुळे तर मुलांची अडवणूक होत नाही ना? 'हाय रिस्क' असलेले खेळ मुले खेळत आहेत का? हे तपासले पाहिजे. कौटुंबिक, व्यावसायिक जबाबदाऱ्यांच्या बुलडोझरखाली चेमटून जाणारा पालक मुलांना पुरेसा वेळ देत नाही, फावल्या वेळात तो मोबाइल, व्हिडिओ गेम्स, टीव्ही, चॅटींगसह अन्य बाबींच्या आहारी जातो. शिवाय योग्य सवंगडी न मिळाल्याने बिचारी मुले अशा आभासी जगात रमणे पसंत न करतील तरच नवल! म्हणूनच १३-१५ वयोगटातील मुले नैराश्याच्या आहारी जात आहेत. भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी ५. ८ टक्के म्हणजे ३. ९८ कोटी मुले आणि ३. ५७ कोटी मुली किशोरवयीन आहेत. यापैकी २५ टक्के मुले वैफल्यग्रस्त आहेत, तर ११ टक्के मुले आपल्या कामावर लक्ष केंद्रित करू शकत नाहीत, ही गंभीर वस्तुस्थिती आहे. त्यासाठी बांगलादेश, भूतान, मालदीव, इंडोनेशिया, श्रीलंकेच्या धर्तीवर भारतात देखील मानसिक आरोग्याशी निगडित उच्च गुणवत्तापूर्ण तसेच सहज सुलभ योजना, धोरणे आखली गेली तरच नव्या पिढीला अविवेकी होण्यापासून रोखता येईल.

# बढतीचा वांदा!

> गेल्या १३ वर्षांतील बेकायदा बढत्यांचा घोळ निपटून काढणे हे मोठे सामाजिक-राजकीय आव्हान ठरणार, हे निर्विवाद. मुळात आरक्षणाचा लाभ कोणत्याही व्यक्तीला एकदाच मिळायला हवा. नोकरी मिळवताना घेतला असेल आणि पुन्हा पदोन्नतीसाठी दिला तर इतरांवर अन्याय होणार नाही का?

एकीकडे आरक्षण हा आत्यंतिक संवेदनशील मुद्दा बनला असताना सरकारी आणि निमसरकारी सेवांमधील ३३% पदोन्नतीची पदे मागासवर्गीय कर्मचाऱ्यांसाठी राखून ठेवण्याचा निर्णय उच्च न्यायालयाने नुकताच रद्द केला. या निर्णयामुळे फडणवीस सरकारच्या डोकेदुखीत आणखी एक भर पडली. आजवरच्या राज्य सरकारांनी मागासवर्गीयांचा दुवा मिळवण्यासाठी जे काही खटाटोप करून ठेवले त्यापैकी हा एक म्हणता येईल. मुळात ज्या एम. नागराज प्रकरणातील निकालाच्या आधारे बढत्यांमधील आरक्षण रद्द करण्याचा निर्णय देण्यात आला तो सर्वोच्च न्यायालयाने १० ऑक्टोबर २००६ रोजी दिलेला आहे; असे असताना बढत्यांमधील आरक्षण का सुरू ठेवले? या निकालाचा निकष त्याच वेळी लावला असता तर किमान २००८ ते २०१७ या काळातील बढत्यांचा घोळ रोखला गेला असता. उल्लेखनीय म्हणजे २००४ ते २०१३ अशी एकंदर ९ वर्षे हे प्रकरण उच्च न्यायालयात प्रलंबित राहिल्यानंतर ते मॅटकडे पाठवण्यात आले, या विलंबाला तत्कालीन सरकारच

जबाबदार ठरत नाही का? मॅटकडे हे प्रकरण सोपवण्याचा विसर का पडला? याची उत्तरे कदाचित मिळणारही नाहीत. मात्र, गेल्या १३ वर्षांतील बेकायदा बढत्यांचा घोळ निपटून काढणे हे मोठे सामाजिक-राजकीय आव्हान ठरणार, हे निर्विवाद. हे आरक्षण टिकवून ठेवण्यासाठी राज्य सरकारला ३ महिन्यांचा अवधी मिळाला असला तरी आरक्षणावर दिलेल्या बढत्या कायम राहतील याची शाश्वती देता येत नाही. कारण हे आरक्षण रद्द करण्यापूर्वीच उच्च न्यायालयाने सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठांच्या निकालाचा आधार घेतला आहे. त्यामुळे अगोदरच १३ वर्षे लांबणीवर पडलेला हा मुद्दा आणखी काही काळ लांबेल हे निश्चित. एक मात्र खरे की, यानिमित्ताने पुन्हा एकदा प्रशासन आणि न्यायपालिकेतील विसंवाद दिसून आला. त्यामुळे न्यायव्यवस्थेनेदेखील एकदा स्वत:च्या कार्यपद्धतीकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे, असे वाटते. कारण मागील १३ वर्षे प्रलंबित राहिलेल्या या गंभीर मुद्द्याविषयी न्यायाधीशांचे काहीच मत नसावे? प्रचंड संख्येने खटले, त्या तुलनेने अपुरे न्यायाधीश ही तफावत मान्य केली तरी हजारो लोकांशी संबंधित संवेदनशील मुद्द्याचा प्राधान्यक्रम ठरवण्यात न्याययंत्रणेला अपयश का आले? मुंबई उच्च न्यायालयाने दिलेला निकाल सर्वोच्च न्यायालयातही कायम राहिला तर प्रशासनात जी अनागोंदी आणि गोंधळ माजेल त्याला जबाबदार कोण? अर्थात या पदोन्नत्या न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहूनच झालेल्या असल्या तरी १३ वर्षांनंतर त्यात बदल करणे सोपे का आहे? ज्यांना पदोन्नती मिळाली त्यांना पदावनत करावे लागेल. त्यातून अनेक प्रश्न निर्माण होतील. याशिवाय कैक जण पदोन्नतीचा लाभ घेऊन निवृत्त झाले असतील, त्यांचे काय? नव्या निर्णयानुसार पदावनत झालेला कर्मचारी सर्वोच्च न्यायालयात गेला तर हा मुद्दा आणखी गुंतागुंतीचा होणार आणि लांबणीवर पडणार. अशा असंख्य आनुषंगिक बाबींचा विचार करूनच निर्णय द्यायला हवा होता, ही अपेक्षा गैर नसावी.

मुळात आरक्षणाचा लाभ कोणत्याही व्यक्तीला एकदाच मिळायला हवा. नोकरी मिळवताना घेतला असेल आणि पुन्हा पदोन्नतीसाठी दिला तर इतरांवर अन्याय होणार नाही का? राखीव जागांवरील कर्मचाऱ्यांच्या पदोन्नत्या लवकर होतात. परिणामी बहुतांश खुला प्रवर्ग 'प्रतीक्षा यादी'मध्येच राहतो, हे वास्तव आहे. या ३३% आरक्षणापैकी अनुसूचित जाती, जमातींचे आरक्षण सबळ तपशील नसल्यामुळे रद्द झाले. त्यामुळे एक तर नसलेला डाटा मिळवावा लागेल किंवा जो आहे तो समर्थनीय असल्याचे सर्वोच्च न्यायालयाच्या गळी उतरवावे लागेल. अर्थातच हे सोपे आहे का? हा सारा तपशील मिळवला तरी आधीचे आरक्षण टिकवता येणार नाही. भटके-विमुक्त आणि इतर मागासवर्गीयांच्या आरक्षणाबाबत राज्यघटनेतील अनुच्छेद १६६ (४ए) नुसार बढत्यांमध्ये राखीव जागा ठेवूच शकत नसल्याचा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वीच सातत्याने दिला आहे. उल्लेखनीय म्हणजे ३३% पैकी १३% बढत्यांना उच्च न्यायालयाने सुरुवातीला स्थगिती दिली. सर्वोच्च न्यायालयाकडून राज्य सरकारने ती उठवून घेतली. त्यामुळे १३ वर्षे ३३% बढत्या दिल्या गेल्या व हे आरक्षण सुरू राहिले. अर्थातच हा प्रश्न गुंतागुंतीमुळे निर्माण झाला असला तरी बेकायदा बढत्यांचा वांदा निपटण्याची जबाबदारी राज्य सरकारवर येऊन पडली हे तितकेच खरे. आजच्या घटकेला राजकीय पडसादापेक्षाही प्रशासकीय पातळीवरील परिणामांची काळजी सर्वच संबंधितांना वाटणे साहजिकच!

# शर्यतीच्या गाड्याला वेसण !

राज्यातील बैलगाडी शर्यतीच्या मुद्यावरून गेल्या पाच-सहा वर्षात अनेक चढउतार आले. यासंदर्भातील विधेयकावर २२ जुलैला माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी शिक्कामोर्तब केले. तेव्हा शर्यतींचा मार्ग मोकळा झाला असे समजून शाैकिनांमध्ये 'भिर्ररर.. . 'ची ललकारी घुमू लागली तोच मुंबई उच्च न्यायालयाने या शर्यतींना मनाई केली. साहजिकच कृषी संस्कृती रक्षकांच्या आनंदावर विरजण पडले आता याचे खापर राज्य सरकारवर फ़ोडले जात आहे.

तामिळनाडूमध्येही 'जलिकट्टू'वर बंदी घालण्यात आली तेव्हा त्याविषयीचे विधेयक आणि शर्यतीच्या अनुषंगाने नियमावली अवघ्या चार दिवसांत बनवली गेली. लगोलग 'जलिकट्टू'ला परवानगी मिळाली, या तुलनेत महाराष्ट्रात फारशा वेगाने हालचाली झाल्या नाहीत; हे खरेच. महाराष्ट्रातील बैलगाडा शर्यतींचा मार्ग ६ एप्रिलला मोकळा झाला; त्यासाठी स्पष्ट नियमावली बनवण्याचे निर्देशही कोर्टाने राज्य सरकारला दिले मात्र साधारणपणे गेल्या ६ महिन्यात हे काम झालेच नाही. पुन्हा एकदा शर्यतीचा गाडा नियमांमध्ये रूतला. राज्य सरकारने या शर्यतींच्या अनुषंगाने अधिसूचना काढली असली तरी स्पष्ट नियमावली जोपर्यंत बनवली जात नाही आणि ती कोर्टासमोर सादर केली जात नाही तोवर परवानगी दिली जाणार नाही असे ठणकावत उच्च न्यायालयाने दोन आठवड्यात भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश

दिले आहेत. अजय मराठे यांनी या अधिसूचनेला आव्हान दिले. शर्यतीमुळे बैलांना क्रूरपणे इजा पोहोचवली जाते, शिवाय बैलगाडी शर्यत हा महाराष्ट्राचा पारंपरिक खेळ नाही, असा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला असल्याचेही त्यांनी म्हटले.

विविधतेने समृध्द असलेल्या कृषीप्रधान भारतात संस्कृती-परंपरा आणि आधुनिक मूल्य यांच्यात कैक वर्षांपासून संघर्ष सुरू आहे. सामाजिक उत्क्रांती होत असताना कालसापेक्ष बदल अनिवार्य आणि अपेक्षित आहेतच. विशेषत: ब्रिटीश राजवटीत कायदे तयार व्हायला लागले तेव्हापासून हा संघर्ष अधिक ठळकपणे दिसू लागला. बैलगाडा शर्यत, दहीहंडीचे थर असोत की गणेशोत्सवातील डीजेवरील बंदी या निमित्ताने परंपरा आणि नव्या मूल्यांमधील न्यायालयीन संघर्ष वाढलेला दिसतो आहे. कायद्याचे, न्यायालयाच्या आदेशांचे पालन करण्यात गैर काहीच नाही मात्र सामाजिक-आर्थिक विविधता, विषमतेने व्यापलेल्या समाजाचा सर्वंकष विचार केला तर न्यायालयाच्या निर्णयाच्या विरोधात लोकक्षोभ का निर्माण होतो, याचे उत्तर मिळू शकेल. मुळात नवी मूल्ये समाजात कायद्याच्या धाकाने रुजवता येणार नाहीत, हे अनेक प्रकरणांतून दिसून आले. केवळ लोकजागृती, लोकशिक्षणाचे माध्यम त्यास अधिक उपयुक्त ठरू शकते म्हणूनच शर्यतींच्या नियमांबाबत जनजागृतीची जबाबदारी लोकप्रतिनिधींचीच ठरते, नाही का? उल्लेखनिय म्हणजे या शर्यतींना कुणाचाही विरोध नाही, जो विरोध आहे तो केवळ मुक्या प्राण्यांच्या क्रूर छळाला. त्यासाठी शर्यतीच्या गाड्यांवर स्वार होणाऱ्या बेलगाम वृत्तीला वेसण घालण्याची खरी गरज आहे. यापूर्वी कोल्हापूरचे तत्कालीन पोलिस अधीक्षक माधव सानप यांनी विनालाठी शर्यतीचा प्रयोग करून पाहिला, तो तात्पुरताच ठरला. एक मात्र खरे की, शाैकिनांचा आनंद आणि बैलांच्या शर्यतीसाठी मानवी संवेदनांचा वापर शक्यच नाही असेही नाही. मानवी मनोरंजनासाठी या दोन्ही

गोष्टींचा पध्दतशीर मेळ घालता येऊ शकतो आणि याचीच काळजी नियमावली बनवताना घेतली जावी अशी अपेक्षा आहे.

अगदी पुरातन काळापासून जगभरातील मानवी संस्कृतीने बैलाला सन्मानाने वागवले. मात्र ख्रिस्तपूर्व दोन हजार वर्षापूर्वी गिल्गमेष व एनहिडू यांनी बैलाशी झुंजून त्यावर मात केल्याची दंतकथा आहे. याचेच रूपांतर ‘बुल फाइट’मध्ये झाले. स्पेन, पोर्तुगाल, लॅटिन अमेरिका, फ्रान्समध्ये तो सुरू आहे. त्यातच भर पडली ती बैलाला ठार मारणाऱ्या ‘मॅटेडोर’ची. बैलाशिवाय घोडा, हत्ती, मेंढा, वाघ, सिंहाला पकडण्याचे क्रूर खेळ खेळले जात. गरूड, ससाणे, लावी, कोंबड्याच्या झुंजी लावत. अर्थातच हे खेळ काही नितीमूल्ये पाळून पार पडत, त्याला सांस्कृतिक अधिष्ठान असायचे कारण या माध्यमातून कराच्या स्वरूपात उत्पन्न मिळत असे. मात्र जसा काळ बदलत गेला तसा क्रूरपणाही बळावत गेला; म्हणूनच प्राण्यांशी क्राैर्य प्रतिबंधक कायद्यान्वये जगभर असे क्रूर खेळ-स्पर्धा थांबवण्यासाठी याचिका दाखल झाल्याच्या पहायला मिळतात.

खरे तर मूक प्राण्यांच्या जीवावर खोटे ऐश्वर्य मिरवणाऱ्या दांभिकांच्या निर्दयी खेळांना संमती देणे हा देखील क्रूरपणाच नव्हे काय? सद्सद्विवेक आणि भूतदयेवर आधारित सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा अवमान करणारा समाज अध:पतनाच्याच वाटेवर जाणार असे म्हटले तर वावगे ठरू नये. ज्या भारतीय संस्कृतीने खऱ्या कृषीमित्रांचा सन्मान करण्याची शिकवण जगाला दिली त्या सर्वोच्च संस्कृतीची हेटाळणी आपणच मग्रूरपणे करत नाही आहोत का? पोळयाच्या दिवसी वृषभ पूजन करून कृतज्ञता व्यक्त करण्याची आपली संस्कृती आहे, या परंपरेपासून ते अशा शर्यतींच्या माध्यमातून वृषभनिंदेपर्यंत जाणे हे केवढे दुर्दैव.. . याचे भान तरी समाजाला नसावे का?

# खेळखंडोबा !

सहा खाती सांभाळणारे मंत्री विनोद तावडे क्रीडा विभागाकडे तरी कितपत लक्ष देणार? परिणामी सारा 'खेळखंडोबा' सुरू आहे. मैदान आणि खेळाडू यांच्याशी निगडित 'ग्राउंड रिॲलिटी' संबंधित अधिकारी 'मॅनेज' करीत आले किंबहुना करीतच असतात. त्यामुळे गुणी खेळाडू नेहमीच उपेक्षित, वंचित राहतात ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही.

जागतिक फुटबाॅल महासंघाच्या माध्यमातून ऑक्टोबरमध्ये मुंबईत १७ वर्षांखालील गटात विश्वचषक स्पर्धा होत आहे. संपूर्ण भारतीय उपखंडातील ही पहिलीच स्पर्धा असल्याने यानिमित्ताने देशभरात क्रीडा क्रांती रुजवण्याचे फर्मान पंतप्रधान नरेंद्र मोदींनी काढले अन् राज्य सरकारने 'फुटबाॅल.. . मिशन एक मिलियन' असा उपक्रम आयोजित केला. शिक्षण आणि क्रीडा विभागाने गावोगावी फुटबाॅलचा प्रसार-प्रचार करण्यासाठी रणनीतीदेखील आखली. त्याचाच एक भाग म्हणून विधिमंडळातील लोकप्रतिनिधींमध्ये सामना खेळवण्यात आला. सभागृहात जनतेचे प्रश्न मांडणारे आमदार फुटबाॅल खेळण्यात आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस समालोचनात दंग झालेले पाहताना सारा महाराष्ट्र थक्क झाला नाही तरच नवल! कारण एकीकडे असा उत्सवी माहोल, तर दुसऱ्या बाजूला क्रीडांगण आणि

खेळाडूंच्या वाट्याला आलेली दुरवस्था, जी सातत्याने बिकट होत चालली आहे. उल्लेखनीय म्हणजे १९९६ मध्ये राज्य सरकारने क्रीडा क्षेत्रासाठी स्वतंत्र धोरण आखले. त्यानंतर २०१२ मध्ये त्याची पुनर्रचना करण्यात आली. त्याच्या अंमलबजावणीसाठी आता कुठे राज्य सरकारने पावले उचलली आहेत. निश्चितच ही बाब स्वागतार्ह आहे. मात्र मैदान आणि खेळाडू यांच्याशी निगडित 'ग्राउंड रिॲलिटी'संबंधित अधिकारी 'मॅनेज' करीत आले किंबहुना करीतच असतात. त्यामुळे गुणी खेळाडू नेहमीच उपेक्षित, वंचित राहतात ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही.

महाराष्ट्रातून आंतरराष्ट्रीय ख्यातीचे खेळाडू तयार व्हावेत यासाठी राज्य सरकारने क्रीडापीठ उभारले, ११ क्रीडा प्रबोधिनी स्थापन केल्या. मात्र सोयी-सुविधांच्या अनास्थेपासून प्रशिक्षक, आहाराच्या तक्रारीपर्यंतचा पाढा अद्यापही सुरूच आहे. इतकेच नव्हे, तर शालेय क्रीडा शिक्षकांच्या तासिका कमी करत त्यांना अतिरिक्त ठरवून घरी पाठवण्याचा घाट घातला आहे. यावर कडी म्हणजे क्रीडा धोरण राबवण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली जी समिती नेमण्यात आली त्यामध्ये क्रीडा क्षेत्राशी संबंध नसलेल्यांचाच भरणा अधिक आहे. एकंदर अशा परिस्थितीत एकूणच क्रीडा धोरण आणि १८ सदस्यीय समिती, १४ सदस्यीय उपसमिती कागदावरच नाही का राहणार? मुळात मूलभूत गरजा, पायाभूत बाबींकडे सातत्याने जाणीवपूर्वक दुर्लक्ष का केले जाते, हा खरा प्रश्न आहे. महाराष्ट्रातील खेळाडूंचा टक्का वाढवण्याच्या वल्गना केल्या जातात, मात्र त्यासाठी पुरेसे मनुष्यबळ पुरवले जात नाही. उल्लेखनीय म्हणजे स्वतंत्र क्रीडामंत्री, क्रीडा संचालक, उपसंचालक, क्रीडा अधिकारी, मार्गदर्शकच नाहीत. प्रभारीच सारी कसरत करतात अन् सहा खाती सांभाळणारे मंत्री विनोद तावडे क्रीडा विभागाकडे

तरी कितपत लक्ष देणार? परिणामी सारा ‘खेळखंडोबा’ सुरू आहे. गंमत म्हणजे महाराष्ट्र फुटबाॅलमय करण्यासाठी ३० हजार शाळांमध्ये १ लाख फुटबाॅल दिले आणि १० लाखांहून अधिक मुला-मुलींपर्यंत फुटबाॅल पोहोचवणार, असे क्रीडामंत्री तावडे म्हणाले. पण पायाभूत सुविधांचे काय? पुण्याच्या प्रबोधिनीतील फुटबाॅलपटूंना ५ वर्षांपासून नवा चेंडू नाही, अॅस्ट्रोटर्फ मैदान नसल्याने अॅथलेटिक्सच्या मैदानात उसन्या चेंडूवर बिच्चारे सराव करतात. इतर ठिकाणी दोन वर्षांपासून गणवेश नाहीत, सुविधांची वानवा आहे. एकूणच अशीच अनास्था राज्यात सर्वत्र थोड्याफार फरकाने पाहायला मिळते. हीच अनास्था वीरधवल खाडे, नरसिंग यादव, अंजली भागवत, राही सरनोबत, राहुल आवारे यांसारख्या कित्येक गुणी खेळाडूंना मारक ठरली. जेव्हा आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी प्रोत्साहन, प्रशिक्षणाचे पाठबळ देण्याची गरज होती नेमकी त्या वेळी कुचराई केली गेली. त्याविषयी का बोलले जात नाही? आपल्याकडे खूप चांगल्या योजना असतात, मात्र अंमलबजावणी योग्य पद्धतीने होत नाही हेच खरे दुखणे आहे. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर कामगिरी केलेल्या अन्य प्रांतांतील खेळाडूंना बक्षिसी देण्यात वावगे काही नसले तरी आपल्याच राज्यातल्या खेळाडूंना हक्कापासून वंचित ठेवणे हा अन्यायच नाही का? शालेय स्पर्धा तर जणू सोपस्काराच्या भाग ठरल्या आहेत. यासाठी निवडलेल्या ७५ पैकी ऑलिम्पिक दर्जाचे केवळ ३० खेळ आहेत. त्यावरच फ़ोकस ठेवून काम झाले तर चांगले खेळाडू निश्चितच मिळतील. उर्वरित ४५ खेळांवर उधळपट्टीची गरजच काय?

अर्थातच प्रत्येक खेळाडूला राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर संधी मिळेलच असे नाही तसेच ५% आरक्षणातही प्रत्येकाला संधी मिळेल असेही नाही. म्हणूनच खेळ हा शारीरिक तंदुरुस्तीसाठी अनिवार्य असावा. त्यासाठी पायाभूत,

आनुषंगिक सुविधाही हव्यातच. क्रीडा क्षेत्राचा खऱ्या अर्थाने विकास करायचा असेल तर नियोजित पद्धतीने आणि कालावधीत योजनांची सढळ, परिणामकारक अंमलबजावणी होणे आवश्यक आहे, जेणेकरून अनेक प्रलंबित प्रकल्पांना चालना मिळण्यास मदत होऊ शकेल. अन्यथा पायाने खेळला जाणारा फुटबॉल ज्या राज्यातील आमदार हाताने खेळू लागतात त्या राज्यात यापुढेही असा खेळखंडोबा सुरूच राहिला तर नवल ते काय?

# ‘रेरा’ पॅनलची मध्यस्थी!

बिल्डर-ग्राहक यांच्यातील वाद, तक्रारींचा सामंजस्याने निपटारा करण्याच्या हेतूने ‘रेरा’ पॅनल गठीत केले जात आहे. अशा स्वरूपाचे पॅनल गठीत करणारे महाराष्ट्र हे पहिलेच राज्य ठरावे. येत्या ३ महिन्यांत हे पॅनल कार्यवाही सुरू करेल. अर्थातच या पॅनलचे यशापयश हे ग्राहकांकडून मिळणाऱ्या प्रतिसादावर अवलंबून असेल.

लोकांची गरज हीच व्यवसायाची जननी असते. कुठल्याही व्यवसायात मिळणारे उत्पन्न, नफा खरेदीदाराकडूनच मिळतो आणि त्यास बांधकाम क्षेत्र अपवाद नाही. महाराष्ट्रातील नागरीकरण जसजसे वाढत राहिले तसे बांधकाम व्यवसायाची भरभराट होत राहिली. त्यातूनच या व्यवसायाच्या अनुषंगाने १९६३ साली ‘मोफा’ कायदा अस्तित्वात आला. मात्र गुंतागुंतीचे ठरलेले अभिहस्तांतरण त्यापाठोपाठ बांधकाम व्यवसायातील समस्या आणि त्यांचे स्वरूप यामध्ये झालेला आमूलाग्र बदल यामुळे ‘मोफा’च्या मर्यादा स्पष्ट झाल्या. नेमका याच मर्यादांचा विचार करून ‘रेरा’ कायदा अंमलात आणला गेला. हा कायदा बांधकाम व्यवसायात आमूलाग्र बदल घडवेल अशी अपेक्षा आहे. या कायद्यातील तरतुदींनी ग्राहकांना बऱ्यापैकी सुविधा, अधिकार जसे दिले तसेच विकासकांना व्यावसायिक नियोजन, शिस्त लावण्याचा प्रयत्न केला. त्यातच

आणखी एक आशादायक भर म्हणजे आता बिल्डर-ग्राहक यांच्यातील वाद, तक्रारींचा सामंजस्याने निपटारा करण्याच्या हेतूने 'रेरा' पॅनल गठीत केले जात आहे. अशा स्वरूपाचे पॅनल गठीत करणारे महाराष्ट्र हे पहिलेच राज्य ठरावे. येत्या ३ महिन्यांत हे पॅनल कार्यवाही सुरू करेल. अर्थातच या पॅनलचे यशापयश हे ग्राहकांकडून मिळणाऱ्या प्रतिसादावर अवलंबून असेल.

आजवर बांधकाम व्यवसायात शिस्त, नियोजन असा काही भागच नव्हता असे अजिबात नाही, मात्र त्यात काटेकोरपणाचा अभाव होता हे तितकेच खरे. प्रकल्पाच्या आरंभापासून तो पूर्ण होईपर्यंत अनेक लहान-सहान चिक्कार बदल होत असत, कारण आजवरचे कायदे या व्यवसायातील ठराविकच मुख्यत: कायदेशीर बाबींनाच स्पर्श करीत होते, अन्य घटकांवर कायदेशीर नियंत्रण किंबहुना बंधन नव्हते. मात्र 'रेरा' हा बांधकाम व्यवसायाशी संबंधित बहुतेक सर्व घटकांशी निगडीत असल्यामुळे विकासकांना प्रकल्पाशी संबंधित प्रत्येक बाबींचे नियोजन करावे लागणार हे निर्विवाद. इथे उल्लेखनिय म्हणजे आतापर्यंत 'महारेरा' अंतर्गत २१७ तक्रारी दाखल झाल्या तर १३,२५० प्रकल्पांची नोंदणी झाली. १३,३८१ प्रकल्प सुरू आहेत. नोंदणीसाठी ९,५०० पेक्षा अधिक एजंटांचे अर्ज आले आहेत. याचाच अर्थ बांधकाम क्षेत्राशी निगडित व्यावसायिकांनी देखील 'महारेरा'चे स्वागतच केले आहे. म्हणूनच या कायद्याकडे आपत्ती म्हणून न पाहता नियोजनपूर्वक, शिस्तबध्द व्यवसाय करण्याची संधी म्हणून पहायला हवे. त्याचसोबत 'रेरा' पॅनलच्या मध्यस्थीचा देखील एक संधी म्हणूनच विचार व्हायला हवा. 'महारेरा'मुळे रियल इस्टेट क्षेत्रात बदल होत असतानाच बांधकाम विकासक आणि घर/फ्लॅट खरेदीदार यांच्यातील तक्रारी सोडवण्यासाठी मध्यस्थीची गरज

प्रकर्षाने जाणवत होती. त्यातून मध्यस्थांचे पॅनेल किंबहुना समिती स्थापण्याच्या अनुषंगाने मसुदा तयार करण्यात आला. सध्या सुरू असलेल्या बांधकाम प्रकल्पाबाबत तक्रारी, अडचणी असतील तर 'महारेरा'कडे तक्रार करण्याचा पर्याय ग्राहकांना खुला आहेच मात्र त्याचवेळी जर मध्यस्थ समितीची मदत मिळाली तर अगोदरच्या तक्रारींवर 'महारेरा'ने दिलेल्या आदेशाचा आधार घेऊन मार्ग काढणे सुलभ होऊ शकते, असा उद्देश या समितीच्या स्थापनेमागे आहे. मुळात बिल्डर आणि ग्राहकांतील बरेच वाद हे व्यक्तिगत अहंगंड, गैरसमज किंवा संवादाच्या अभावातून उद्भवतात. अशा परिस्थितीत आधीच आर्थिक कारणांमुळे पिचलेल्या ग्राहकाच्या अडचणींचा निपटारा मध्यस्थाच्या मदतीने शक्य तितक्या लवकर होऊ शकला तर अधिक सोयीचेच ठरेल, नाही का? अर्थातच 'रेरा' पॅनलची मदत घ्यायची किंवा नाही हे पूर्णत: ऐच्छिक आहे. या समितीवर ग्राहकांचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी मुंबई ग्राहक पंचायतच्या वतीने १० तर बांधकामदारांचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी या क्षेत्रातील १० व्यक्ती नामनिर्देशित केल्या जाणार आहेत. ही समिती गृह खरेदीदारांचे अधिकार आणि बांधकामदारांची जबाबदारी याचा सारासार विचार करून तक्रारींचे निवारण करण्याचा प्रयत्न करेल आणि त्यास कायद्यातील तरतुदींचा आधार असेल.

सध्या मुंबई, पुणे, ठाणे, नवी मुंबई, नागपूर या शहरांतून अधिक प्रमाणात तक्रारी आल्या आहेत. त्यामुळे तेथे पॅनलची कार्यवाही लगेच सुरू होईल. या ठिकाणांवर मिळणारा एकंदर प्रतिसाद, उपयुक्तता विचारात घेऊन राज्यभर 'रेरा' पॅनलच्या विस्ताराबाबत निर्णय घेतला जाईल. तूर्त तरी 'रेरा' पॅनलचे एकंदर स्वरूप आणि स्थापनेमागची भूमिका लक्षात घेता या माध्यमातून ग्राहकासह बांधकाम क्षेत्राशी निगडीत सर्वांच्या हिताची सामंजस्यपूर्वक जपणूक करण्याचा प्रयत्न होईल अशी अपेक्षा आहे.

# पक्षीय हुकूमशाहीचे सावट

> भारतातील राजकीय पक्ष घराणेशाहीच्या विळख्यातून मुक्त व्हायला हवेत ही अपेक्षा रास्त आहे. त्यासाठी पक्षांतर्गत लोकशाही व्यवस्था, मूल्ये मजबूत करण्याची खरी गरज आहे. तूर्तास तरी ते शक्य वाटत नाही. मुळात त्यासाठी भारतीयांना आपला व्यक्तिपूजक स्वभाव बदलावा लागेल.

राजकीय पक्षांमध्ये सर्वांचे ऐकून घेतले जाईल अशा स्वरूपाची लोकशाही मूल्ये, व्यवस्था रुजवण्याची गरज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना अखेर पटली. मात्र देशातील सर्वात श्रीमंत आणि विस्ताराने मोठ्या अशा भाजपचे नेतृत्व करणाऱ्या मोदींना आत्ताच का लोकशाही मूल्यांची आवश्यकता विशद करावीशी वाटली, हा कळीचा मुद्दा आहे. विशेषत: राहुल गांधी यांच्याकडे काँग्रेसची सूत्रे सोपवण्याची चर्चा सुरू असताना हा मुद्दा मांडला, याचा अर्थ काँग्रेस आणि गांधी घराण्याला उपरोधिकपणे टोला लगावण्याची संधी त्यांना वाया घालवायची नव्हती, असे म्हणण्यास वाव आहे. राजकीय पक्षांविषयी, त्यांना मिळणाऱ्या देणग्यांविषयी बरेच काही लिहिले जाते. मात्र पक्षांतर्गत लोकशाहीविषयी फारशी चर्चा होत नाही, त्याविषयी फारसे लिहिले जात नाही, याविषयी मोदींना वाटणारी खंत ही साहजिकच आहे. कारण देशाच्या भविष्याच्या दृष्टीने राजकीय पक्षांमध्ये अंतर्गत लोकशाहीची भावना प्रबळ असणे आत्यंतिक महत्त्वाचे ठरते. राजकारण बाजूला ठेवून मोदींच्या या विधानाकडे पाहिले तर आज

भारतात कुठल्याही राजकीय पक्षात लोकशाही आहे असे दिसते का? वस्तुत: पक्षांतर्गत लोकशाही ही केवळ औपचारिक बाब राहिली असून अनेक परिवारांनी व्यक्ती-घराणेकेंद्री राजकारण साधत खासगी मालमत्तेसारखा त्यावर कब्जा केलेला पाहायला मिळतो. जोपर्यंत काँग्रेसमध्ये अंतर्गत लोकशाही, संघटनात्मक व्यवस्था मजबूत होती तोपर्यंतच ती सामान्यांचा आवाज ठरली. मात्र स्व. इंदिरा गांधी यांचा प्रभाव वाढला तेव्हापासून पक्षांतर्गत लोकशाहीला ओहोटी लागली आणि व्यक्तिकेंद्री राजकारणाने मूळ धरले. अलीकडच्या काळातील राजकीय पक्षांचा इतिहास पाहता पहिल्या पिढीने संघर्ष करून लोकमानसात नेतेपद मिळवले आणि नंतर आपल्याच मुलांना वारसदार ठरवल्याचे दिसते. त्यात करुणानिधी, लालूप्रसाद यादव, मुलायमसिंह यादव, ठाकरे-पवार कुटुंबीय आदींचा उल्लेख करता येईल. उल्लेखनीय म्हणजे कुणालाही आपल्या सहकाऱ्यांची आठवण का नाही झाली? अर्थातच आजही सामान्य लोकांना ते उद्धारकर्ते वाटतात, त्यांच्यावर जनता भरभरून प्रेमदेखील करते. मात्र संधी असूनही त्यांनी संस्थात्मक प्रक्रियेला बळ देण्याऐवजी व्यक्ती-घराणेकेंद्रित पक्ष मजबूत करण्यावर का भर दिला, हा प्रश्न उरतोच. आपली राजकीय व्यवस्था खिळखिळी होण्यामागचे हे एक महत्त्वाचे कारण असावे. पक्षांतर्गत लोकशाहीला बळ मिळाले की अनेकांच्या व्यक्तिगत महत्त्वाकांक्षा, इच्छाशक्ती बळावतात. तसे ते स्वाभाविक आहे. कदाचित त्यामुळेच पक्षांतर्गत लोकशाहीकडे दुर्लक्ष होत असावे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांपासून ते संसदीय निवडणुकांमध्ये बहुतेक पक्ष व्यक्ती-घराणेकेंद्री झाल्याचेच पाहावयास मिळतात. ही बाब लोकशाही तत्त्वाशी विसंगत ठरते.

भारतातील राजकीय पक्ष घराणेशाहीच्या विळख्यातून मुक्त व्हायला हवेत ही अपेक्षा रास्त आहे. त्यासाठी पक्षांतर्गत लोकशाही व्यवस्था, मूल्ये मजबूत करण्याची खरी गरज आहे. तूर्तास तरी ते शक्य वाटत नाही. मुळात त्यासाठी

भारतीयांना आपला व्यक्तिपूजक स्वभाव बदलावा लागेल. ते शक्य आहे का? मात्र अशक्य नाही हेही तितकेच खरे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनादेखील हेच अपेक्षित असले तरी इतकी वर्षे अन्य राजकीय पक्षांपेक्षा निराळा राहिलेल्या भाजपत मोदी गजर सुरू झाल्याने या पक्षाचीही वाटचाल आता व्यक्तिकेंद्रित होताना दिसते आहे, हे नाकारता येत नाही. जेव्हा व्यवस्थेत एखादी व्यक्ती अतिशय मजबूत होऊन जाते तेव्हा ती व्यवस्थेला धोका निर्माण करू शकते, हे भारतीयांनी अनुभवले आहे. स्व. इंदिरा गांधींनी अमलात आणलेली आणीबाणी हे त्याचे उत्तम उदाहरण ठरावे. पं. नेहरूंच्या काळापासून पक्ष सभासदांना सभागृहात मतस्वातंत्र्य नाकारले गेले. आता मोदींच्या काळात तरी वेगळे काय घडत आहे? संसदीय लोकशाहीची जननी मानला जाणारा इंग्लंडदेखील अपवाद ठरत नाही. लोकप्रतिनिधींनी जनतेशी, विकासाशी एकनिष्ठ असावे, स्वविवेकाने त्यांनी भूमिका घ्याव्यात हीच प्रातिनिधिक लोकशाहीची अपेक्षा असली तरी पक्षनेत्यांची हुकूमशाही वृत्ती त्यावर कुरघोडी करते. त्यामुळे देशात लोकशाही आणि पक्षात नेतृत्वाची हुकूमशाही असा अंतर्विरोध निर्माण होतो. इंग्लंडपासून भारतापर्यंत अनेक लोकशाही देश अजूनही प्रगल्भ लोकशाही विचारप्रणालीपासून खूप-खूप दूर आहेत. हा तिढा शक्य तितक्या लवकर सुटावा यासाठी सर्वच पक्षनेत्यांनी व्यक्तिसापेक्ष दृष्टिकोन बाजूला ठेवून प्रयत्न करायला हवेत, तरच खऱ्या अर्थाने राजकीय पक्षांमध्ये लोकशाही मूल्ये रुजू शकतील. अन्यथा संसदीय लोकशाहीचे बिरूद मिरवणाऱ्या पक्षीय हुकूमशाहीचे आपणावर नियंत्रण असेल हे तितकेच खरे!

# रोबो : यंत्र नव्हे, नागरिक!

> कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे होणारा बदल असामान्य असला तरी तो स्वीकारणे अपरिहार्य ठरणार आहे. मात्र त्यासाठी मानवी बुद्धिमत्तेला समजून घेऊन तिचा विकास करण्याची खरी गरज आहे आणि त्यातच खऱ्या अर्थाने कृत्रिम बुद्धिमत्तेचाही विकास दडलेला आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे मानवी अचाट कल्पनाशक्ती आणि सातत्यपूर्ण प्रयोगशीलतेचे यश. मॅकलॉक आणि पिट्स या सं ंशोधकांनी १९४३ मध्ये चेताजाल तंत्रज्ञानाची संकल्पना सादर केली. १९५० मध्ये आयझॅक आसिमोव्ह यांनी 'आय रोबोट' या कादंबरीत रोबोटिक तंत्राचा वेध घेतला. १९५५ मध्ये जा ॅन मॅकार्थी यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेची संकल्पना पहिल्यांदा जगासमोर आणली. मात्र १९५६ मध्ये तिच्या विकासाला खऱ्या अर्थाने गती मिळाली. १९९० मध्ये बुद्धिबळपटू गॅरी कास्पारोव्ह 'डीप ब्ल्यू' संगणकाकडून पराभूत झाला, तेव्हा कृत्रिम बुद्धिमत्तेच्या तंत्रातील ताकद जगाला कळली. मानवनिर्मित कृत्रिम बुद्धिमत्ता लाभलेले संगणक आणि यंत्रमानव आता मानवाशीच स्पर्धा करीत आहेत. इतकेच नव्हे तर थेट मानवी जीवनात त्यांचा हस्तक्षेप वाढल्यामुळे मानवजात नष्ट होते की काय, अशी भीती भा ैतिकशास्त्रज्ञ स्टीफन हॉकिंग यांच्याप्रमाणेच बिल गेट्स यांनीदेखील व्यक्त केली. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या

निर्मिती प्रक्रियेतील संशोधकांत दोन मतप्रवाह आहेत. मेंदू हे जैविक यंत्र असून मानवास आणि उत्क्रांतीला यंत्राप्रमाणेच मर्यादा असल्याचे एक गट म्हणतो, तर दुसऱ्या गटाच्या मते मेंदू ही एक गुंतागुंतीची जैविक निर्मिती आहे. त्यामुळे यंत्राची धास्ती घेण्याचे कारण नाही. असे असले तरी मेंदूकडून खूप काही शिकण्यासारखे आहे, असे दोघांनाही वाटते. कृत्रिम बुद्धीमत्तेच्या तंत्राद्वारे निर्माण झालेली यंत्रे मानवाची जागा घेऊ शकणार नाहीत. कारण तर्कावर चालणारे संगणक-यंत्रमानव अडखळतात, मात्र मेंदूचे तसे होण्याची शक्यता नाही. ज्या पद्धतीने तो तर्काचा वापर करतो तसाच सृजनशीलतेचा करतो. एक मात्र खरे की, कृत्रिम बुद्धिमत्तेने युक्त यंत्रे स्वत:चे मत द्यायला लागली, मानवी जीवनात हस्तक्षेप करू लागली तर माणसांनी काय करायचे? ‘आयबीएम’ने मानवी भावना समजू शकणारा संगणक विकसित केला असून रे कुर्झव्हेल या तंत्रज्ञान भविष्यवेत्त्याने २०४५ पर्यंत मानवी मेंदूला कृत्रिम बुद्धिमत्ता मागे टाकेल असा दावा केला आहे. या पार्श्वभूमीवर रोबोटिक वकिलाच्या नियुक्तीचा मुद्दा उल्लेखनीय ठरतो. अमेरिकेतील बेकर होस्टेटलर या कायदेविषयक कंपनीने ‘राॅस’ या रोबो वकिलाची दिवाळखोरीविषयक प्रकरणे हाताळण्यासाठी नियुक्ती केली, तो आयबीएमच्या वॉट्सन प्रणालीने बनवला असून वकिलांना त्यांच्या क्षमता वाढवण्यासाठी तो मदत करतो आहे. बहुधा जगातील हे पहिलेच उदाहरण असावे.

यंत्रमानवामुळे अवघड कामे सोपी होत असली तरी त्यास अधिक स्मार्ट करण्याचे संशोधकांचे प्रयत्न सुरू आहेत. काही ठराविक, विशिष्ट काठिण्य पातळीची कामे रोबो करीत असत. मात्र तांत्रिक प्रगतीमुळे त्यास मर्यादा राहिल्या नाहीत. आता तर मानवी भावना ओळखणे, त्यानुसार प्रतिसाद देणे, केवळ आज्ञा पाळणे इतकेच नव्हे तर त्यामागील भावना, उद्देश लक्षात घेऊन तसा प्रतिसाद

देण्याइतका रोबो स्मार्ट झाला आहे. म्हणूनच तर यंत्रमानवाला स्वत:चे नागरिकत्वही मिळाले आहे. साैदी अरेबियाने ‘सोफिया’ या महिला रोबोला नागरिकत्व बहाल केले असून तो जगातील पहिलाच देश ठरला. रोबोला नागरिकत्व देण्याच्या मुद्द्यावरून इलॉन मस्क यांच्यासह अनेकांनी आक्षेप नोंदवला. जेव्हा या बाबीची कल्पना सोफियाला दिली तेव्हा, ‘तुम्ही माझ्याशी नम्रपणे वागाल तर मीही नम्रपणे वागेन. मला माणसांसोबत रहायला आवडेल कारण त्यांच्यासोबत राहून मला बऱ्याच गोष्टी शिकायला मिळतील. लोकांचा विश्वास संपादन करण्यास त्याचा खूप फायदा होईल,’ असे स्मार्ट उत्तर तिने पत्रकार परिषदेत दिले. इंटरनेट आणि साॅफ्टवेअरला ‘स्मार्ट डिसिजन सपोर्ट सिस्टिम’ म्हणून कृत्रिम बुद्धिमत्तेच्या तंत्राचा वापर मोठ्या प्रमाणावर होत असला तरी एखाद्या यंत्रमानवाला नागरिकत्व बहाल करणे जोखमीचेच आहे. एक मात्र खरे की, अर्थशास्त्राच्या सिद्धांतानुसार यांत्रिकीकरणामुळे रोजगार संधी कमी होतात, उत्पादन वाढते. पर्यायाने आर्थिक वाढ होते, पुन्हा नव्या रोजगार संधी निर्माण होतात. सुविधा-वस्तूंच्या किमती आवाक्यात येतात. परिणामी बचत आणि क्रयशक्ती वाढते. हे अर्थचक्र अव्याहतपणे सुरू राहते. कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे होणारा बदल असामान्य असला तरी तो स्वीकारणे अपरिहार्य ठरणार आहे. मात्र त्यासाठी मानवी बुद्धिमत्तेला समजून घेऊन तिचा विकास करण्याची खरी गरज आहे आणि त्यातच खऱ्या अर्थाने कृत्रिम बुद्धिमत्तेचाही विकास दडलेला आहे.

# राज मुकूटातील काटे!

सौदीचे युवराज मोहम्मद बिन सलमान यांच्या स्वप्नपूर्तीचा किंबहुना सत्ताग्रहणाचा मार्ग तूर्तास प्रतिस्पर्ध्यांच्या अभावामुळे राजकीय दृष्ट्या निष्कंटक झालेला असला तरी कट्टर परंपरावादाचे पाईक अडसर ठरू शकतात. मुख्यत: तेल हा सौदी अरेबियाच्या उत्पन्नाचा आणि श्रीमंतीचा अत्यंत महत्वाचा स्रोत आहे. त्यामुळे क्रूड तेलाच्या उत्पन्नावर आधारित सौदीच्या अर्थव्यवस्थेला वेगळे वळण देणे हे अत्यंत महत्वाचे आव्हान त्यांच्यासमोर आहे.

सौदीचे युवराज मोहम्मद बिन सलमान यांनी सुधारणावादी मोहीमांचा जणू धडाका लावला आहे. महिलांना वाहन चालवण्याची मुक्त परवानगी देण्यासोबतच सामाजिक जीवनातील त्यांचा सहभाग वाढवण्यासाठी बऱ्याच सुधारणावादी घोषणा केल्या. त्यापाठोपाठ सौदीला भ्रष्टाचारमुक्त करण्याचा विडा उचलला. सौदीत महागड्या भेटवस्तू, लाच देणे अशा स्वरूपाची भ्रष्टाचाराची पध्दत नाही; मात्र फुगवलेले किंवा आभासी, गरज नसलेल्या ठिकाणचे प्रकल्प, आपत्कालीन मदत कार्य अशा स्वरूपाची भ्रष्टाचाराची कुरणे जागोजागी आढळतात. उदाहरणच सांगायचे तर जमिनीवर खोदकाम केलेले दिसेल परंतु त्याखाली पाईपलाइन टाकलेलीच नसेल. अशा आभासी प्रकल्पांच्या माध्यमातून

होणाऱ्या भ्रष्टाचाराला पायबंद घालण्यासाठी युवराज मोहम्मद बिन सलमान यांनी भ्रष्टाचार निर्मूलन आयोगाच्या माध्यमातून मोहीम सुरू केली. अधिकारांचा गैरवापर तसेच भ्रष्टाचार करणाऱ्यांना शासन आणि नागरिकांच्या पैशाची जपणूक करण्यासाठी या आयोगाची स्थापना झाली असली; तरी ही मोहीम भ्रष्टाचाराच्या विरोधात की, राज मुकूटातले काटे बाजूला सारण्यासाठीची आहे ते लवकरच कळेल. मात्र पारदर्शक कारभाराच्या या बाॅम्बने अंतर्गत राजकारणात खळबळ उडवली. ११ राजपुत्रांसह डझनभर मंत्र्यांना अटक झाली, अधिकाऱ्यांसह सुमारे ७० पेक्षाही अधिक जणांना ताब्यात घेतले आहे. विशेषत: ‘ट्विटर’, ‘अॅपल’, ‘सिटी ग्रुप’ आणि ‘लिफ्ट’सह मोठी गुंतवणूक असलेले जगातील ५० अब्जाधिशांपैकी एक अल वलिद तलाल, साैदीच्या गादीचे प्रमुख दावेदार आणि नॅशनल गार्डचे अध्यक्ष मितेब बिन अब्दुल्ला यांचाही त्यात समावेश असल्याने या घटनेचे पडसाद जागतिक पातळीवर उमटत आहेत. १९९१-९५ दरम्यान डोनाल्ड ट्रम्प (अमेरिकेचे विद्यमान राष्ट्राध्यक्ष) यांचा डबघाईला आलेला व्यवसाय सावरण्यासाठी त्यांचे एक आलिशान जहाज दोन कोटी डॉलर्सला अल वलिद तलाल यांनी विकत घेतले होते, या एका उदाहरणावरून तलाल यांचा संपर्क तसेच व्यावसायिक आवाका लक्षात येऊ शकेल.

साैदीत जे अटकसत्र घडले ते अजिबात नाट्यमय पध्दतीचे नाही, त्याची बीजे २०१५ मध्ये पेरली गेली होती. राजे अब्दुल्ला यांच्या निधनानंतर जानेवारी २०१५ मध्ये सलमान बिन अब्दुल्ला अझिज यांनी राज्य कारभाराची सुत्रे स्वीकारली. लगेचच तीन महिन्यांनंतर राजे सलमान यांनी गृहमंत्री मोहम्मद बिन नायफ यांस वारसदार घोषित केले. त्यामुळे वारसदाराच्या शर्यतीत अग्रणी असलेला मोहम्मद बिन सलमान डावलला गेला, तेव्हापासून राजकीय खदखद सुरू होती. अखेर राजे सलमान यांनी मोहम्मद बिन सलमानकडेच सूत्रे सोपविण्याचा

पवित्रा घेतला. या साऱ्या घडामोडींमागे तेल आणि त्याच्याशी निगडीत अर्थकारण हे घटक जसे आहेत; तसेच पश्चिम आशियातील सुन्नी-शिया वादाची झालर देखील आहेच. इराणच्या वाढत्या वर्चस्वामुळे राजे सलमान अस्वस्थ होणे स्वाभाविकच होते. त्यामुळेच सौदीचे राजकीय-आर्थिक स्थैर्य मजबूत करण्यासाठी जपान, चीनशी अब्जावधी डॉलर्सचे करार केले. मलेशिया, ब्रुनेई, इंडोनेशियाचा दौरा केला. परिणामी परिस्थिती काहीशी बदलली आणि त्याची परिणती या अटकसत्रात झाली. लगोलग काही महिन्यांपासून घसरलेले तेलाचे भाव पुन्हा वधारलेले दिसले, ते सौदीच्या हिताचेच ठरले. एकंदरीत या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर युवराज मोहम्मद बिन सलमान यांची राज सिंहासनाच्या दिशेने दमदार पावले पडत आहेत. त्याचसोबत सत्तेवरील पकड मजबूत करण्याचे त्यांचे कसब देखील स्पष्ट दिसून होते. बहुधा येत्या दीड महिन्यात (८१ वर्ष वयाचे) राजे सलमान आपली जबाबदारी त्यांच्याकडे सोपवतील अशी चिन्हे आहेत. मोहम्मद बिन सलमान यांच्या स्वप्नपूर्तीचा किंबहुना सत्ताग्रहणाचा मार्ग तूर्तास प्रतिस्पर्ध्यांच्या अभावामुळे राजकीय दृष्ट्या निष्कंटक झालेला असला तरी परंपरावादी धार्मिक दृष्टिकोनाचे पाईक अडसर ठरू शकतात. मुख्यत: तेल हा सौदी अरेबियाच्या उत्पन्नाचा आणि श्रीमंतीचा अत्यंत महत्वाचा स्त्रोत आहे. त्यामुळे तेलाचे भाव स्थिर राखणे, क्रूड तेलाच्या उत्पन्नावर आधारित सौदीच्या अर्थव्यवस्थेला वेगळे वळण देणे हे देखील अत्यंत महत्वाचे आव्हान युवराज मोहम्मद बिन सलमान यांच्यासमोर आहे. कदाचित यामुळे नजिकच्या भविष्यात क्रूड तेलाच्या व्यवहारात मंदी येऊ शकते, आणि जागतिक अर्थकारणावर त्याचा परिणाम अपरिहार्य ठरेल.

एक मात्र खरे, सौदीतील या सुधारणावादाचा भारताला काही अंशी फायदा झाला किंबहुना होत आहे. मुख्यत: दहशतवाद धार्जिण्या पाकिस्तानविषयी आजवर नरमाईची भूमिका घेतली जात असे, मात्र आता खडे बोल सुनावले जात

आहेत. दिल्लीतील दहशतवाद्यांना शोधण्यासाठी भारतीय गुप्तचर यंत्रणेला पुरेशी मदत उपलब्ध करून देण्यात साैदीने सहाय्य केले. याशिवाय भारतातील वीजनिर्मिती प्रकल्पांमध्ये गुंतवणूक करण्याचे स्वारस्य देखील दाखवले आहे. युवराज मोहम्मद बिन सलमान यांचा सुधारणावाद वस्तुनिष्ठ, तर्काधिष्ठित असेल तर भविष्यात धर्मभेदाच्या पलिकडे जावून भारताला विशेषत: साैदीला मोठा अर्थलाभ होणार हे निश्चित.



# राजनैतिक विजय!

> सुरक्षा परिषदेतील सदस्य राष्ट्र विशेषत: महासत्तांनी न्या. दलवीर भंडारी यांच्या विजयरथाची घोडदौड पाहून धसका घेतला. कदाचित भविष्यात आपणासमोर नवी आव्हाने उभी राहू शकतील, अशी भीती त्यांना वाटते आहे.

आंतरराष्ट्रीय न्यायालयाच्या न्यायाधीशपदी दुसऱ्यांदा विराजमान होण्याचा सन्मान अखेर भारताचे न्या. दलवीर भंडारी यांना मिळाला. या फेरनियुक्तीत ब्रिटन मोठा अडसर ठरला होता. ब्रिटनने क्रिस्तोफर ग्रीनवुड यांना नामांकन जाहीर केले होते. या दोघांत अक्षरश: अटीतटीची लढत चालली होती. संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेत ब्रिटनचा समावेश असल्याने अमेरिका, रशिया, फ्रान्स आणि चीन या देशांनी ग्रीनवुड यांना समर्थन दिले, त्यामुळे ब्रिटनचे पारडे जड बनले होते. ११ फेऱ्यांमध्ये न्या. भंडारी यांना संयुक्त राष्ट्राच्या महासभेत दोनतृतीयांश मतांनी बहुमत मिळाले. मात्र, सुरक्षा परिषदेत ते ग्रीनवुड यांच्या तुलनेत ३ मतांनी पिछाडीवर होते. त्यासाठी १२ वी फेरी घेतली जाणार होती; मात्र या चुरशीच्या लढतीत अखेरच्या क्षणी ब्रिटनचे क्रिस्तोफर ग्रीनवुड यांनी आपला पराभव स्वीकारून अनपेक्षितरीत्या माघार घेतली. महासभेतील १९३ पैकी १८३, तर सुरक्षा परिषदेतील सर्व १५ मते न्या. भंडारी यांना मिळाल्याने फेरनियुक्तीचा मार्ग मोकळा झाला. न्या. भंडारी यांची निवड म्हणजे संयुक्त राष्ट्रातील भारताचा मोठा राजनैतिक विजय मानला जात असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यासाठी जबरदस्त मोहीम चालवली होती. दरम्यान, यापूर्वी न्या. नगेंद्र सिंह 'आयसीजे'मध्ये दोन वेळा न्यायाधीश झाले होते. न्या. भंडारी यांची 'आयसीजे'वर निवड झाल्यानंतर जितके काही निर्णय घेतले गेले त्यामध्ये त्यांचे मत



हे ‘स्पेशल ओपिनियन’ राहिले हे यानिमित्ताने उल्लेखनीय ठरावे. माजी नौदल अधिकारी कुलभूषण जाधव यांना पाकिस्तानने हेरगिरीच्या आरोपाखाली सुनावलेल्या देहदंडाच्या शिक्षेला आंतरराष्ट्रीय न्यायालयाने स्थगिती दिली होती. त्या प्रकरणातील १५ न्यायाधीशांमध्ये न्या. दलवीर भंडारी यांची भूमिका महत्त्वपूर्ण होती. त्यांनी २००८ च्या भारत-पाक कराराचा हवाला देत मानवाधिकारांचे उल्लंघन केल्याचा पाकिस्तानवर ठपका ठेवला होता.

न्या. भंडारी यांचा जन्म १ ऑक्टोबर १९४७ मध्ये झाला. आजोबा बी. सी. भंडारी आणि वडील महावीरचंद भंडारी यांच्याकडून त्यांना वकिलीचा वारसा मिळाला. भंडारी यांनी राजस्थानमधील जोधपूर विद्यापीठातून कायद्याची पदवी घेतली. त्यानंतर अमेरिकेतील नॉर्थवेस्टर्न युनिव्हर्सिटी स्कूल येथून कायद्यातील पदव्युत्तर पदवी मिळवली. शिकागोत वकिली केल्यानंतर ते भारतात परतले. १९७३ ते १९७६ या काळात राजस्थान हायकोर्टात वकिली केली. १९७७ मध्ये ते दिल्ली हायकोर्टात वकिली करू लागले. या क्षेत्रातील २३ वर्षांच्या अनुभवानंतर १९९१ मध्ये त्यांची दिल्ली उच्च न्यायालयात न्यायाधीशपदी नेमणूक झाली. त्यानंतर मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणूनही त्यांनी कार्यभार सांभाळला. ऑक्टोबर २००५ मध्ये त्यांना सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून बढती देण्यात आली होती. १९ जून २०१२ रोजी पहिल्यांदा त्यांनी आंतरराष्ट्रीय न्यायालयातील न्यायाधीशपदाची शपथ घेतली. त्यांना पद्मभूषण पुरस्काराने गौरवण्यात आले आहे. न्यायप्रणालीत जगभर होत असलेल्या सुधारणांच्या पार्श्वभूमीवर त्यांनी ‘ज्युडिशियल रिफ़ॉर्म्स : रिसेंट ग्लोबल ट्रेंड्स’ हे पुस्तकदेखील लिहिले आहे.

नेदरलँडमधील हेग येथे १९४६ मध्ये आंतरराष्ट्रीय न्यायालयाची स्थापना झाली. त्यानंतर पहिल्यांदाच या खेपेस ब्रिटनला सदस्यत्व मिळालेले नाही. सोप्या शब्दांत सांगायचे तर या आंतरराष्ट्रीय न्यायालयात पहिल्यांदाच ब्रिटनचा कोणी न्यायाधीश नाही. या न्यायालयासाठी १५ न्यायाधीशांपैकी १४ जणांची निवड

झाली होती. मात्र, न्या. भंडारी आणि ग्रीनवुड यांच्यातील चुरस अत्यंत रोमांचक बनली होती. या निवडीचे वैशिष्ट्य म्हणजे संयुक्त राष्ट्र महासभा आणि सुरक्षा परिषदेत मताधिक्याने विजयी होणे आवश्यक असते. या न्यायाधीशांपैकी एकतृतीयांश लोकांची निवड दर तीन वर्षांनी केली जाते. त्याचप्रमाणे एकाच राष्ट्राचे दोन न्यायाधीश असू शकत नाहीत, तसेच त्यांना अन्य कोणतेही पद स्वीकारता येत नाही. जर एखाद्या न्यायाधीशाला हटवायचे असेल तर उर्वरित न्यायाधीशांनी सर्वसंमतीने तसा निर्णय घेणे अत्यावश्यक असते. कुणीही सदस्य देश या न्यायालयाचे दार ठोठावू शकतो. सध्या १९२ देश या न्यायालयाचे सदस्य आहेत. सुरक्षा परिषदेतील सदस्य राष्ट्र विशेषत: महासत्तांनी न्या. भंडारी यांच्या विजयरथाची घोडदाैड पाहून धसका घेतला. कदाचित भविष्यात आपणासमोर नवी आव्हाने उभी राहू शकतील, अशी भीती त्यांना वाटते आहे.

# अभिजात मराठी!

> अभिजात भाषेचा दर्जा मिळवणे हा संबंधित राज्याच्या भाषिक अस्मितेचा मुद्दा बनला आहे. हा किताब मिळवणे जणू राजकीय सोय ठरते आहे. १५ वर्षांत तेलुगू, कन्नड, मल्याळम यादेखील अभिजात ठरल्या. हा दर्जा मिळवण्यासाठी मराठीदेखील पाच वर्षांपासून रांगेत उभी आहे.

एखाद्या भाषेला अभिजात ठरवण्याचा अधिकार घटनेने किंवा कायद्याने केंद्र सरकारला नाही. भारतातच नव्हे, तर जगात कुठेही एखादी भाषा अभिजात ठरवण्याचे निकष नाहीत. समाजच तो ठरवत असतो. जगाची व्यवहाराची भाषा ठरलेल्या इंग्रजीसह फ्रेंच, जर्मन भाषेनेदेखील अभिजात भाषेच्या दर्जासाठी आग्रह धरला नाही. मग भारतातच ही मागणी कुठून आली? साधारण १५ वर्षांपूर्वी २००४ मध्ये 'संपुआ' सरकारला पाठिंबा देताना द्रमुकच्या करुणानिधींनी काही अटी घातल्या. त्यात तामिळीला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा समावेश होता. अर्थातच तामिळी ही संस्कृत भाषा कुळापासून भिन्न आणि प्राचीन असल्याचा दावा त्यांनी केला. भाषिक अस्मितेच्या राजकारणामुळे २००४ मध्ये 'संपुआ' सरकारने तामिळीला अभिजात भाषा ठरवले. उल्लेखनीय म्हणजे जगभरात अभिजात म्हणून मान्यता पावलेल्या संस्कृतला भारतातच तोपर्यंत अभिजात दर्जा नव्हता. त्यानंतर २००५ मध्ये संस्कृतला हा दर्जा देण्यात आला. त्यापाठोपाठ भाषिक संपन्नतेऐवजी राजकीय कारणामुळे उडिया भाषेला हा दर्जा मिळाला. बंगाली, पंजाबीदेखील आता या रांगेत आहेत. तात्पर्य, अभिजात

भाषेचा दर्जा मिळवणे हा संबंधित राज्याच्या भाषिक अस्मितेचा मुद्दा बनला असून हा किताब मिळवणे जणू राजकीय सोय बनली आहे. १५ वर्षांत तेलुगू, कन्नड, मल्याळम यादेखील अभिजात ठरल्या. हा दर्जा मिळवण्यासाठी मराठीदेखील पाच वर्षांपासून रांगेत उभी आहे. सांस्कृतिक आणि शिक्षणमंत्री विनोद तावडे यांनी मंत्रिपद स्वीकारताच मराठीला अभिजात दर्जा मिळणारच, असे आश्वासक वातावरण निर्माण केले. मात्र न्यायालयात भाषिक पुराव्यांची पूर्तता करूनही 'अभिजात दर्जा' मराठीला हुलकावणी देत आहे. राजकीय दबावामुळे जर देशातील सर्वच भाषांना अभिजात ठरवावे लागले तर काय, हा खरा प्रश्न आहे.

योगायोग म्हणजे 'मसाप'ने दिल्लीत धरणे आंदोलन करण्याचा इशारा देताच देशी भाषांना प्राधान्य देण्याचे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. अर्थातच स्वातंत्र्योत्तर काळात इंग्रजीच्या प्रेमापोटी सर्वच सरकारांनी देशी, लोकभाषा, मातृभाषेकडे बहुतेक राज्य सरकारांनी दुर्लक्ष केले ही वस्तुस्थिती आहे. एकीकडे शिक्षण पद्धती, तंत्रज्ञान, ज्ञान-विज्ञान, माहिती-प्रसारण अशा विविध क्षेत्रांत आमूलाग्र बदल होत असताना देशी भाषा पिछाडीवर राहत आहेत. या भाषांमध्ये पुस्तके, ग्रंथ प्रकाशित होऊ लागतील तसे त्या आधुनिक शिक्षणाचे माध्यम ठरतील. वस्तुत: मातृभाषेतून शिक्षण दिल्यास विद्यार्थी अधिक गतीने अध्ययन करू शकतात, बहुधा हाच आशय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अधोरेखित केला असावा. विज्ञानविषयक आवड तरुण पिढीत रुजवण्यासाठी देशी भाषांचा आग्रह धरा, भाषा ही अडसर न ठरता विज्ञानाला साहाय्यभूत ठरावी, असेही ते म्हणाले. वस्तुस्थिती अशी आहे की, मातृभाषा असो की बोलीभाषा - जगभरातून त्या कमी होत चालल्या आहेत. साधारणपणे ५० वर्षांत भारतात बोलल्या जात असलेल्या २२० पेक्षाही अधिक बोलीभाषा आता अस्तित्वात नाहीत. बडोद्यातील

भाषा संशोधन केंद्राने केलेल्या पाहणीतून ही बाब निदर्शनास आली आहे. एक देश, एक भाषा ही संकल्पना ऐकायला बरी वाटते. मात्र भारतासारख्या खंडप्राय देशात ११०० पेक्षा अधिक भाषा बोलल्या जातात हे विसरून कसे चालेल? म्हणूनच त्रिभाषा सूत्राचा आग्रह धरला जातो. पंतप्रधान मोदींचे विधान भलेही विज्ञानापुरते मर्यादित असले तरी देशी भाषांविषयीचा सकारात्मक दृष्टिकोन त्यातून दिसतो हेही नसे थोडके. हा दृष्टिकोन प्रत्यक्ष कृतीत उतरला तर मायमराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्याची शक्यता निश्चितच दुणावते. ‘मसाप’ने मराठीला अभिजात दर्जा मिळावा यासाठी पंतप्रधान मोदी यांच्याकडे सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला काही प्रमाणात यश मिळाले. या अनुषंगाने कृतिशील कार्यवाही करण्याचे विचाराधीन असल्याचे पत्र पंतप्रधान कार्यालयाने ‘मसाप’चे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांना पाठवले. मात्र, कृतिशील कार्यवाही म्हणजे नेमके काय करणार, हे सांगितलेले नाही. त्यामुळे पंतप्रधान कार्यालय मराठीला अभिजात दर्जा मिळावा यासाठी खरोखरच गंभीर आहे का, असा प्रश्न निर्माण झाला आहे. गेल्या वर्षभरामध्ये मराठीला अभिजात दर्जा मिळावा यासाठी अनेक सांस्कृतिक संघटनांनी मसापच्या उपक्रमांना सहकार्य केले. सातारा, पुण्यातील राजकीय नेत्यांनीही या मोहिमेला पाठिंबा दिला. त्यामुळे अभिजात दर्जाचा मुद्दा ऐरणीवर आला. ‘मसाप’ला प्राप्त झालेल्या पत्रामुळे मराठी भाषिकांच्या अपेक्षा उंचावल्या आहेत. येत्या मराठी भाषा दिनापूर्वी मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# ‘असोशी’ आणि ‘नकुशी’

> मुलगाच होईल या अपेक्षेने घेतलेल्या संधीच्या वेळी झालेल्या मुली ‘नकुशा’ वर्गात मोडतात. त्यामुळे अलीकडच्या काळात मुलींचा जन्मदर वाढल्याचे दिसत असले तरी त्यापैकी बहुतेक ‘नकुशा’ गटातील आहेत.

‘नकुशा’ मुलींची सैद्धांतिक गणना प्रथमच २०१७-१८ च्या आर्थिक पाहणी अहवालाच्या निमित्ताने करण्यात आली. कुटुंबात एक तरी मुलगा असावा या मानसिकतेपोटी गेल्या १२-१५ वर्षांत किमान २ कोटी १० लाख नकुशा मुली जन्माला आल्या, अशी शक्यता या अहवालात वर्तवण्यात आली. मुलगाच होईल या अपेक्षेने घेतलेल्या संधीच्या वेळी झालेल्या मुली ‘नकुशा’ वर्गात मोडतात. त्यामुळे अलीकडच्या काळात मुलींचा जन्मदर वाढल्याचे दिसत असले तरी त्यापैकी बहुतेक ‘नकुशा’ गटातील आहेत. अमर्त्य सेन तसेच अन्य अर्थतज्ज्ञांनी मुलगा आणि मुलगी यांच्यातील व्यस्त गुणोत्तराचा अभ्यास केला. मात्र ज्या स्त्रिया हयात असायला हव्या होत्या, त्या नसल्याचेच निदर्शनास आले. अशा गायब स्त्रियांची संख्या त्यांनी चार कोटी असण्याची शक्यता वर्तवली होती. त्यानंतर ३० वर्षांत मुलींचे गुणोत्तर सुधारले. मात्र त्यात ‘हवीशी’ आणि ‘नकोशी’ अशी वर्गवारी या पाहणी अहवालाच्या निमित्ताने प्रथमच करण्यात आली. त्यातून मुलाच्या हव्यासापोटी २ कोटींवर ‘नकुशा’ जन्मास आल्याचे निदर्शनास आले. एकंदरीत मुलगा जन्माला येत नाही तोपर्यंत पालक बाळंतपणाच्या संधी साधत राहतात, असेच हा अहवाल सांगतो.

स्त्री भ्रूणहत्येच्या विरोधात आणि ‘बेटी बचाओ, बेटी पढाओ’ तसेच ‘सेव्ह गर्ल चाइल्ड’ अशा विविध मोहिमा राबवण्यात आलेल्या या देशात नको असताना जन्माला आलेल्या मुलींची संख्या दोन कोटी १० लाख इतकी प्रचंड असल्याचे दिसून आले. यासंदर्भात नाॅर्थवेस्टर्न विद्यापीठाच्या सीमा जयचंद्रन यांनी सखोल तपशिलात जाऊन अभ्यास केला आहे. सुब्रमणियन यांच्या अहवालात तर या बाबीचा थेट संबंध मुलींवर जन्मापासून होणाऱ्या अत्याचाराशी कसा आहे, हे दाखवून दिले.

सर्वसाधारणपणे समाजात अपत्य जन्मात मुलीपेक्षा मुलास अधिक पसंती दिली जाते. भारतीयांचा हा सोस इंडोनेशियातील अशाच दुराग्रहाशी साधर्म्य साधणारा आहे, हे इथे उल्लेखनीय ठरावे. विशेष म्हणजे हा अहवाल तयार करताना कुटुंबातील शेवटच्या अपत्याचे लैंगिक गुणोत्तर हे सूत्र वापरण्यात आले. त्यामुळे आपण कोठे आहोत आणि कोणत्या राज्यात पुरुषी दुराग्रह अधिक आहे हे ठळकपणे समोर आले. मेघालय, केरळमधील दांपत्याचा जीव मुलगा झाला नाही म्हणून कासावीस होत नाही, त्यामुळेच मुलांच्या जन्माचे गुणोत्तराचे प्रमाण आदर्शवत ठरले. मात्र पंजाब, हरियाणात मुलाचा अट्टहास काही संपत नाही. या राज्यांतील बहुसंख्य महिलांची सरासरी चार बाळंतपणे सर्रास होतात. वस्तुत: मेघालय, केरळपेक्षाही सधन असलेल्या या राज्यांमध्ये मुलांचा हव्यास काही थांबत नाही याचा अन्वयार्थ असा की, संपत्तीसोबत शहाणपण येतेच असे नाही! भारताने १९७० पासून लोकसंख्येतील लैंगिक गुणोत्तराचे संतुलन राखण्यात १७ पैकी १० निकषांवर समाधानकारक प्रगती केली असली तरी मुलींपेक्षा मुलांचा काहीसा जास्त असलेला जन्मदर ही चिंतेची बाब ठरते. १९९४ मध्ये गर्भलिंग चिकित्सा प्रतिबंधक कायदा करण्यात आला, तेव्हापासून स्त्री भ्रूणहत्यांचे प्रमाण कमी झाले

असले तरी समाजात मुलगा हवाच ही मानसिकता कायम आहे, हे तितकेच खरे. 'असोशी'तून जन्मास आलेल्या 'नकुशी' प्रमाणेच संपत्ती निर्मिती, तसेच निर्यातप्रधानता आणि जीवनशैली याविषयीची निरीक्षणेदेखील या आर्थिक पाहणी अहवालातील वेगळी वैशिष्ट्ये ठरतात. ज्या राज्यातून जास्तीत जास्त निर्यातक्षम उत्पादने तयार होतात तेथील जनतेचे जीवनमान अन्य राज्यांच्या तुलनेने उत्तम असते. विशेषत: महाराष्ट्रासह हरियाणा, कर्नाटक, तामिळनाडू, गुजरात या राज्यांतील व्यापार-उदीम जोमात असल्यामुळे अर्थव्यवस्था सक्षम आहेत. अर्थातच या राज्यांतून होणारी निर्यात ही देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय अशी आहे. ज्यांची निर्यात तगडी, त्या राज्यांची आयातदेखील तितकीच लक्षणीय आहे. म्हणूनच निर्यातक्षम राज्यातील जनतेला चांगल्या सुविधा मिळतात. याशिवाय अन्य राज्यांच्या तुलनेत स्पर्धात्मक पातळीवर ती आघाडीवर असतात. साहजिकच नागरिकांना त्याचा फायदा होतो, असेही या अहवालाने ठळकपणे अधोरेखित केले आहे.

# ‘सीए’वर नियंत्रण का हवे?

> निगराणी यंत्रणेची कमतरता हे घा◌ेटाळ्यांमागचे खरे कारण नव्हे. विद्यमान यंत्रणांची परिणामकारकता ही त्यांच्या स्वायत्ततेशी निगडित आहे, जी कागदा◌ेपत्री आह्रे. मळात

विजय मल्ल्या, नीरव मोदी, मेहुल चोकसी यांसारख्या उद्योगपतींनी बँकांना कोट्यवधींचा चुना लावून पोबारा केला, आणि आता केंद्र सरकारला जाग आली. १०० कोटी रुपयांहून अधिक कर्ज बुडवणाऱ्यांची मालमत्ता जप्त करण्याविषयी कायदा करण्यास केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. सहेतुक कर्ज बुडवे, बनावट किंवा चुकीच्या इलेक्ट्रा◌ॅनिक रेकॉर्डच्या माध्यमातून फसवणूक करणारे, करबुडवे अशांची मालमत्ता या कायद्यान्वये जप्त केली जाणार आहे. तथापि, लेखापालांना शिस्त लावण्यासोबतच त्यांच्या नियमनासाठी ‘नॅशनल फायनान्शिअल रिपोर्टिंग ऑथॉरिटी’ स्थापन करण्याचा विचार झाला. ‘इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊन्टंट्स ऑफ इंडिया’च्या कार्यकक्षेत बँकांवरील नियमनाविषयी जे कामकाज येते, ते या ऑथॉरिटीकडे सोपवण्यावर प्रामुख्याने चर्चा झाली. दरम्यान, बँकांना ५० कोटी रुपयांपेक्षा अधिक ‘एनपीए’ची तपासणी करण्याचे आदेश दिले. याशिवाय २५० कोटी रुपये किंवा त्यापेक्षा अधिक रकमेच्या कर्जावर काटेकोर लक्ष ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत. घोटाळा मग तो ‘पीएनबी’चा असो, एन्रा◌ॅनचा, सत्यम, हर्षद मेहता, नीरव मोदी, संजय अगरवाल किंवा आणखी कोणताही असो. बहुतेक

घोटाळे होतात ते लेखापालन यंत्रणेच्या दुर्लक्षामुळेच. जगातील प्रस्थापित आणि बलाढ्य अशा ‘ऑर्थर ॲण्डरसन’सारख्या लेखापाल कंपनीला गाशा गुंडाळावा लागला. त्यापाठोपाठ जागतिक पातळीवरील अनेक लेखापाल कंपन्या वादग्रस्त ठरल्या. ज्याची हिशेब तपासणी करायची त्याच्याशी हातमिळवणी केली की, यापेक्षा वेगळे ते काय होणार? तटस्थ लेखापालास जे प्रश्न पडावयास हवेत ते पडले नाहीत, किंवा ज्या ताळेबंदाच्या आधारे संशयास्पद बाबींची विचारणा करायला हवी ती केली नाही की घोटाळा होतो. ही बाब हेरूनच ‘वही को सही करनेवालों को ‘सही’ करना है’ असे सूतोवाच पंतप्रधान मोदींनी सीएंचे उद्‌बोधन करताना केले होते. लेखापालांचे भ्रष्टाचार करणाऱ्यांशी साटेलोटे असणे ही बाब नवी नाही. अशा हितसंबंधामुळेच ‘पीएनबी’ घोटाळा बिनबोभाट सुरू राहिला. बँकेच्या अधिकाऱ्यांनी साथ दिली असती तर आणखी काही वर्ष तो सुरू राहिला असता, हे तितकेच खरे. या पार्श्वभूमीवर लेखापालांवरील नियंत्रणासाठी काही ठोस भूमिका घेणे केंद्र सरकारला आवश्यक वाटले असावे.

‘नॅशनल फायनान्शियल रिपोर्टिंग ॲथॉरिटी’ ही यंत्रणा सर्व सनदी लेखापालांवरील नियंत्रणाकरिता अस्तित्वात आणण्यासाठी केंद्र सरकारने हालचाली सुरू केल्या आहेत. सध्या ही जबाबदारी सनदी लेखापालांची राष्ट्रीय संस्था ‘इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंट्स ऑफ इंडिया’कडे आहे. ही संस्था सरकारमान्य तर आहेच, त्यावर केंद्र सरकारतर्फे आठ संचालक नियुक्त केले जातात. या संस्थेतर्फे नियमन, शोधन आदी कामांसाठी ज्या समित्या नेमल्या जातात त्यावरही केंद्र सरकारचे प्रतिनिधी असतात. सनदी लेखापालांच्या शिस्तभंगाच्या अथवा गैरव्यवहारांच्या चौकशीसाठी नेमण्यात येणाऱ्या समितीचे प्रमुख हे निवृत्त न्यायाधीश असतात. या न्यायाधीशाची नियुक्ती ही केंद्र सरकारकडून केली जाते.

याचा अर्थ असा की, या संस्थेवर सरकारचे पूर्ण नियंत्रण असते; ती चालवणारे व्यावसायिक हे सरकारचे नियंत्रित असतात. तथापि, या सनदी लेखापालांच्या नियमनासाठी आणखी एका यंत्रणेची गरज सरकारला वाटते, यात बरेच काही आले. युरोप, अमेरिकेत लेखापालनाची परीक्षा घेणारी तसेच त्यांचे नियमन तथा नियंत्रण करणारी यंत्रणा पूर्णत: स्वतंत्र असते. त्यामुळे भारतातही या धर्तीवर यंत्रणा विकसित करण्याचे प्रयत्न काही वर्षापासून सुरू आहेत. अर्थमंत्री अरुण जेटली यांनी बँक घोटाळयांसाठी सर्व नियामकांना जबाबदार ठरवल्यामुळे त्यांच्या गुणात्मक वृद्धीसाठी ठोस कार्यवाही करण्याची गरज निर्माण झाली. मात्र या सुधारणावादाला लेखापालांच्या संघटना, आयसीएआय कडाडून विरोध करीत आहेत. कारण, विद्यमान व्यवस्था सरकारी नियंत्रणाखाली असताना आणखी एक संस्था स्थापन करून काय साधायचे आहे? असा त्यांचा सवाल आहे. केंद्र सरकार त्याचे उत्तर देत नाही. एकूणच अशा परिस्थितीत नव्या यंत्रणेची उपयुक्तता तसेच परिणामकारकता याविषयी अनेक प्रश्न निर्माण होतात. सरकारी आस्थापनांच्या कारभारावर विविध यंत्रणा लक्ष ठेवून असतात. महालेखापाल, केंद्रीय दक्षता आयोग, सक्तवसुली संचालनालय, आयकर पासून ते केंद्रीय गुप्तचर यंत्रणेपर्यंत अनेक यंत्रणा बँका, सरकारी विमा कंपन्या आदींवर लक्ष ठेवून असतात. याशिवाय बँकांचे खासगी लेखापाल देखील असतात. याचा अर्थ निगराणी यंत्रणेची कमतरता हे घोटाळयांमागचे खरे कारण नव्हे. विद्यमान यंत्रणांची परिणामकारकता ही त्यांच्या स्वायत्ततेशी निगडित आहे, जी कागदोपत्री आहे. मुळात या यंत्रणामधील राजकीय हस्तक्षेप थांबवला पाहिजे; आणि विद्यमान संस्थांनाच संसदेस उत्तरदायी केले तरी भ्रष्टाचारास आळा घालण्यास ते परिणामकारक ठरू शकेल, हे निश्चित!

# पाऊसमानाचा पॅटर्न

येत्या मान्सूनविषयी आश्वासक अंदाज ‘आयएमडी’ने वर्तवला आणि दीर्घकालीन सरासरीच्या ९५ टक्के पाऊसमान राहील असे संकेत दिले. थाेडक्यात सांगायचे तर हा मान्सून समाधानकारक स्वरूपाचा राहील असे अभिप्रेत आहे. खरेच देशभर समाधानकारक पाऊस होईल का, या प्रश्नाचे उत्तर निश्चितच ‘नाही’ असेच मिळेल.

‘मान्सून’ हा तसा जिव्हाळ्याचा विषय, मात्र सध्याच्या माहितीच्या युगात त्याच्या भाकितांवर बरीच उलटसुलट चर्चा रंगत असते. येत्या मान्सूनविषयी आश्वासक अंदाज ‘आयएमडी’ने वर्तवला आणि दीर्घकालीन सरासरीच्या ९५ टक्के पाऊसमान राहील असे संकेत दिले. थोडक्यात सांगायचे तर हा मान्सून समाधानकारक स्वरूपाचा राहील असे अभिप्रेत आहे. खरेच देशभर समाधानकारक पाऊस होईल का, या प्रश्नाचे उत्तर निश्चितच ‘नाही’ असेच मिळेल. यासंदर्भात मुंबईतील ‘आयआयटी’ने ११२ वर्षांच्या नोंदींचा अभ्यास केला आणि पावसाचा पॅटर्न बदलल्याचे सिद्ध केले. देशातील ६४० पैकी २३८ जिल्ह्यांत ही स्थिती निदर्शनास आली आहे. म्हणजेच पावसाचा पॅटर्न बदलल्याने सरासरी लाभदेखील कमी होणार हे निश्चित. हवामान खाते असो किंवा स्कायमेट, भेंडवळ या सगळ्यांचे काही आडाखे असतात, एक मॉडेल किंबहुना प्रतिमान ते समोर ठेवतात. अर्थातच त्यात काही प्रमाणात बदल गृहीत असतातच.

त्यामुळे अधिक तपशिलात जाऊन पावसाची व्याप्ती किंवा प्रमाण याविषयी कोणीही ठोस काही सांगू शकत नाही. सध्या वाढत असलेल्या उन्हाच्या झळांच्या पार्श्वभूमीवर आलेली ही हळुवार झुळूक म्हणता येईल इतकेच. वस्तुत: ढोबळमानाने विचार करता हवामान खात्याचा अंदाज साधारणपणे पाच वर्षांतून एकदा सरासरीच्या जवळपास पोहोचताना दिसतो. उदाहरणच घ्यायचे तर २००८ मध्ये मान्सूनविषयी वर्तवलेला अंदाज बरोबर ठरला होता. त्यानंतर गेल्या वर्षी तो नेमका खरा ठरला. गेल्या २० वर्षांत पावसाचा पॅटर्न बराच बदललेला आहे. साधारणपणे ५० वर्षांतील आकडेवारी तपासून पाहिली तर सलग दोन वर्षांपेक्षा अधिक काळ असमाधानकारक पाऊस जसा दिसत नाही तसेच सलग तीन वर्षे चांगला पाऊस झाल्याचेही दिसून येते. येत्या १५ मेच्या आसपास ‘आयएमडी’, ‘स्कायमेट’चा अंदाज मांडला जाणार आहे. त्यातून अनेक बाबी स्पष्ट होतील.

मान्सून वेळेवर आला आणि समाधानकारक बरसला तर खरिपाला त्याचा फायदा होऊ शकतो. कारण या वर्षी महाराष्ट्रासह देशभरातील बहुतेक ठिकाणच्या साठ्यातील पाणी आटलेले दिसते. मार्चपासूनच उन्हाच्या झळा सुरू झाल्या आणि आता तर तापमानाचा पारा अधिकाधिक वाढत चालला आहे. गेल्या वर्षी साऱ्या देशाला समाधानकारक पावसाची अपेक्षा असताना तो ६४० जिल्ह्यांचे समाधान करू शकला. उर्वरित ३८% भारताला दुष्काळाचे चटके सोसावे लागले. ऑक्टोबर २०१७ पासूनच देशातील ४०४ जिल्ह्यांत पाणीटंचाई उग्र होत असताना पाहायला मिळाली. एकंदर पर्जन्यमानाचे स्वरूप असे असताना केंद्रीय कृषी सचिव एस. के. पटनायक यांनी या वर्षी अन्नधान्याचे विक्रमी उत्पादन होणार असल्याचे धाडसी विधान केले. चांगला पाऊस आणि विक्रमी उत्पादन म्हणजे शेतकरी सुखावतो असे नव्हे. कारण गेली दोन वर्षे शेतकरी वर्ग अनेकविध कारणांनी त्रासलेला दिसतो आहे. त्यापैकी महत्त्वाचे म्हणजे शेतमालाचे उत्पादन वाढले, मात्र बाजारपेठेत किमतीत घसरण सुरू राहिली. परिणामी शेतकऱ्याला किमान वाजवी मोबदला मिळू शकला नाही. दुसरे म्हणजे साठवणुकीसाठी सुस्थितीतील गोदामांची

सुविधा नाही. २०१५, २०१६ मध्ये फारसा पाऊस झाला नव्हता, परंतु २०१७ च्या पाठोपाठ आता २०१८ मध्ये समाधानकारक पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. आता यापुढे जाऊन त्याचा फायदा २०१९ च्या निवडणुकीत होईल, असेही भाकीत राजकीय हवामानतज्ज्ञांकडून वर्तवले गेले तर आश्चर्य वाटायला नको.

महाराष्ट्राचा विचार करता राज्यातील ८२ टक्के शेती लहरी पावसावर अवलंबून आहे. राज्यातील धरणांची पाणी साठवण क्षमता ६० हजार दशलक्ष घनमीटर इतकी असली तरी १० लाख हेक्टर जमिनीवर ऊस पिकवला जातो. त्यामुळे अन्य पिकांना जीवदान देण्यापुरतेदेखील सिंचन करायला पाणी उपलब्ध होत नाही ही वस्तुस्थिती आहे. मुख्यमंत्री फडणवीसांनी राज्याच्या सिंचन क्षेत्रात फारसा बदल न करता ‘जलयुक्त शिवार’ आणि मागेल त्या शेतकऱ्याला शेततळे देण्याची भूमिका स्वीकारली. त्यामुळे ओढे, नद्यांचे रुंदीकरण आणि खोलीकरण सुरू झाले असले तरी हा उपाय दीर्घकाळ टिकणारा नाही. उसाच्या लागवडीखालील शेतजमीन कमी करणे, अन्य पिकांनाही सिंचनाचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे यास पर्याय नाही हे तितकेच खरे!

# विषारी वायूचा विळखा!

> अर्थकारणाचा वाढता प्रभाव, सातत्याने होत असलेले आ ैद्या ेगिकीकरण आणि वाहनांची वर्दळ नियंत्रणात ठेवता आली तर एकूणच जल-वायू परिवर्तनामुळे होत असलेल्या बदलांच्या परिणामांना आवर घालता येऊ शकेल. जगभरामध्ये सध्या प्रदूषण, पर्यावरण या दा ेन्ही बाबी चिंतेच्या बनल्या आहेत, म्हणूनच निसर्ग आणि मानव यांच्यात संतुलन राखले गेले तरच विषारी वायूचा विळखा हळूहळू सैल होण्यास मदत होईल हे निश्चित!

भारत आणि चीनमध्ये आता वायूप्रदूषणाची जणू स्पर्धा लागली आहे. अमेरिकेतील 'हेल्थ इफेक्ट्स इन्स्टिट्यूट'ने जगभरातील वायुप्रदूषणाचा अभ्यास केला, त्यातून ही बाब निदर्शनास आली. या विषारी वायूचा विळखा इतका घट्ट आवळला जातोय की दरवर्षी १० लाख भारतीय त्याचे बळी ठरत आहेत; त्यापैकी एकट्या दिल्लीत दरवर्षी ३००० लोक मृत्युमुखी पडतात. गेल्या वर्षी जागतिक आरोग्य संघटनेने जाहीर केलेल्या संख्येपेक्षा ती अधिक आहे. भारताच्या गतिमान अर्थकारणाला बळ देणारे औष्णिक विद्युत केंद्र, औद्योगिकीकरण, बांधकाम क्षेत्र, वाढती वाहन संख्या या बाबी त्यास प्रामुख्याने कारणीभूत आहेत. वाहनांच्या पाठोपाठ वायुप्रदूषणास बांधकाम क्षेत्र कारणीभूत ठरते आहे, कारण जिथे म्हणून सिमेंट आहे, तिथे अॅसिनो बॅक्टर नावाचा बॅक्टेरिया

वाढतो. त्यापासून श्वसनाचे आजार, फुप्फुसाचा कर्करोग अशा व्याधी बळावतात. अर्थातच धूळ आणि प्रदूषणाचा फटका केवळ भारतालाच नव्हे तर पाकिस्तानसह दक्षिण आशियायी देश, इंग्लंड, फ्रान्स, जपान, ब्राझील, बांगलादेश, युरोपियन युनियनप्रमाणेच चीनलादेखील मोठ्या प्रमाणावर बसला आहे. २०१० पासून भारत आणि बांगलादेशात वायुप्रदूषण सातत्याने वाढत असल्याचे दिसून आले. वायुप्रदूषणामुळे २०१५ मध्ये भारतात १०,९०,४०० तर चीनमध्ये ११,०८,१०० लोक मृत्युमुखी पडले आहेत. तात्पर्य, वायुप्रदूषण हा थेट आरोग्यावर परिणाम करणारा घटक असल्याने त्याचा विळखा अधिकाधिक सैल होण्याच्या दृष्टीने जगभरात रिअल टाइम मॉनिटरिंग होणे अत्यंत गरजेचे ठरते. अगदी आपल्या शेजारच्या नाशिक, पुणे, चंद्रपूर, डोंबिवलीत याविषयी अभ्यास झाला, त्यानंतर दोन कोटी झाडे लावण्याची घोषणा झाली खरी, पण ती झाडे आहेत कुठे?

महाराष्ट्राचा विचार करता औरंगाबाद, नाशिक, नागपूर, चंद्रपूर, मुंबई, पुणे, ठाणे, नवी मुंबई, सोलापूर या ९ जिल्ह्यांमध्ये २४ तास हवेतील प्रदूषित घटक मोजले जातात. धुळीच्या प्रदूषणात देशभरात जी शहरे अग्रेसर आहेत त्यात सोलापूरचा समावेश होतो. भुरेलाल समितीने या प्रश्नावर नेमके बोट ठेवले, उपाय सुचवले; मात्र प्रदूषण काही थांबले नाही. कोल्हापुरात तर सर्वत्र सहकाराचा धूर. तब्बल २० साखर कारखाने, ५० कापड प्रक्रिया केंद्र, धाग्याला चिवटपणा आणणारे २०० कारखाने, फाउंड्री आणि वीटभट्ट्यांचा विळखा आहेच. मुळात आपल्याकडेच म्हणून नव्हे तर जगभरात दीर्घकालीन उपायांवर भरीव काम आणि प्रदूषण नियंत्रणविषयक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई या दोन्ही गोष्टी गांभीर्याने घेतल्या जात नाहीत. एक मात्र खरे की, गेल्या वर्षी बीजिंगमधील

नागरिकांवर ऑक्सिजनचे सिलिंडर विकत घेण्याचा बाका प्रसंग ओढवला, त्यानंतर उपाययोजना प्रामाणिकपणे राबवल्या जात आहेत. सेंट्रल लंडनमध्ये स्वत:च्या वाहनातून जायचे असेल तर १००० रुपये दंड भरावा लागतो. त्यामुळे आपोआपच वाहन संख्या कमी झाली, परंतु खासगी वाहनांना अशी कठोर मनाई करतानाच सार्वजनिक वाहतूक व्यवस्था तितकीच सक्षम करण्यात आली. पॅरिसमध्ये तर प्रदूषण नियंत्रणासाठी सार्वजनिक वाहनांतून मोफत प्रवासाची सोय सर्वांनाच उपलब्ध करून देण्यात आली, हे उल्लेखनीय. तात्पर्य, कडक नियम अमलात आणतानाच पूरक यंत्रणा, व्यवस्था असेल तर प्रभावी नियमन होऊ शकते याचे ते उदाहरण ठरावे. भारतीयांची पिढी आजारी पाडणारे किंवा जन्मापासूनच तिला दिव्यांग बनवणारे 'अच्छे दिन' काय उपयोगाचे आहेत? एकीकडे दिल्ली आणि पंजाब धूळ, दूषित वातावरणाने त्रस्त असताना पाकिस्तान्यांनी भारतावर आगपाखड सुरू केली आहे. बांधकामामुळे उठणारी धूळ, औद्योगिक आणि शेतातील टाकाऊ घटकांना जाळल्यामुळे होणारा धूर यामुळे आरोग्यविषयक आणीबाणीसदृश्य स्थिती निर्माण झाल्याचा कांगावा पाकव्याप्त पंजाबमधून केला जात आहे. मुळात यासंदर्भात केवळ भारतावर दुगाण्या झाडण्यापेक्षाही पाकिस्तान तसेच दक्षिण आशियायी देशांनी एकत्र बसून प्रदूषण नियंत्रणासाठी ठोस, रचनात्मक कार्य केले तरच काही साध्य होऊ शकेल. अर्थकारणाचा वाढता प्रभाव, सातत्याने होत असलेले औद्योगिकीकरण आणि वाहनांची वर्दळ नियंत्रणात ठेवता आली तर एकूणच जल-वायू परिवर्तनामुळे होत असलेल्या बदलांच्या परिणामांना आवर घालता येऊ शकेल. जगभरामध्ये सध्या प्रदूषण, पर्यावरण या दोन्ही बाबी चिंतेच्या बनल्या आहेत, म्हणूनच निसर्ग आणि मानव यांच्यात संतुलन राखले गेले तरच विषारी वायूचा विळखा हळूहळू सैल होण्यास मदत होईल हे निश्चित!

# महासत्तेच्या पाऊलखुणा..

> चीनचा सध्या जेवढा दबदबा आहे ती उंची भारत २०३० पर्यंत गाठेल. चीनचा सध्याचा विकास दर ८ ते १० टक्के असला तरी २०३० पर्यंत त्यात सातत्य राहणार नाही, भलेही चीन आघाडीवर राहिला तरी भारताची विलक्षण गतीने भरभराट होईल आणि दाेन्ही देशांतील आर्थिक दरी कमी होईल. भारताला २०५० पर्यंत काम करणाऱ्या हातांची काळजी असणार नाही.

२०१७ ला निरोप देत असतानाच दोन सुखद बातम्यांनी भारतीय अर्थकारणाचा चेहरा खुलला. शेअर बाजारातील निर्देशांकाने (सेन्सेक्स) पहिल्यांदाच अशी काही उसळी घेतली की, तो ३४ हजारांवर पोहोचला. गेल्या पाच वर्षांचा विचार करता २०१७ हे गुंतवणूकदारांसाठी दुसरे सर्वोत्तम शुभदायक वर्ष ठरले. यापूर्वी २०१४ मध्ये निर्देशांकाने २९. ४ टक्के वाढ नोंदविली होती. देशांतर्गत वित्तीय संस्थांनी जेवढे शेअर्स विकले त्यापेक्षा ५४४ कोटींचे शेअर्स खरेदी केले. शिवाय ४४ कोटींची विक्री विदेशी गुंतवणूकदारांनीदेखील केली. त्याच वेळी 'सीईबीआर'चा अहवाल आला. साहजिकच अत्यानंदाने निर्देशांकही उसळला. काही दशकांपासून आर्थिक महासत्ता बनण्याचे स्वप्न तमाम भारतीय पाहत आहेत. आता ते दिवस अगदी जवळ येऊन ठेपले असल्याचेच संकेत या अहवालाने दिले. नोटबंदी, जीएसटीचे निर्बंध यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास मंदावलेला दिसत आहे. तथापि, ब्रिटन आणि

फ्रान्सला पिछाडीवर टाकून भारत जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनेल असा विश्वास त्यात वर्तवण्यात आला आहे. येत्या काही वर्षांत वीज आणि तंत्रज्ञान हे स्वस्त दरात उपलब्ध होण्याची चिन्हे आहेत. परिणामी विशेषत: आशियाई देशांच्या अर्थव्यवस्था जागतिक बाजारपेठेत वर्चस्व गाजवू लागतील. त्यात भारतीय अर्थव्यवस्थेचे महत्त्व अधिक असेल. जगातील अग्रणी १० अर्थव्यवस्थांच्या यादीत २०१८ मध्ये आशियाई देशांचे प्रभुत्व असेल, असेही अहवालात म्हटले आहे. अर्थातच यामुळे विदेशी गुंतवणूकदारांची पावले भारताकडे वळू लागतील, अशी आशा आहे.

या पार्श्वभूमीवर आर्थिक महासत्ता बनण्यासाठी भारताला काय करावे लागेल हा मुद्दादेखील तितकाच महत्त्वाचा ठरतो. केवळ आर्थिक सुधारणा करून ते शक्य होणार नाही. बहुतांश यशस्वी देशांचा विचार करता प्रामुख्याने ज्या बाबी निदर्शनास येतात त्यापैकी कोणत्याही प्रकारच्या हिंसाचारावर नियंत्रण राखण्यात सरकार सक्षम असायला हवे. स्वखुशीने कर भरण्यात जनता तत्पर असावी. कुशल न्यायव्यवस्था आणि सेवा उपलब्ध असावी. जर या बाबींची पूर्तता होत असेल तर तो देश भांडवलशाही, समाजवादी, लोकशाहीवादी की हुकूमशाहीचा पुरस्कार करणारा आहे हे मुद्दे महत्त्वाचे ठरत नाहीत. या मुद्द्यावर काम करण्यास भारताला पुरेसा वाव आहे. याशिवाय समाज मजबूत आणि गतिशील असणेदेखील तितकेच महत्वाचे ठरते. म्हणूनच केवळ 'जीडीपी'चा दर वाढवल्याने सुधारणा दिसणार नाहीत तर 'बदल घडवण्यासाठी' सुधारणा व्हायला हव्यात. मूलत: समाज हा बाह्यरूपाने नव्हे तर आतमधून सांस्कृतिकदृष्ट्या बदलत असतो. जेव्हा हा बदल घडू लागतो तेव्हा प्रगतिशील समाजाची विचारप्रणाली आणि परोपकार करण्याची प्रवृत्ती अधिक सक्रिय होते. नेमका असा बदल घडवण्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी कितपत यशस्वी ठरतात हे तितकेच महत्त्वाचे आहे. खरे तर १९९१ मध्ये पी. व्ही. नरसिंह राव यांनी पंतप्रधानपदाची जबाबदारी स्वीकारली; त्या वेळी देश भीषण

आर्थिक संकटात होता. तरीही जागतिकीकरण, आर्थिक उदारीकरण आणि खासगीकरणाची वाट चोखाळत त्यांनी कालबद्ध कार्यक्रमाद्वारे भारताला त्या गर्तेतून बाहेर काढले. आज महासत्ता बनण्याचे स्वप्न जे भारत पाहतो आहे, ते त्यांच्याच द्रष्टेपणाचे फळ होय, असे म्हटले तर वावगे ठरू नये. नरसिंह राव यांचे नवे आर्थिक आणि मुक्त व्यापार धोरण लोककल्याणकारी, लोकशाहीसाठी उपयुक्त होतेच; शिवाय अनेक संकटांवर मात करण्याचा तो रामबाण उपायही होता. त्यास जगभरातून चांगला प्रतिसाद मिळाला. त्यामुळेच त्यांनी थेट परकीय गुंतवणूक आणि तांत्रिक सहकार्यासाठी ‘परकीय गुंतवणूक प्रोत्साहन मंडळ’ स्थापन केले. उल्लेखनीय म्हणजे उद्योग-उद्योगपती आणि जनतेच्या हिताला, स्वाभिमानाला धक्का लागणार नाही याचीही काळजी घेतली. आर्थिक उदारीकरण आणि मुक्त व्यापार धोरणाला २६ वर्षे पूर्ण झाली आहेत. पी. व्ही. नरसिंह राव यांनी लावलेल्या या रोपट्याचा वटवृक्ष होताना आता आपण पाहत आहोत. अमेरिकेच्या ‘नॅशनल इंटेलिजन्स कौन्सिल’च्या ‘ग्लोबल ट्रेंड्स २०३० - अल्टरनेटिव्ह वर्ल्ड्‍्स’ या अहवालातदेखील २०३० पर्यंत भारताला उगवती आर्थिक महासत्ता अशी ओळख मिळेल, असे भाकीत वर्तवले होते. चीनचा सध्या जेवढा दबदबा आहे ती उंची भारत २०३० पर्यंत गाठेल. चीनचा सध्याचा विकास दर ८ ते १० टक्के असला तरी २०३० पर्यंत त्यात सातत्य राहणार नाही, भलेही चीन आघाडीवर राहिला तरी भारताची विलक्षण गतीने भरभराट होईल आणि दोन्ही देशांतील आर्थिक दरी कमी होईल. भारताला २०५० पर्यंत काम करणाऱ्या हातांची काळजी असणार नाही. सध्या भारताची अर्थव्यवस्था पाकिस्तानच्या तुलनेत आठपट अधिक आहे, तर २०३० पर्यंत १६ पटींनी मोठी असेल. अर्थातच ही निरीक्षणे असली तरी भारतीय अर्थकारणाची एकंदर वाटचाल लक्षात घेता आर्थिक महासत्तेच्या वाटेवरील या पाऊलखुणा ठरतात हे निश्चित.

# मुले का हिंसक होतात?

> शाळा आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी नेमकी कोणाची? विद्यार्थी एवढे हिंसक का होत आहेत? यावर विचार करण्याची, तातडीने उपाय शाेधण्याची वेळ आली आहे. अशा घटना घडतात तेव्हा शालेय व्यवस्थापन समिती, शिक्षक, शासन यांच्याकडे बोटे दाखवली जातात

हरियाणातील गुरुग्रामच्या रेयान इंटरनॅशनल स्कूलमधील प्रद्युम्न ठाकूर या दुसऱ्या इयत्तेतील विद्यार्थ्याच्या हत्येने सारे जग सुन्न झाले होते. तामिळनाडूतील शाळेत घडलेले अग्नितांडव, पेशावरमध्ये तालिबान्यांनी शाळेवर केलेला हल्ला यावरही सर्वत्र चर्चा झडली. अगदी आपल्या अवतीभवती पाहता डोंबिवलीत क्रिकेटच्या वादातून १० वीतील सचिन तिवारीची हत्या, मणिपूरमधील मंत्र्यांचा मुलगा एन. अजाई मितेई याने इराॅन राॅजरवर गोळया झाडून केलेली हत्या, सटाण्यात रॅगिंगला कंटाळून प्रसाद लोखंडेने केलेली आत्महत्या, सेलूदचा शुभम बोराटे, रांचीतील विनय महतो, कॅलिफ़ोर्नियातील धरमप्रीत जस्सर यांच्या हत्येच्या आठवणी ताज्या असतानाच माळशिरस तालुक्यातील पिरळे येथे १० वीतील महेश कारंडेचा वर्गमित्रांनी शाळेतील संगणक कक्षात कोयत्याने खून केल्याची बातमी थडकली. शाळेत मुलींसोबत मैत्री करण्यावरून महेश कारंडेची त्याच्या दोन जिवलग मित्रांनी निर्घृण हत्या केल्याचे समोर आले आहे. एकंदरीत या साऱ्या घटना पाहता शाळा आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी नेमकी कोणाची?

विद्यार्थी एवढे हिंसक का होत आहेत? यावर विचार करण्याची, तातडीने उपाय शोधण्याची वेळ आली आहे. अशा घटना घडतात तेव्हा शालेय व्यवस्थापन समिती, शिक्षक, शासन यांच्याकडे बोटे दाखवली जातात, परिपत्रकांची फर्माने निघतात. सातत्याने अशा हिंसक घटना घडत असतानाही आदेशांची तात्पुरती मलमपट्टी होते. दीर्घकालीन ठोस उपाय काही होत नाहीत हे वास्तव आहे. त्यामुळे भविष्यात शाळा आणि विद्यार्थी सुरक्षित राहतील का? सामान्यपणे कोणतीही मोठी घटना घडण्यापूर्वी अनेक लहान-सहान प्रसंग घडलेले असतात, त्याकडे शाळेतील संबंधित दुर्लक्ष करतात, किंबहुना शाळा ते दडपून टाकते. शाळांमधील कारभार पारदर्शक होऊ शकला तर भविष्यात अशा अनेक घटनांवर अंकुश बसू शकतो.

मुलांना चांगले शिक्षण मिळावे म्हणून पालक जेवढा आटापिटा करतात तितका सुरक्षेच्या मुद्द्यावर करीत नाहीत हेदेखील या घटनांतून दिसून येते. शाळा, शिक्षक यांच्यावर विद्यार्थ्यांच्या सुरक्षेची, त्यांना घडवण्याची जबाबदारी आहे, तितकीच पालकांचीही नाही का? मात्र अशा लहान-मोठ्या हिंसक घटना घडल्या की, शाळा किंवा महाविद्यालयावर खापर फ़ोडून ते मोकळे होतात. म्हणूनच हा प्रश्न तडीस जात नाही. किती पालक आपल्या पाल्याच्या वर्तन आणि अभ्यासाविषयी जाणून घेण्याचा प्रयत्न करतात? पाल्याचा शालेय प्रवेश आणि ओपन हाऊस (परीक्षेच्या निकालाचा दिवस) वगळता किती पालकांचा मुख्याध्यापक, शिक्षकांशी संबंध येतो? नेमके हेच दुर्लक्ष विद्यार्थ्यांच्या बदलत्या प्रवृत्तीला कारणीभूत ठरत आहे. पाल्याच्या जडणघडणीला पूरक बाबींची पूर्तता पालकांकडून होत नाही, उलटपक्षी थोडे दुर्लक्ष कर असे सांगून पालक मूळ विषयाला बगल देतात. त्याऐवजी टवाळखोरांना धाडसाने तोंड देण्याची हिंमत पालकांनी दिली आणि शिक्षकांशी संवाद वाढवला तर मूळ प्रश्नाची सोडवणूक

होण्यास मदत होऊ शकते. नव्या शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थ्यांना शिक्षा करण्याचे स्वातंत्र्य राहिलेले नाही, हे खरे असले तरी संवेदनशीलपणे शिक्षक सर्व बाबींवर लक्ष ठेवू शकतात. काही शैक्षणिक संस्था स्वत:ची प्रतिष्ठा, अर्थ तसेच राजकारणापोटी बऱ्याच घटना दडपून टाकतात. त्याची परिणती अखेर अशा हिंसक घटनांमध्ये होते, हे कसे नाकारता येणार?

अलीकडच्या काळात सर्वांच्याच हाती मोबाइल आल्याने त्याचा सदुपयोग कमी, मात्र दुरुपयोग अधिक वाढला आहे. इंटरनेटमुळे मुले तासन् तास व्हा ॅट्सॲप, फेसबुक अशा तत्सम सोशल मीडियाला चिकटून बसतात. नको तो मजकूर, क्लिप त्यावर फ़ॉरवर्ड आणि ओपन होत राहतात. त्यातून निरागस मनावर सकारात्मक विचारांचा पगडा कमी आणि गंभीर, विकृतीचाच प्रभाव अधिक वाढत असल्याचे जाणवते. आपला पाल्य काय करतोय, याची शहानिशा पालकांनी करायला हवी, ती किती पालक सजगपणे करतात? मुलाच्या आग्रहाखातर मोबाइल दिला तरी त्याच्या वापराचा विचार नको का करायला? ‘छडी लागे छम छम.. . ’चे दिवस मागे पडले असले तरी शिक्षक पालकांना पाल्याच्या वर्तणुकीची कल्पना देऊ शकतात; आणि ते विद्यार्थी, संस्थेच्या हिताचेच ठरणारे आहे. शालेय विद्यार्थ्यांच्या समस्यांत होत असलेली वाढ विचारात घेता शाळेत एखादा समुपदेशक असणे गरजेचे ठरत आहे. मात्र काही अपवाद वगळता अशी व्यवस्था सार्वत्रिक आढळत नाही. शाळेतील समस्यांविषयी बोलण्यास विद्यार्थ्यांकडे सक्षम माध्यम नसते त्यामुळे त्याची सतत कुचंबणा होत राहते. ही घुसमटदेखील एखाद्या गंभीर प्रकरणापर्यंत जाऊन पोहचू शकते, म्हणूनच या साऱ्या मुद्द्यांवर शिक्षण संस्था, शिक्षक, पालक यांनी एकत्र येऊन विचार करण्याची वेळ आली आहे, हे निश्चित.

# ड्रॅगनची दादागिरी

> चिनी ड्रॅगनच्या दादागिरीचा खंबीरपणे मुकाबला करण्यासाठी भारताला एकात्मिक सुरक्षेकडे अधिक लक्ष द्यावे लागेल आणि लष्करी तणाव, युद्ध टाळायचे असेल तर त्या दृष्टीने सक्षम, सज्ज असणेही गरजेचे ठरते. त्याचसोबत सीमा व्यवस्थापन कार्यक्षम, तितकेच प्रभावी करावे लागेल.

भारत-चीनचे सैन्य ७३ दिवस डोकलाममध्ये समोरासमोर उभे होते. ही आगळीक ताजी असताना चिनी सैनिकांनी अरुणाचलमध्ये घुसखोरी केली. त्यापाठोपाठ आता हिंदी महासागरातील वावर सोयीस्कर व्हावा यासाठी पाकिस्तानात चिनी नाौदलाचा तळ उभारण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. एकंदरीत पाकिस्तान, नेपाळ, बांगलादेश, श्रीलंकेशी हातमिळवणी करून चीन सामरिकदृष्ट्या भारताला घेरण्याचा, किंबहुना द. आशियात तणाव वाढीस लावण्याच्या हेतूने कुरापती करीत आहे. दांडगाई करून शेजारी देशांचा भूभाग बळकावण्याचा मनसुबा चीनने आजवर साध्य करून घेतला असला तरी डोकलाममधून त्यास माघार घ्यावी लागली हा इतिहास फार जुना नाही. भारतविरोधी खोड्या काढणे हे नवे नसले तरी चीनचे वाढते दु:साहस भारतासमोर चिंता निर्माण करणारे ठरते. चीनची भाौगोलिक भूक भयंकर आहे, त्याच्या आसुरी महत्त्वाकांक्षेमुळे रशिया, मंगोलिया, मध्य आशिया, द. कोरिया, व्हिएतनाम,

जपान, फिलिपाइन्सदेखील त्रस्त आहेत. त्याच्या विस्तारवादी, आक्रमक धोरणाला लगाम घालण्यासाठी चीनविरोधी युती भारताला निर्माण करावी लागेल.

भारतालगतच्या सीमावर्ती भागात दळणवळण सुविधा निर्माण करण्यावर चीनचा अधिक भर आहे. अलीकडेच भारतीय हद्दीत घुसून चिनी सैनिकांनी रस्त्याच्या कामाला सुरुवात केली. मात्र गावकऱ्यांनी वेळीच सतर्क केल्याने भारतीय सैनिकांनी चिनी जवानांना पिटाळून लावले. जेथे-जेथे म्हणून चीनची सीमा

भारताशी जोडलेली असेल तेथे अशी सतर्कता अपरिहार्यच ठरते. साधनसामग्री आणि तंत्रज्ञानाच्या संदर्भात तो वरचढ असल्याने, शेजारी देशांशी आर्थिक माध्यमातून हितसंबंध निर्माण केल्यामुळे भारताला अधिकच दक्ष राहावे लागणार हे निश्चित. अमेरिकेशी हितसंबंध दुरावत चालल्यामुळे पाकिस्तानने स्वाभाविकपणे चीनशी मैत्री पसंत केली. अशा परिस्थितीत भारताला चिनी आव्हाने परतवून लावण्याची क्षमता निर्माण करावी लागणार आहे. कारण यापुढे जाऊन चीन आता पाकिस्तानात नाैदल तळ उभारण्याच्या तयारीला लागला आहे. कारण हिंदी महासागरात अधिक प्रशस्त स्वरूपाचा, सुविधाजनक प्रवेश करण्याचा चीनचा मनसुबा आहे. सध्या मलाक्काच्या सामुद्रधुनीतून येथे येणे शक्य आहे. परंतु जमीन आणि जलमार्गाच्या दृष्टीने पाकचे ग्वादर हे बंदर महत्त्वाचा दुवा ठरू शकतो, हे चीनने हेरले. एडनच्या आखातातून जाणाऱ्या चिनी युद्धनाैकांच्या देखभालीसाठी, त्यांना रसद पुरवण्यासाठी तळाची गरज आहे. म्हणूनच जिबुतीच्या धर्तीवर चीन पाकिस्तानात तळ उभारणी करू जात आहे. आफ्रिका खंडातील जिबुतीमध्ये २०१६ मध्ये चीनने पहिला नाैदल तळ उभारला; पाकिस्तानातील तळ हा विदेशातील दुसरा ठरेल. ग्वादर हे नागरी बंदर असल्यामुळे चीनला दुसऱ्या तळाची गरज भासते आहे. जगभरात सर्वत्र व्यापारी आणि युद्धनाैकेसाठी स्वतंत्र

बंदरे असतात, विशेषत: व्यापारी जहाजांना जागा अधिक लागते तर युद्धनौकांना देखभाल-दुरुस्ती यंत्रणा, रसद पुरवठा अत्यावश्यक असते. यादरम्यान, पाकिस्तानचे लष्करीकरण करण्याचा हेतू नसल्याचे चीनने म्हटले असले तरी पाकिस्तानसह हिंदी महासागराचेदेखील प्रस्तावित चिनी नौदल तळामुळे लष्करीकरण होणार हे वेगळे सांगायला का हवे? मुळात चीन-पाकिस्तान कॉरिडॉरमधील महत्त्वाचे बंदर म्हणून ग्वादरकडे पाहिले जाते. म्हणूनच पायाभूत सुविधांचे प्रमाण वाढवून शिनजांगपर्यंत हा मार्ग नेण्याच्या हालचाली चीनने सुरू केल्या आहेत. याशिवाय पाकिस्तानातील दहशतवादाचा भारताविरोधात वापर करणे चीनला फायद्याचे ठरू शकते. त्यामुळे भारत-चीनमधील तणाव आणखी वाढणार हे निश्चित. वस्तुत: चाबहार बंदरात मोठी गुंतवणूक करून भारताने तो विकसित केला. भारताला शह देण्यासाठी ग्वादर विकसित करण्याच्या हालचाली चीनने सुरू केल्या असल्या तरी भारत-चीन किंवा इराण-पाकिस्तान यांच्यात लष्करी तणाव निर्माण झाला तर ग्वादर किंवा जिबुती ही दोन्ही ठिकाणे धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे चिनी नौदल तळासाठी ही ठिकाणे तितकीशी उपयुक्त ठरू शकत नाहीत. तथापि, चिनी नौदलाच्या हालचालींनी भारताची डोकेदुखी वाढवली आहे, हे निश्चित. उल्लेखनीय म्हणजे चीनचा आर्थिक विकासाचा वेग मंदावलेला आहे, तरीही संरक्षणविषयक खर्चाची तरतूद कायम ठेवली आहे.

एकंदरीत, चिनी ड्रॅगनच्या दादागिरीचा खंबीरपणे मुकाबला करण्यासाठी भारताला एकात्मिक सुरक्षेकडे अधिक लक्ष द्यावे लागेल आणि लष्करी तणाव, युद्ध टाळायचे असेल तर त्या दृष्टीने सक्षम, सज्ज असणेही गरजेचे ठरते. त्याचसोबत सीमा व्यवस्थापन कार्यक्षम, तितकेच प्रभावी करावे लागेल.

# म्हणे, प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र!

> स्वत:चे उत्तरदायित्व लोकसहभागावर ढकलून राज्य सरकार आर्थिक जबाबदाऱ्यांमधून अंग काढून घेत आहे, आणि असाच अनुभव जनतेला सातत्याने येत आहे. परिणामी सरकार विश्वासार्हता गमावत आहे हे वेगळे का सांगायला हवे?

डिजिटल शाळा, ई-लर्निंगसंदर्भात लोकसहभागावर भर देणाऱ्या राज्य सरकारला खऱ्या अर्थाने 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र' घडवायचा का? असेल तर ५००२ शाळा बंद (स्थलांतर) करण्याच्या निर्णय प्रक्रियेत लोकसहभाग का घ्यावासा वाटला नाही? हा कळीचा मुद्दा आहे. २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांची आवश्यकता तपासण्याचे; तसेच राज्यात १ ते १० आणि ११ ते २० पटसंख्या असलेल्या सर्व शाळांची संख्या आणि सर्व मुलांच्या अध्यापनाचा दर्जा, गुणवत्तेची स्थिती फारशी समाधानकारक नसल्याचे २०१५ च्या वित्तीय श्वेतपत्रिकेत नमूद केले आहे. परंतु शाळांच्या दर्जाविषयी कोणतेही विधान त्यात नाही. म्हणूनच राज्यभरातील पायाभूत चाचण्यांची सरासरी समाजासमोर मांडावी, मगच सरकारने गुणवत्तेची विधाने करावीत.

वस्तुत: दोन-चार विद्यार्थ्यांसाठी शाळा चालवणे कोणाही शिक्षकासाठी आनंददायक नाही, परंतु शाळा बंद करण्यापूर्वी परिणामांच्या अंदाजावर संबंधित घटकांशी चर्चा अपेक्षित होती. त्याकडे राज्य सरकारने सहेतुक

दुर्लक्ष केले, असे म्हटले तर वावगे ठरू नये. शिक्षण हक्क कायद्यानुसार प्रत्येक बालकाला मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा मूलभूत हक्क आहे; तसेच सरकारचीदेखील ती जबाबदारी आहे. म्हणूनच लाभाचा दृष्टिकोन बाजूला ठेवून मूलभूत हक्काच्या अनुषंगाने यावर लक्ष देणे अनिवार्य ठरते. शिक्षण हक्क कायद्याच्या मॉडेल नियमावलीत २० विद्यार्थ्यांची अट नाही; मात्र महाराष्ट्र सरकारच्या अधिनियमात ती अंतर्भूत करण्यात आली. त्यामुळे शाळांच्या बाबतीत राज्य सरकार अमलात आणू पाहत असलेला निर्णय बेकायदा आहे असे म्हणता येत नाही, किमान २० विद्यार्थ्यांची अपेक्षा शैक्षणिकदृष्ट्या चुकीचीदेखील नाही. परंतु सामाजिकदृष्ट्या कोणत्या परिस्थितीत योग्य आणि अयोग्य याचाही विचार का होऊ नये? जर खरोखरीच मुले शिक्षणापासून वंचित राहत असतील तर पटसंख्येची अट शिथिल करण्याचा विचार जरूर व्हावा आणि पर्यायी व्यवस्था योग्य असेल तर २० च्या आतील शाळा बंद कराव्यात, मात्र ही मुले शिक्षणापासून वंचित राहणार नाहीत हे कसे? यामुळे शाळाबाह्य मुलांची संख्या वाढण्याचा धोका आहे. त्यांना प्रवाहात आणण्यासाठी पुन्हा चळवळ सुरू करावी लागेल. केवळ गुणवत्तेचा मुद्दा पुढे करून २० पटसंख्या असलेल्या १३१४ शाळा पहिल्या टप्प्यात बंद करण्याचे काही कारण नसावे. ज्या खासगी जीपमधून २०-२५ लोक एकाच वेळी प्रवास करतात त्यांच्या हाती मुलांना सोपवावे, अशी सरकारची अपेक्षा आहे का? जर वाहन भाड्याने दिले असेल तेव्हा शाळा बुडणार, त्या वेळी मुलांनी काय करायचे? मुलींच्या सुरक्षेची जबाबदारी कोणाची? अशा प्रश्नांची उत्तरे कोणाकडे नाहीत. एकंदरीत, स्वत:चे उत्तरदायित्व लोकसहभागावर ढकलून राज्य सरकार आर्थिक जबाबदाऱ्यांमधून अंग काढून घेत आहे, आणि असाच अनुभव जनतेला सातत्याने येत आहे. परिणामी सरकार विश्वासार्हता गमावत आहे हे वेगळे का सांगायला हवे?

महापालिका, जिल्हा परिषद शाळांना टाळे लागत असतानाच आश्रमशाळा, वस्तीशाळांनादेखील कंत्राटी पद्धतीचे ग्रहण लागले आहे. विशेषत: नाशिक, ठाणे, अमरावती, नागपूर विभागातील आदिवासी शाळांवर गंडांतर आले आहे. परिणामी राज्यातील साडेचार लाख विद्यार्थ्यांपैकी सुमारे दीड लाख विद्यार्थ्यांवर प्रत्यक्ष परिणाम होईल. अर्थातच यामागे खासगी शिक्षणसम्राटांशी असलेले हितसंबंध लपून राहिलेले नाहीत. तात्पर्य, आदिवासी विभागही विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची जबाबदारी झटकत आहे, असेच दिसते. शाळा बंद झाल्या म्हणजे शिक्षक आणि कर्मचारी अतिरिक्त ठरणार, त्यांच्या समायोजनाची ग्वाही शिक्षणमंत्री विनोद तावडे देत असले तरी प्रत्यक्षात खासगी संस्थांचे दरवाजे त्यांच्यासाठी बंद आहेत. एकट्या उस्मानाबादचा विचार करता ३१ शिक्षकांना सात वर्षांपासून नियुक्ती मिळालेली नाही, हे वास्तव कसे नाकारता येईल? म्हणूनच राज्य सरकारने थेट शाळा बंद करण्यापूर्वी पटसंख्या वाढवण्यासाठी, गुणवत्ता व दर्जा सुधारण्यासाठी कोणते ठोस पाऊल उचलले यावर आत्मपरीक्षण का करू नये? गुणवत्ता ढासळण्यासाठी कारणीभूत अधिकाऱ्यांवर कारवाई का करू नये? कमी गुणवत्तेच्या शाळांचा पट कमी होत आहे, या सरकारी विधानामागील आधार का स्पष्ट केला जात नाही? शाळांची गुणवत्ता घसरली असेल तर त्या बंद करणे हा उपाय कसा ठरू शकतो? अशैक्षणिक कामाचे ओझे शिक्षकांवर का लादले जाते? ते लादणाऱ्यांवर कारवाई का होत नाही? शिक्षण विभाग आणि राज्य सरकारला अशा मूलभूत मुद्द्यांवर विचार करायला सवड मिळेल का? अन्यथा ‘प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र’ हे दिवास्वप्न न ठरले तरच नवल!

# सुजलाम् महाराष्ट्र.. . !

> पाण्याचे वाटप जर नदीखोरेनिहाय करण्यात आले तर समन्यायी पाणीवाटपाचा फायदाही मराठवाड्याला होऊ शकतो. तात्पर्य, पाचही खोऱ्यांतील उत्कृष्ट जल व्यवस्थापनच 'सुजलाम सुफलाम' महाराष्ट्राचे स्वप्न सत्यात उतरवू शकते, अन्यथा जल आराखडा एक सोपस्कार ठरेल यात संशय नाही.

दुष्काळवाडा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मराठवाड्यासाठी परिपूर्ण जल आराखडा तयार करण्याच्या मुद्द्यावर बरीच खलबते होत राहिली. तब्बल १० वर्षे रखडलेल्या या आराखड्याला मुदतवाढ मिळत राहिली. त्यामुळे शासनाच्याच जल धोरणावर आगपाखड झाली. मात्र खंडपीठाच्या हस्तक्षेपानंतर नाशिकसह खान्देश विशेषत: मराठवाडा, विदर्भास लाभदायक ठरणाऱ्या गोदावरी खोऱ्याच्या जल आराखड्याचे काम उरकण्याला गती आली. तथापि, जल धोरणाच्या संदर्भात हितसंबंध जपणारे राज्यकर्ते आणि उदासीन अभियंते हे नेहमीच अडसर ठरत राहिले. म्हणूनच गोदावरी जल आराखड्याकडे उभ्या महाराष्ट्राचे लक्ष लागले होते. मराठवाड्यातील १२ उपनद्या आणि विदर्भातील १८ उपनद्यांचे उपखोरे असे गोदावरी खोऱ्याचे स्वरूप आहे. या संपूर्ण पाण्याच्या नियोजनासाठी तयार केलेल्या आराखड्यास अखेर जल परिषदेने एकात्मिक राज्य जल आराखडाअंतर्गत मंजुरी दिली. हा देशातील पहिलाच जल आराखडा असल्याचा दावा केला जात आहे. राज्याच्या पाचही खोऱ्यांतील जल

आराखडे तयार करून ते एकत्रित करण्याचे नियोजन असून दुष्काळग्रस्त गावांना त्याचा फायदा होईल अशी अपेक्षा आहे.

महाराष्ट्राने जुलै २००३ मध्ये राज्य जलनीती स्वीकारली. एकात्मिक राज्य जल आराखडा हे या जलनीतीचे मध्यवर्ती सूत्र आहे. उल्लेखनीय म्हणजे जल आराखड्याचे मध्यवर्ती सूत्र रूढ संकल्पनांना छेद देणारे आहे. त्यापैकी सर्वात महत्त्वाचे म्हणजे जल क्षेत्रातील विसंगतीचे व्यवस्थापन होय. नवीन धरणांची उभारणी म्हणजे जलविकास नव्हे, तर पूर्ण झालेल्या प्रकल्पांचे जल व्यवस्थापन आणि नियमन, पर्यावरण स्नेही विकास त्यात अंतर्भूत आहे. हा आराखडा तयार करताना ज्या अनंत अडचणी उभ्या राहिल्या त्या किंबहुना यापेक्षा वेगळया, नव्या अडचणी त्यात सुधारणा करताना येऊ नयेत म्हणून पाणलोट क्षेत्राचे सीमांकन आणि क्षेत्र निश्चिती नव्याने करावी लागेल. याशिवाय भूपृष्ठाखालील पाण्याची वैज्ञानिक आकडेवारी विश्वासार्ह ठरावी यासाठी संस्थात्मक फेररचना करावी लागेल. भूजलाचा ताळेबंद लक्षात घेता पैठणच्या धरणापर्यंतचा भाग वगळता अन्य उपखोऱ्यात भूजल शिल्लक आहे. विदर्भात २ लाख ३ हजार ४०० तर मराठवाड्यात ६९ हजार विहिरी घेता येऊ शकतील. अन्य खोऱ्यातील ७११ दलघमी पाणी गोदावरी खोऱ्यात आणता येऊ शकेल. उत्तर महाराष्ट्रातील प्रवरा, मुळा, ऊर्ध्व गोदावरी, तर मराठवाड्यातील मनार आणि विदर्भातील बेंबळा, पेंच तसेच गाढवी या सात उपखोऱ्यात नव्या प्रकल्पाला फारशी संधी नाही. परंतु मराठवाड्यातील मांजरा, तेरणा, पूर्णा, दुधना आणि लेंडी या पाच उपखोऱ्यात नव्या धरणांची उभारणी करता येऊ शकते. विदर्भात नव्या प्रकल्पांना पुरेसा वाव आहे. गोदावरी लवादानुसार अनुज्ञेय पाण्यापेक्षाही संकल्पित वापर जास्त असल्याने मराठवाड्यात ते आताच (-) उणे ठरले. पावसाची सरासरी ९९३ मिमी आणि तुलनेने अधिक म्हणजे २१५९ मिमी इतके बाष्पीभवन, मराठवाड्यासह

उत्तर महाराष्ट्रातही तोकडे असलेले जंगल क्षेत्र तसेच राज्य जल परिषदेच्या निकषानुसार पाणलोट क्षेत्राचे वर्गीकरण केले तर असुरक्षित पाणलोटांची संख्या तिपटीने वाढते. राज्यातील ३० उपखोऱ्यांपैकी ६ उपखोरे तुटीचे अन् त्यापैकी ५ मराठवाड्यात आहेत. तुलनेने विदर्भात पाण्याची सुबत्ता आहे. या बाबी जल आराखड्याची उपयुक्तता सिद्ध करण्यास पुरेशा ठराव्यात. गोदावरी खोरेच्या पाठोपाठ आता २०१८ मध्ये कृष्णा, तापी, कोकण खोऱ्याच्या आराखड्यांनादेखील मंजुरी दिली जाणार आहे, जेणेकरून अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरात वाहून जाणाऱ्या पाण्याचा लाभ गोदावरी खोऱ्यांतील, प. महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त गावांनाही होऊ शकेल. मात्र त्यासाठी जल अभियांत्रिकी व्यवस्था सक्षम करावी लागेल तरच स्वयंशिस्त, लोकसहभाग पर्यायाने कार्यक्षमता वाढेल. धरणातील जलसाठ्यावर अवलंबून न राहता विहिरी, शेततळी, जलयुक्त शिवार या बाबींकडे सर्वांनीच शास्त्रशुद्‌्ध आणि शिस्तबद्धपणे आतापासून लक्ष दिले तरच भविष्यातील पाणीटंचाई, त्यामुळे उद्‌्भवणाऱ्या आनुषंगिक समस्यांवर सहज मात करता येऊ शकेल. बहुतेक उपखोऱ्यांमध्ये साखर कारखान्यांची संख्या लक्षणीय वाढली आहे. त्यास तसेच उसाच्या क्षेत्रवाढीला आवर घातला, उसासाठी ठिबकचा वापर, उद्योग आणि घरांना मीटरद्वारे पाणीपुरवठा अपरिहार्य केला तर मोठ्या प्रमाणावर पाणी बचत होऊ शकेल. पाण्याचे वाटप जर नदीखोरेनिहाय करण्यात आले तर समन्यायी पाणीवाटपाचा फायदाही मराठवाड्याला होऊ शकतो. तात्पर्य, पाचही खोऱ्यांतील उत्कृष्ट जल व्यवस्थापनच ‘सुजलाम सुफलाम’ महाराष्ट्राचे स्वप्न सत्यात उतरवू शकते, अन्यथा जल आराखडा एक सोपस्कार ठरेल यात संशय नाही.

# हवामानाचा धसका.. शेतकऱ्यांची तारांबळ !

> अस्मानी आणि सुलतानी संकटाशी धैर्याने, संयमाने मुकाबला करण्यातच शेतकऱ्यांचे हित आहे. हवामान बदलामुळे होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी शेतमालाच्या बाजारभावाचा अंदाज त्यांनी जरूर घ्यावा. सरकारवर भिस्त ठेवण्यापेक्षा स्वत:लाच सर्वार्थाने सक्षम करण्यावर प्राधान्याने भर दिला, तरच दुष्टचक्राच्या गर्तेतून सुटका होऊ शकते.

रब्बीची सुगी अंतिम टप्प्यात आलेली असतानाच राज्यात १५ मार्चपासून ढगाळ हवामान निर्माण होण्यास सुरूवात झाली. कोकण, मराठवाडा, विदर्भ, खानदेश, प. महाराष्ट्रात सर्वदूर असेच वातावरण अद्यापही कमी-अधिक फरकाने दिसून येत आहे. यामुळे भाजीपाल्यासह बागायती पिकांवर किडीच्या प्रादुर्भावाचे सावट बळावले. आांब्याचा मोहोर जवळपास हातचा गेलाच आहे. द्राक्षाच्या मण्यांवर 'चिकट्या'चा प्रादुर्भाव दिसत असून डाळींब, गहू, कांदा देखील हातचा जाण्याची भीती गडद होत चालली आहे. खरे तर होळीनंतर उन्हाळयाची चाहूल लागते, परंतु बदलत्या हवामानामुळे राज्यभर चिंतेचे ढग दाटून आले आहेत. गारपीट, अवकाळी पाऊस आणि शेतकऱ्यांचे नुकसान या बाबी व्यवस्थेसह सर्वांच्याच अंगवळणी पडत चालल्या आहेत. गारपीटीने राज्यातील ४ लाख हेक्टरवरील रब्बीचे पीक गारद केले, त्यापूर्वी बोंडअळीने शेतकऱ्यांना

पोखरून काढले. अस्मानी संकटाचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना व्यवस्थेकडून दिलासा मिळण्याचे तर दूरच परंतु नव्या अडचणींची पेरणी होत आहे. त्यात आता हवामान खात्याच्या अंदाजाची भर पडली. हवामान खात्याकडून साधारणपणे ठोकताळे दिले जातात. त्यामुळे शेतकऱ्यांचा धीर सुटत चालला आहे. जिल्हानिहाय अंदाज देणाऱ्या या विभागाने जणू हवामानातील बदलासारखाच पवित्रा अंगिकारल्याचे दिसते. निधी आणि देयकाच्या वादातून हे घडत असेल तर निश्चितच त्यास हलगर्जीपणा कारणीभूत आहे, असेच म्हणावे लागेल. ऐन महत्वाच्या क्षणी नि:संदिग्ध, स्पष्ट हवामानाचा अंदाज दिला जात नसेल तर त्यामागे विमा कंपन्यांचे पोट भरण्याचा तर डाव नसेल? साहजिकच असा प्रश्न कोणालाही पडू शकतो. यापूर्वी हवामानाचा अंदाज फारसा गांभीर्याने घेतला जात नसे, कारण बहुतेक वेळा ते चुकीचे ठरत असत. मात्र हवामानात सातत्याने होत असलेला बदल, पिकांचे होणारे नुकसान लक्षात घेता शेतकऱ्यांप्रमाणेच सामान्य लोक देखील हवामान खात्याच्या अंदाजावर आता गांभीर्याने विचार करीत आहेत. म्हणूनच या विभागाने देखील अंदाज वर्तवण्याचा पॅटर्न बदलला पाहिजे, असे सुचवावेसे वाटते. कारण हवामान खात्याच्या अंदाजाने राज्यभरातील शेतकऱ्यांची तारांबळ उडते आहे. पावसाच्या धास्तीने ८-१० दिवस अगोदरच दिवस-रात्र एक करून गहू काढून घेतला जात आहे. द्राक्षांचे मणी चिरू नयेत, चिकट्याचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून द्राक्षांमध्ये साखर पुरेशी उतरलेली नसतानाच खुडणी केली जात आहे. कांद्याच्या साठवणुकीसाठी शेतकऱ्यांची दमछाक चालली आहे. महाराष्ट्रापासून कोमोरिन पर्यंत कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्याने मराठवाड्यासह उत्तर व पश्चिम महाराष्ट्रात, विदर्भात ढगाळ वातावरण रेंगाळत आहे. पावसाच्या हलक्या सरी शिडकावा करून जात आहेत. अशा स्थितीत गारपीटीची अफवा पसरली आणि शेतकरी अधिकच हवालदिल झाला. पातीआड

झाकलेला कांदा पावसाच्या धास्तीने सुरक्षित ठेवण्यासाठी, शेतात उभा असलेला ओला गहू हार्वेस्टरने काढून घेण्यासाठी त्याच्या जीवाचा आटापिटा चालला आहे.

नैसर्गिक प्रकोपाचा आकस्मिक मुकाबला करता-करता जेरीस आलेल्या शेतकऱ्यांची व्यवस्थेकडून होणारी हेळसांड मात्र काही थांबलेली नाही. २० मार्च २०१४ रोजी यवतमाळ जिल्ह्यातील दाभाडीत 'चाय पे चर्चा' झाली होती. भाजपने उपग्रहाच्या माध्यमातून देशातील ५०० शहरात या चर्चेचे थेट प्रक्षेपण दाखवले, बराच गाजावाजा केला. या घटनेला आता चार वर्षे लोटली. नरेंद्र मोदींनी त्या चर्चेच्या वेळी १६ आश्वासने दिली, ती सारी चहाच्या कपातच विरून गेली असेच म्हणण्यासारखी स्थिती आहे. कारण, गेल्या चार वर्षात दाभाडी परिसरातील ९५ शेतकऱ्यांनी नापिकीला कंटाळून आत्महत्येचा मार्ग निवडला, यातच सारे आले. उल्लेखनिय म्हणजे १९ मार्च १९८६ रोजी कर्जबाजारीपणा आणि नापिकीला कंटाळून पत्नी व चार मुलांसह साहेबराव पाटील करपे या शेतकऱ्याने आत्महत्या केली. राज्यातील पहिल्या शेतकरी आत्महत्येच्या घटनेला १९ मार्च २०१८ ला ३२ वर्षे पूर्ण झाली. या घटनेच्या स्मृत्यर्थ राज्यभर अन्नत्याग आंदोलन झाले. कदाचित राज्य सरकारला या बाबीकडे गांभीर्याने लक्ष द्यायला हवे असे वाटले नसावे. जसा मोदींना 'चाय पे चर्चा'चा विसर पडला तसाच राज्य सरकारला शेतकऱ्यांच्या दृष्टीने जिव्हाळयाच्या असणाऱ्या या मुद्याचा सोयीस्कर विसर पडलेला दिसतो, असे म्हटले तर वावगे ठरू नये. एक मात्र खरे की, अस्मानी आणि सुलतानी संकटाशी धैर्याने, संयमाने मुकाबला करण्यातच शेतकऱ्यांचे हित आहे. हवामान बदलामुळे होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी शेतमालाच्या बाजारभावाचा अंदाज त्यांनी जरूर घ्यावा. सरकारवर भिस्त ठेवण्यापेक्षा स्वत:लाच सर्वार्थाने सक्षम करण्यावर प्राधान्याने भर दिला, तरच दुष्टचक्राच्या गर्तेतून सुटका होऊ शकते.

# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ऍप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.